सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

दर्बी
क्लॉथ मार्केट
(नवी पेठ)
सुटींग, शर्टिंग, लिनन, खादी, कॉटन, सिल्क
प्रीमियम व एक्सुक्लुझिव्ह शुटिंग आणि शर्टिंग साठी एकदा आवश्य भेट द्या...!
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ), सोलापूर - ४१३००७
9422459645 I 9130008644

सोलापूर
सोमवार, २५ नोव्हेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक १९ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मोदींनी सभा घेतलेल्या १० पैकी ९ जागांवर महायुतीचा विजय

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विधानसभा निवडणुकीतील प्रचारात १० मतदारसंघात सभा घेतल्या. त्यांनी ८ नोव्हेंबर रोजी धुळे जिल्ह्यातून प्रचाराचा शुभारंभ केला. तर, मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर मोदींनी प्रचाराची सांगता केली. विशेष म्हणजे, या सर्व दहा मतदारसंघांत महायुतीच्या उमेदवारांचा मोठा विजय झाला आहे.



धुळ्यातील महायुतीचे भाजपा उमेदवार अनुप अग्रवाल यांच्यासाठी मोदींनी सभा घेतली होती. येथे ठाकरे गटाने अनिल गोटे यांना उमेदवारी दिली होती. या लढतीत अग्रवाल यांचा ४५ हजार मतांनी विजय झाला.

नाशिक पूर्व मतदारसंघातील महायुतीचे भाजपा उमेदवार राहुल ढिकले यांच्यासाठी नरेंद्र मोदींनी जाहीर सभा घेतली. येथे महाविकास आघाडीचे गणेश गीते रिंगणात होते. येथे राहुल ढिकले यांनी ८७ हजारांचे मताधिक्य घेऊन विजय मिळवला.

अकोल्यात मोदींनी महायुतीच्या उमेदवारांसाठी सभा घेतली. येथे अकोला पश्चिम मतदारसंघात भाजपा उमेदवार विजय अग्रवाल आणि काँग्रेसचे साजीद खान यांच्यात लढत झाली. त्यात साजिद खान यांचा विजय झाला.

मोदींची नांदेड जिल्ह्यातही सभा झाली. येथील किनवट मतदारसंघात महायुतीचे भाजपा उमेदवार भीमराव केराम विरुद्ध महाविकास आघाडीचे प्रदीप नाईक यांच्यात लढत झाली. त्यात केराम यांनी ५,६३६ मतांनी विजय मिळवला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर मतदारसंघात नरेंद्र मोदींनी सभा घेतली. गडचिरोली-चिमूर मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार बंटी भांगडिया आहेत. त्यांना महाविकास आघाडीचे मनोहर पारेती यांचे आव्हान होते. या मतदारसंघात बंटी भांगडिया यांना ९,८५३ मतांनी विजय मिळाला

सोलापूर जिल्ह्यातही पंतप्रधान मोदींनी सभा घेतली. येथील सोलापूर उत्तर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयकुमार देशमुख विरुद्ध महाविकास आघाडीचे महेश कोठे यांच्यात थेट लढत झाली. यात विजयकुमार देशमुख यांचा विजय झाला.

पुण्यातील कोथरुड मतदारसंघातही मोदींची जाहीर सभा झाली. महायुतीचे भाजपा उमेदवार चंद्रकांत पाटील यांना महाविकास आघाडीचे चंद्रकांत मोकाटे यांचे आव्हान होते. येथे चंद्रकांत पाटील विजयी झाले.

नरेंद्र मोदींनी छ. संभाजीनगर मतदारसंघातही सभा घेतली, संभाजीनगर पूर्व मतदारसंघात भाजपाचे अतुल सावे यांना एमआयएमचे इम्तियाज जलील आणि महाविकास आघाडीचे लहू शेवाळे यांनी आव्हान दिले होते. यात अतुल सावे यांनी २,१६१ मतांनी विजय मिळवला.

पनवेलमध्येही नरेंद्र मोदींची जाहीर सभा झाली. येथे भाजपा नेते प्रशांत ठाकूर यांना महाविकास आघाडीतील शेकापचे बाळाराम पाटील यांचे आव्हान होते. येथे ठाकूर यांनी ५१,०९१ मतांनी विजय मिळविला.

मुंबईत ३६ विधानसभा मतदारसंघ येतात. भाजपाचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांच्यासाठी मोदींनी सभा घेतली होती. तिथे त्यांना महाविकास आघाडीचे आसिफ झकारिया यांचे आव्हान होते. या लढतीत आशिष शेलार यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला. (वृत्तसंस्था)



ईस्टर्न नेव्हल कमांडचे गस्त घालणारे आयएनएस सावित्री हे जहाज रविवारी कोलकात्यातील बंदरावर दाखल झाल्यानंतर ते बघण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती

## सुकमात आयईडी स्फोट, पोलिस जखमी

◆ **सुकमा, २४ नोव्हेंबर**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पेरलेल्या आयईडीचा स्फोट होऊन जिल्हा राखीव रक्षक दलाचा कॉन्स्टेबल रविवारी जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

जिल्हा राखीव रक्षक चिंतालनार पोलिस ठाणे हद्दीतील रायगुडा पोलिस तळाजवळ नक्षलविरोधी मोहीम राबवत असताना सकाळी अकरा वाजताच्या सुमारास हा स्फोट झाला.

नक्षलविरोधी मोहीम सुरू असताना कॉन्स्टेबल पोडियाम विनोदचा अनवधानाने पाय पडल्याने आयईडीचा स्फोट होऊन तो जखमी झाला. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात असून, त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दुसऱ्या एका घटनेत त्याच परिसरात सीआरपीएफ आणि जिल्हा राखीव दलाच्या जवानांनी आयईडी जप्त केला. नक्षलवाद्यांनी तो चिंतालनार-नरसापुरम् रस्त्यावर पेरला होता. (वृत्तसंस्था)

## मणिपुरातील जाळपोळ प्रकरणी आणखी सात जणांना अटक

◆ **इम्फाळ, २४ नोव्हेंबर**

आमदारांच्या घरांची जाळपोळ आणि तोडफोड केल्याच्या आरोपाखाली मणिपूर पोलिसांनी आणखी सात जणांना अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. या लोकांना मागील दोन दिवसांत पकडण्यात आले.

काकचिंग जिल्ह्यात पोलिसांनी शुक्रवारी तीन जणांना अटक केली, अशी माहिती पोलिसांनी निवेदनात दिली. पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातून शनिवारी चार जणांना अटक करण्यात आली. यासह आतापर्यंत अटक करण्यात आलेल्यांची एकूण संख्या ४१ झाली आहे. (वृत्तसंस्था)

## मस्क यांनी घेतली महाराष्ट्र, झारखंड मतमोजणीची दखल

### कॅलिफोर्नियातील मतमोजणीसोबत केली तुलना

◆ **वॉशिंग्टन, २४ नोव्हेंबर**

भारतात झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभेची मतमोजणी शनिवारी पार पडली. या दोन राज्यांतील मतमोजणीची दखल जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती एलन मस्क यांनी घेतली. या संदर्भात त्यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत कॅलिफोर्नियातील हळुवार मतमोजणीसोबत तुलना केली.

टेस्ला आणि स्पेसएक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलन मस्क यांनी भारतातील मतमोजणीवर पोस्ट केली. त्यांनी म्हटले की, भारताने एका दिवसात ६४ कोटी (६४० दशलक्ष) मतांची मोजणी केली. कॅलिफोर्नियाची निवडणुक होऊन १९ दिवस झाले, तरी निकाल अद्याप आला नाही.

मतदानाच्या १९ दिवसांनंतरही कॅलिफोर्नियाने अधिकृतपणे अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीचे



निकाल जाहीर केले नाहीत. त्यामुळे एलन मस्क यांनी या प्रक्रियेवर जोरदार टीका केली. लोकसभा निवडणुकीदरम्यान भारताने यशस्वीपणे पार पाडलेल्या प्रचंड मतदान प्रक्रियेची तुलना केली. मस्क यांनी निदर्शनास आणून दिले की, भारताने केवळ एका दिवसात ६४ कोटी मतांची मोजणी केली, तर अमेरिकेच्या राज्यात अजूनही मतमोजणी सुरू आहे.

भारतातील मतमोजणीबद्दलच्या रिपोस्टमध्ये मस्क यांनी म्हटले की, भारताने १ दिवसात ६४ कोटी मतांची मोजणी केली. कॅलिफोर्निया अजूनही मतांची मोजणी करीत आहे, या मतांची संख्या जवळपास दोन लाखांपर्यंत आहे.

अमेरिकेत ५ नोव्हेंबरला निवडणुका झाल्या. निवडणूक होऊन १८ दिवस झाले आहेत. कॅलिफोर्नियामध्ये अजूनही दोन लाखांहून अधिक मतांची मोजणी सुरू आहे. अमेरिकेच्या निवडणुकीनंतर रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प विजयी घोषित झाले. रिपब्लिकन पक्षाला ३१२ इलेक्टोरल मते मिळाली आहेत. बहुमतासाठी केवळ २७० इलेक्टोरल मतांची गरज होती. डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांना २६६ इलेक्टोरल मते मिळाली. ज्यो बायडेन सध्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आहेत. २० जानेवारीला कॅपिटोल हिलवर डोनाल्ड ट्रम्प यांचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथविधी होणार आहे. (वृत्तसंस्था)

## काँग्रेसचा पराभव 'धक्कादायक'

### लाट होती की छेडछाड हे सांगणे कठीण

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव धक्कादायक आहे. राज्याच्या विधानसभा निवडणुकीतील 'सर्वात वाईट' पराभव आहे, असे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी रविवारी म्हटले आहे. लाट होती की छेडछाड हे सांगणे कठीण आहे, असेही ते म्हणाले.

महिलांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी महायुती सरकारची 'लाडकी बहीण' योजना ग्रामीण भागातील मतदारांच्या पसंतीस उतरली आहे, तर ध्रुवीकरणामुळे राज्याच्या शहरी भागात विरोधी महाविकास आघाडीच्या (मविआ) संभाव्यतेला फटका बसला आहे, असे कराड दक्षिण मतदारसंघातून पराभूत झालेले पृथ्वीराज चव्हाण वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले.



२० नोव्हेंबर रोजी झालेल्या २८८ सदस्यीय विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल शनिवारी जाहीर झाल्यानंतर चव्हाण यांच्यासह मविआमधील अनेक दिग्गजांचा पराभव झाला.

मविआचा भाग म्हणून १०१ जागा लढवणाऱ्या काँग्रेसने केवळ १६ जागा जिंकून आपला आतापर्यंतचा सर्वांत वाईट पराभव पत्करला. सातारा जिल्ह्यातील कराड दक्षिण मतदारसंघात ५ ते ६ हजार मतांनी विजयी होण्याची अपेक्षा चव्हाण यांनी व्यक्त केली होती, परंतु जिल्ह्यातील सर्व मविआ उमेदवारांचा जवळपास ४०,००० फरकाने पराभव झाला, असे त्यांनी नमूद केले.

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील ४८ पैकी २० जागांवर काँग्रेसची संख्या सर्वांत कमी होती, असे त्यांनी सांगितले. नुकत्याच पार पडलेल्या राज्य निवडणुकांचा संदर्भ देत ते म्हणाले, हा धक्कादायक पराभव आहे आणि विधानसभा निवडणुकीतील आतापर्यंतचा सर्वांत वाईट पराभव आहे. (वृत्तसंस्था)

## २८८ विजयी उमेदवारांमध्ये २१ महिला

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

२८८ जागांच्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत तब्बल २१ महिला उमेदवार विजयी ठरल्या आहेत; त्यापैकी विरोधी पक्षांमधून केवळ एक महिला आहे.

भाजपाच्या सर्वाधिक १४ महिला उमेदवार विजयी झाल्या; ज्यात १० पुन्हा आल्या आहेत. श्वेता महाले (चिखली मतदारसंघ), मेघना बोर्डीकर (जिंतूर), देवयानी फरांदे (नाशिक मध्य), सीमा हिरे (नाशिक पश्चिम), मंदा म्हात्रे (बेलापूर), मनीषा चौधरी (दहिसर), विद्या ठाकूर (गोरेगाव), माधुरी मिसाळ (पार्वती), मोनिका राजळे (शेवगाव) आणि नमिता मुंदडा (कैज) यांचा समावेश आहे.

निवडणूक आयोगाने शनिवारी जाहीर केलेल्या मतदानाच्या निकालानुसार भाजपाच्या चार नवीन महिला विजयी झाल्या असून त्यात श्रीजया चव्हाण (भोकर), सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व), स्नेहा पंडित (वसई) आणि अनुराधा चव्हाण (फुलंबारी) यांचा समावेश आहे.

मंजुळा गावित (साक्री) व संजना जाधव (कन्नड) या सत्ताधारी शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आल्या. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर सुलभा खोडके (अमरावती), सरोज अहिरे (देवळाली), सना मलिक (अनुशक्तीनगर) आणि अदिती तटकरे (श्रीवर्धन) विजयी झाल्या. (वृत्तसंस्था)

## उबाठा गटाचे पाच आमदार संपर्कात

### उदय सामंत यांचा दावा

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पाच आमदार आमच्या संपर्कात आहेत, असा दावा शिवसेनेचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी केला आहे. एवढेच नव्हे, तर ठाकरेंकडे केवळ दोन-तीन आमदार उरतील, बाकीचे सगळे इकडे येतील, असेही सामंत म्हणाले.

विधानसभेच्या १५ पैकी १४ जागा जिंकून कोकण विभागाने बालेकिल्ला असल्याचे सिद्ध केले आहे. परंतु, विरोधकांचे 'गिरे तो भी टांग उपर' असे चालले आहे. त्यांचे दोन-तीन आमदार सोडले, तर सर्व आमदार आमच्याकडे येतील. सध्या पाच आमदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क केल्याचे त्यांनी



सांगितले.

ठाकरे गटाचे आमदार रात्रीपासून आमच्या संपर्कात आहेत. विरोधकांकडे उरलेसुरले आमदारही राहणार नाहीत. परंतु, आम्ही त्यांना काही दिवस तिकडे थांबायला सांगितले आहे. विरोधकांनी गद्दार... गद्दार म्हणून चुकीचे वातावरण निर्माण केले होते. त्याला मतदारांनी उत्तर दिले. 'गिरे तो भी टांग उपर' अशी अवस्था त्यांची झाली आहे. विरोधक आता इव्हीएमला दोष देत आहेत. त्यांचा खासदार निवडून आला, तेव्हा इव्हीएममध्ये दोष नव्हता. आता त्यांना यात दोष दिसत आहे. त्यांच्याकडे कोणताही मुद्दा शिल्लक राहिलेला नाही. एकनाथ शिंदे यांना ताकद देण्यासाठी अनेक मोठमोठे नेते संपर्कात आहेत, असेही सामंत म्हणाले. (वृत्तसंस्था)


### शरद पवार गटातही फुटीची शक्यता?

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल पाटील यांनी शरद पवार गटातील आमदारही संपर्कात असल्याचा दावा केला. त्यांच्या आमदारांचे फोन आले आहेत, काही जण येण्यासाठी इच्छुक आहेत. खरी राष्ट्रवादी काँग्रेस कुणासोबत आहे, ते कळलेच आहे. येत्या काही दिवसांत कोण कोण इकडे येते, हे कळेल, असे अनिल पाटील म्हणाले.

## चित्रपट वार्ता

### राजकुमार रावचे भाव वधारले

**मुंबई** : अभिनेत्री श्रद्धा कपूर आणि अभिनेता राजकुमार राव यांचा स्त्री-२ चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलाच ब्लॉकबस्टर ठरला. हा हॉरर कॉमेडी चित्रपट प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस उतरला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कमाईने जुने विक्रम मोडीत काढत नवीन विक्रम केले. स्त्री-२ च्या यशानंतर कलाकारांची प्रसिद्धी वाढली असून, राजकुमार रावने मानधनात वाढ केल्याचे समजते. मानधन वाढवण्याच्या चर्चांवर राजकुमार राव म्हणाला की, मी दररोज वेगवेगळे आकडे वाचतो. माझ्या निर्मात्यांवर बोजा वाढवण्याइतका मी मूर्ख नाही. सर्वांत मोठ्या ब्लॉकबस्टर चित्रपटाचा भाग झाल्यानंतर मी अभिनेता म्हणून बदललो नाही. माझ्या आवडीचं काम करण्याचं पैसा हा बाय प्रॉडक्ट आहे. मला संपूर्ण आयुष्य काम करायचे आहे, म्हणून मी अशा भूमिका शोधत आहे, ज्या आश्चर्यचकित करतील, उत्साहित करतील, मला आव्हान देतील आणि माझा विकास होण्यास मदत करतील.



### रश्मिका-विजय एकमेकांच्या प्रेमात?

**मुंबई** : मनोरंजन क्षेत्रात रोज नवनव्या घडामोडी घडत असतात. बॉलिवूडमध्ये अभिनेते-अभिनेत्री यांच्या प्रेमकरणांची तर चांगलीच चर्चा होते. अनेकदा एकमेकांसाठी जीव ओवाळून टाकणारी जोडपी काही दिवसांनी वेगळे झाल्याचे दिसतात. गेल्या काही दिवसांपासून तमिळ चित्रपटसृष्टीत तसेच बॉलिवूडमध्येही मोठे नाव असलेले विजय देवरकोंडा आणि भारताची क्रश म्हणून ओळख असलेली रश्मिका मंदाना एकमेकांच्या प्रेमात आहेत का? असे विचारले जाते. रश्मिका आणि विजय हे दोन्ही स्टार्स अनेक चित्रपटांत एकत्र दिसलेले आहेत. त्यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री लाखो सिनेरसिकांना आवडलेली आहे. चित्रपटातील त्यांचा अभिनय आणि त्यांनी साकारलेल्या भूमिका या दोघांनी खऱ्या आयुष्यातही एकत्र यायला हवं, अशी इच्छा अनेकजण व्यक्त करतात. ते दोघेही एकमेकांचे चांगले मित्र आहेत. असे असताना आता हा नवा फोटो सध्या सगळीकडे चर्चेचा विषय ठरत आहे.



### कंगना म्हणाली, 'त्यांना' धडा मिळाला

**मुंबई** : महाराष्ट्रात दैत्यांचा पराभव झाला, अशी प्रतिक्रिया अभिनेत्री आणि खासदार कंगना राणावतने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांवर दिली आहे. विधानसभा निवडणुकांचे कल हाती येताच सर्व स्तरातून प्रतिक्रियांची सरबत्ती सुरू झाली. ज्यांची बुद्धी भ्रष्ट झाली होती, त्यांना धडा मिळाला आहे, असेही कंगनाने म्हटले आहे. जे महिलांचा सन्मान करत नाहीत, ते दैत्य असतात. जे सन्मान करतात ते देव असतात. याच निकषांवर आपण देव आणि दैत्य कोण हे ओळखतो. महिलांचा सन्मान, त्यांना ३३ टक्के आरक्षण किंवा इतर काही योजना असोत, त्या अगदी चांगल्या प्रकारे राबवल्या जात आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात जे दैत्यांचं होतं, तेच या सगळ्या विरोधकांचं झालं आहे. दैत्यांचा पराभव झाला. महाभारतात सगळे एकाच कुटुंबातले होते, पण कौरव हरलेच की, तसेच काहीसे महाराष्ट्रात घडले, असे कंगना म्हणाली.

## इतिहास विरोधी पक्षनेत्यांचा!

**नागेश दाचेवार**

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

सुरुवातीला मुंबई राज्य विधानसभा, त्यानंतर द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा आणि मग आता महाराष्ट्र विधानसभेत १९३७ ते २०२४ या काळात एकूण ३६ विरोधी पक्षनेत्यांनी पद भूषविले आहे. मात्र, यावेळी ही परंपरा मोडीत निघण्याच्या उंबरठ्यावर दिसत आहे. विरोधी पक्षातील कुठल्याही पक्षाला १० टक्के जागा मिळविता आल्या नसल्याने ही नामुष्की ओढावली आहे.

महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद एक प्रतिष्ठेचे पद आहे. माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्यासह माजी राज्यपाल प्रभा राव, राज्याचे मुख्यमंत्री आणि लोकसभेचे अध्यक्ष राहिलेले मनोहर जोशी, एस. एम. जोशी, शरद पवार, गोपीनाथ मुंडे, नारायण राणे अशा दिग्गजांनी हे पद भूषविले आहे.

**आजवर एकाच महिलेची या पदावर नियुक्ती**

सामाजवादी कार्यकर्त्या, जनता पार्टीच्या मृणाल गोरे यांनी २३ डिसेंबर १९८८ ते १९ आक्टोबर १९८९ या १० महिन्यांच्या अल्प कालावधीसाठी महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद भूषविले. त्या १९७२ मध्ये॰ पहिल्यांदा मुंबईच्या मलाड भागातून निवडणूक लढवून विधानसभेत पोहचल्या. त्यानंतरच्या काळात त्या लोकसभेतदेखील पोहचल्या. महाराष्ट्र विधानसभेच्या इतिहासात झालेल्या ३६ विरोधी पक्षनेत्यांमध्ये आजवर ३५ पुरुष आणि एकमेव मृणाल गोरे या महिला आहेत.

**महायुतीच्या तिन्ही शिलेदारांनी भूषविले हे पद**

सध्या महायुतीचे घटक पक्ष असलेल्या भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यातील तीन शिलेदार भाजपाचे देवेंद्र फडणवीस, शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार या तिघांनीही विरोधी पक्ष नेतेपद भूषविले आहे.

### एकनाथ शिंदे



२०१४ मध्ये युती तुटली आणि भाजपा-शिवसेना वेगळी लाढली होती. त्यावेळी भाजपाने १२२ जागांवर विजय मिळवत एकट्याच्या बळावर सत्ता स्थापन केली होती. त्यावेळी १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ या २४ दिवसांच्या अल्प कालावधीसाठी एकनाथ शिंदे यांनी विरोधी पक्षनेते पद भूषविले होते. त्यानंतरच्या काळात शिवसेना सरकारमध्ये सहभागी झाली होती.

### देवेंद्र फडणवीस



२०१९ मध्ये उद्धव ठाकरेंनी भाजपासोबत युतीत निवडणूक लढून नंतर पाठीत खंजीर खुपसला आणि काँग्रेस-राकाँसोबत जाऊन सरकार स्थापन केल्याने १०५ जागांवर विजयी झालेल्या भाजपाला विरोधी पक्षात बसावे लागले. तेव्हा विरोधी पक्षनेतेपदाची धूरा देवेंद्र फडणवीसांना सांभाळावी लागली होती. ते १ डिसेंबर २०१९ ते ३० जून २०२२ पर्यंत विरोधी पक्षनेते होते. त्यानंतर शिवसेनेत उठाव झाला आणि ठाकरेंचे सरकार पडल्यानंतर ते सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले.

### अजित पवार



२०२२ मधल्या शिवसेनेच्या उठावामुळे ठाकरे सरकार कोसळले. त्यानंतर महायुतीचे सरकार स्थापन झाले. त्यामुळे ठाकरे सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असलेले अजित पवारांना विरोधी पक्षनेतेपदी विराजमान करण्यात आले. ते ४ जुलै २०२२ ते ३० जून २०२३ या ११ महिन्यांच्या कालावधीत या पदावर होते. मात्र, नंतरच्या काळात अजित पवार स्वतःच आपले काका शरद पवार यांच्याशी फारकत घेत, ४० आमदारांसह महायुती सरकारमध्ये सहभागी झाल्याने ते विरोधी पक्षनेतेपदावरून पुन्हा उपमुख्यमंत्री झाले.

### आजवर झालेले विरोधी पक्षनेते

#### मुंबई राज्य विधानसभा

| | | |
|---|---|---|
| १. | सर अली महंमद खान देहलवी | १९३७ ते १९३९ |
| २. | ए. ए. खान | १९४६ ते १९५२ |
| ३. | तुळशीदास जाधव | १९५२ ते १९५५ |

#### द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभा

| | | |
|---|---|---|
| १. | एस. एम. जोशी | १९५७ ते १९५८ |
| २. | उध्दवराव पाटील | १९५८ ते १९५९ |
| ३. | विठ्ठल देशपांडे | १९५९ ते १९६० |

#### महाराष्ट्र विधानसभा

| | | |
|---|---|---|
| १. | रामचंद्र भंडारे | १९६० ते १९६२ |
| २. | कृष्णराव धुळप | १९६२ ते १९६७ |
| ३. | कृष्णराव धुळप | १९६७ ते १९७२ |
| ४. | दिनकर पाटील | ७ एप्रिल १९७२ ते जुलै १९७७ |
| ५. | गणपतराव देशमुख | १८ जुलै १९७७ ते फेब्रुवारी १९७८ |
| ६. | उत्तमराव पाटील | २८ मार्च १९७८ ते १७ जुलै १९७८ |
| ७. | प्रभा राव | फेब्रुवारी १९७९ ते १३ जुलै १९७९ |
| ८. | प्रतिभा पाटील | १६ जुलै १९७९ ते फेब्रुवारी १९८० |
| ९. | शरद पवार | ३ जुलै १९८० ते १ ऑगस्ट १९८१ |
| १०. | बबनराव ढाकणे | १७ डिसेंबर १९८१ ते २४ डिसेंबर १९८२ |
| ११. | दिनकर पाटील | २४ डिसेंबर १९८२ ते १४ डिसेंबर १९८३ |
| १२. | शरद पवार | १५ डिसेंबर १९८३ ते १३ जानेवारी १९८५ |
| १३. | शरद पवार | २१ मार्च १९८५ ते १४ डिसेंबर १९८६ |
| १४. | निहाल अहमद | १४ डिसेंबर १९८६ ते २६ नोव्हेंबर १९८७ |
| १५. | ॲड. दत्ता पाटील | २७ नोव्हेंबर १९८७ ते २२ डिसेंबर १९८८ |
| १६. | मृणाल गोरे | २३ डिसेंबर १९८८ ते १९ ऑक्टोबर १९८९ |
| १७ | ॲड. दत्ता पाटील | २० ऑक्टोबर १९८९ ते ३ मार्च १९९० |
| १८. | मनोहर जोशी | २२ मार्च १९९० ते १२ डिसेंबर १९९१ |
| १९. | गोपीनाथ मुंडे | १२ डिसेंबर १९९१ ते १४ मार्च १९९५ |
| २०. | मधुकर पिचड | २५ मार्च १९९५ ते १५ जुलै १९९९ |
| २१. | नारायण राणे | २२ ऑक्टोबर १९९९ ते १९ ऑक्टोबर २००४ |
| २२. | नारायण राणे | ६ नोव्हेंबर २००४ ते १२ जुलै २००५ |
| २३. | रामदास कदम | १ ऑक्टोबर २००५ ते ३ नोव्हेंबर २००९ |
| २४. | एकनाथ खडसे | ११ नोव्हेंबर २००९ ते ८ नोव्हेंबर २०१४ |
| २५. | एकनाथ शिंदे | १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ |
| २६. | राधाकृष्ण विखे-पाटील | २३ डिसेंबर २०१४ ते ०४ जून २०१९ |
| २७. | विजय वडेट्टीवार | २४ जून २०१९ ते ९ नोव्हेंबर २०१९ |
| २८. | देवेंद्र फडणवीस | १ डिसेंबर २०१९ ते ३० जून २०२२ |
| २९. | अजित पवार | ४ जुलै २०२२ ते ३० जून २०२३ |
| ३०. | विजय वडेट्टीवार | ३ ऑगस्ट २०२३ ते २६ नोव्हेंबर २०२४ |

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रारंभ : १९२६

सोलापूर | सोमवार, २५ नोव्हेंबर २०२४


## महत्त्वाचे

### विदेशी मालमत्तेसाठी योग्य आयटीआर निवडा

**नवी दिल्ली :** चालू आर्थिक वर्षात विदेशी संपत्ती आणि उत्पन्नाचे जवळपास दोन लाख आयकर विवरण दाखल करण्यात आले आहे, अशी माहिती करविभागाने दिली. योग्य अर्ज भरला आहे की नाही, याची खात्री करून घ्या आणि सुधारित अर्ज दाखल करा, असे आवाहन आयकर विभागाने केले आहे. निवासी भारतीयांनी आपल्या नियोक्त्यांकडून कर्मचारी समभाग पर्यायाच्या माध्यमातून प्राप्त समभाग आणि मिळवलेल्या उत्पन्नाची आयटीआरमध्ये दिलेली विदेशी मालमत्ता आणि विदेशी विदेशी स्रोत उत्पन्नाचे वेळापत्रक भरून आयकर विभागाकडे जाहीर केले पाहिजे, असे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

### पराभवावर आत्मपरीक्षण करू : काँग्रेस

**थिरुवनंतपुरम् :** महाराष्ट्रात झालेल्या लाजीरवाण्या पराभवाची कारणे शोधून काढण्यासाठी पक्ष आणि महाविकास आघाडीचे इतर भागीदार एकत्रितपणे आत्मपरीक्षण करतील, असे काँग्रेसने रविवारी सांगितले. भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीने शनिवारी महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ पैकी २३० जागांवर विजय मिळवला आणि



काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीला अवघ्या ४९ जागा मिळवता आल्या. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायक आणि अविश्वसनीय आहे, असे अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी सांगितले. नेमके काय झाले, ते आम्हाला कळलेच नाही. हा केवळ काँग्रेसचाच नव्हे, तर संपूर्ण महाविकास आघाडीचा पराभव आहे. नेमके काय झाले, त्याचे चित्र स्पष्ट होऊ द्या, असे त्यांनी एका वाहिनीच्या कार्यक्रमात सांगितले. महाराष्ट्र निवडणुकीत काही तोडफोड झाल्याचा संशय आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना वेगुगोपाल म्हणाले की, पराभवानंतर लगेच असे कोणतेही आरोप करीत नाही. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि आमच्याही गडात जोरदार फटका बसला आहे. पण, हे अपयश केवळ काँग्रेसचे नाही, तर संपूर्ण महाविकास आघाडीचे आहे. त्यामुळे आम्ही एकत्र बसून त्यावर आत्मपरीक्षण करू.

### कुपवाडात अतिरेक्यांचा अड्डा उद्ध्वस्त

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांनी रविवारी अतिरेक्यांचा अड्डा उद्ध्वस्त केला, अशी माहिती पोलिसांनी दिली. हंडवाडा येथील पोलिसांनी सुरक्षा दलांसोबत संयुक्त कारवाई करीत मुगलपोरा जंगलात अतिरेक्यांचा अड्डा उद्ध्वस्त करीत स्फोटके आणि दारुगोळा जप्त केला, असे पोलिस प्रवक्त्याने सांगितले. जचलदरा पोलिस चौकीच्या हद्दीतील मुगलपोरा क्रेम्होराच्या जंगल परिसरात लष्कराने शोधमोहीम सुरू केली. या मोहिमेदरम्यान अतिरेक्यांचा अड्डा शोधून काढण्यात आला. येथून १० ग्रेनेड्ससह स्फोटके आणि दारुगोळा जप्त करण्यात आला.

### हेमंत सोरेन सरकारचा गुरुवारी शपथविधी

**रांची:** झारखंड मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी झारखंडच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा रविवारी राज्यपालांकडे सुपूर्द केला. ते गुरुवारी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. झारखंड विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चाला मोठे यश मिळाले आहे. विधानसभा निवडणुकीतील बहुमतानंतर हेमंत सोरेन यांनी झारखंडमध्ये नवीन सरकार स्थापनेचा दावा सादर केला. झारखंड विधानसभेत इंडिया आघाडीला मोठे यश मिळाले आहे. झारखंडच्या एकूण ८१ जागांमध्ये इंडिया आघाडीला ५६ जागा मिळाल्या. एकट्या भाजपाला केवळ २१, तर त्यांच्या मित्र पक्षांना तीन जागांवर समाधान मानावे लागले. याठिकाणी सत्तास्थापनेसाठी बहुमताचा आकडा ४१ आहे. इंडिया आघाडीतील सर्व पक्षांनी हेमंत सोरेन यांची एकमताने विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली. सरकारचा शपथविधी गुरुवारी होणार असल्याचे सोरेन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. झारखंडमधील गंगावर येथे झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सोरेन म्हणाले, मी सरकार स्थापनेचा दावा केला आहे आणि समर्थन पत्र राज्यपालांना सुपूर्द केले आहे. त्यांनी आम्हाला सरकार स्थापनेचे निमंत्रण दिले आहे.

# लाडकी बहीण योजना ठरली ‘गेमचेंजर’

## ‘बटेंगे तो कटेंगे’चाही परिणाम : शरद पवार

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. त्यातच ‘बटेंगे तो कटेंगे’ या नाऱ्याचाही मोठा परिणाम राज्यातील मतदारांवर झाला. यामुळेच महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळू शकले नाही, असे भाष्य शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी केले.

**भाजपाशी कुणी नडणार नाही**



विधानसभेत भाजपाचे संख्याबळ विक्रमी असल्याने, मुख्यमंत्रिपदाच्या मुद्यावरून कोणीही भाजपासोबत नडण्याचा प्रयत्न करणार नाही. मुख्यमंत्री भाजपाचा असणार आहे आणि महायुतीतील सर्व घटक पक्षांना तो निर्णय मान्य करावा लागेल, अशा शब्दांत शरद पवार यांनी अजित पवारांना चिमटा काढला.

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर शरद पवार यांनी या निकालावर कुठलेही भाष्य केले नव्हते. मात्र, रविवारी त्यांनी साताऱ्यात जाऊन पत्रकारांशी संवाद साधला.

पवार म्हणाले, आमची जी अपेक्षा होती, तसा निर्णय लागलेला नाही. शेवटी लोकांनी दिलेला हा निर्णय असल्याने तो स्वीकारला पाहिजे. काही गोष्टी लोकांकडून कानावर येत आहेत. पराजयाच्या कारणांची कारणमिमांसा करू.

लाडकी बहीण योजनेबाबत महिलांमध्ये संभ्रम निर्माण झाला. आमचे सरकार आले तर, योजना बंद होईल, असा समज निर्माण करण्यात सत्ताधारी पक्षाचे लोकं यशस्वी झाले. त्यामुळे महिलांनी सत्ताधाऱ्यांच्या बाजूने उभे राहण्याचा निर्णय घेतल्याचे लोकांकडून ऐकायला येत असल्याचे पवार म्हणाले.

इव्हीएमबाबत पवार म्हणाले की, लोकांकडून अनेक गोष्टी कानावर येत असतात. मात्र, याबाबत माझ्याकडे खात्रीलायक माहिती नसल्याने यावर मी भाष्य करणार नाही.

**अजित पवारांशी युगेंद्रची तुलना होऊ शकत नाही**

बारामती मतदारसंघात उमेदवार देणे आवश्यक होते. त्या ठिकाणी उमेदवारी दिली नसती, तर राज्यात काय संदेश गेला असता. बारामतीमधील दोन्ही उमेदवारांची तुलना होऊ शकत नाही. कारण, अजित पवार अनेक वर्षांपासून राजकारणात आहेत तसेच ते राज्यात सत्तेतही आहेत. दुसऱ्या बाजूला त्यांच्या विरोधात नवखा तरुण उमेदवार होता. त्यामुळे आम्हाला निकालाबाबत आधीच कल्पना होती. असे शरद पवार म्हणाले.

युगेंद्र पवारला बारामतीतून निवडणूक लढविण्याचा निर्णय योग्यच होता. जर आम्ही अजित पवार यांच्याविरोधात उमेदवार दिला नसता तर, आम्ही रिंगणातून माघार घेतली असा अर्थ लोकांनी काढला असता आणि त्याचा विपरित परिणाम पक्षाच्या भवितव्यावर झाला असता, असेही ते म्हणाले.

आता आपण राजकीय निवृत्ती स्वीकारणार का, असे विचारले असता, मी आणि माझ्या पक्षातील सहकारी याबाबत चर्चा करून निर्णय घेऊ. सध्या तरी माझ्या मनात तसा कुठलाही विचार नाही, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)



पर्थ येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषकाच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात रविवारी भारताच्या दुसऱ्या डावात सलामीवीर यशस्वी जयस्वाल (१६१) व विराट कोहलीने (नाबाद १००) शानदार शतक झळकावले. त्यांच्या या दमदार खेळीच्या बळावर भारताने ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ५३४ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले

# भाजपालाच कोट्यवधी लोकांची पसंती

## १ कोटी ७२ लाख ९३ हजार ६५० मतदान

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

१५ व्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानात राज्यातील जनतेने भाजपाच्या झोळीत कोट्यवधी मते टाकल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले. या निवडणुकीत सहा प्रमुख पक्षांनी निवडणूक लढवली, पण भाजपा वगळता कोणालाही एक कोटीच्या आसपास पोहोचता आले नाही.

**महायुती**

| पक्ष | मतांची टक्केवारी | मिळालेली मते | स्ट्राईक रेट |
|---|---|---|---|
| भाजपा | २६.७७ | १,७२,९३,६५० | ८९ |
| शिवसेना | १२.३८ | ७९,९६,९३० | ६७.०५ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ०९.०१ | ५८,१६,५६६ | ८०.३९ |

**महाविकास आघाडी**

| पक्ष | मतांची टक्केवारी | मिळालेली मते | स्ट्राईक रेट |
|---|---|---|---|
| काँग्रेस | १२.४२ | ८०,२०,९२१ | १५.६८ |
| शरद पवार गट | ११.२८ | ७२,८७,७९७ | २०.८३ |
| उबाठा | ०९.९६ | ६४,३३,०१३ | ११.५२ |

यावेळी भाजपाला १ कोटी ७२ लाख ९३ हजार ६५० मतदान झाले असून, त्याखालोखाल काँग्रेस, शिवसेना, शरद पवार गट नंतर उबाठा आणि सर्वांत कमी राष्ट्रवादी काँग्रेसला मते मिळालीत. अजित पवारांनी सर्वांत कमी जागा लढवल्याचा हा परिणाम असला तरी, त्यांचा स्ट्राईक रेट ८० टक्के असून, भाजपानंतर दुसऱ्या क्रमांकाचा आहे. भाजपाचा स्ट्राईक रेट ८९ टक्के इतका सर्वाधिक आहे.

काँग्रेससारख्या जुन्या राष्ट्रीय पक्षाला केवळ ८० लाख मते मिळाली असून, त्यांचा स्ट्राईक रेट १५ टक्केच आहेत. त्याचवेळी उबाठा गटाला ६४ लाख ३३ हजार मते मिळाली असून, सर्वांत खराब कामगिरी त्यांची आहे. त्यांचा स्ट्राईक रेट केवळ ११ टक्के आहे. महाआघाडीत सर्वांत चांगला स्ट्राईक रेट शरद पवारांचा २० टक्के असला तरी, सर्वांत कमी म्हणजे केवळ १० जागा त्यांना मिळाल्या आहे. (तभा वृत्तसेवा)

# खटल्यांच्या निकालांवर परिणाम करण्यासाठी समाज माध्यमांचा वापर

## माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचा दावा

◆ **नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर**

खटल्यांच्या निकालांवर प्रभाव टाकण्यासाठी विशेष स्वारस्य असलेल्या गटांकडून समाज माध्यमांचा वापर केला जात आहे, असा दावा माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी रविवारी केला. न्यायमूर्तींनी त्यापासून सावध राहणे आवश्यक असल्याचा इशारा त्यांनी दिला.



आजकाल लोक युट्यूब किंवा इतर समाज माध्यमांवर पाहिलेल्या २० सेकंदांच्या चित्रफितीवरून स्वतःचे मत तयार करतात. हा धोकादायक प्रकार असल्याचे चंद्रचूड यांनी सांगितले. आज काही विशेष स्वारस्य गट, दबाव गट तयार झाले आहेत. ते समाज माध्यमाचा वापर करून न्यायालयांच्या मनावर आणि खटल्यांच्या निकालावर परिणाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

प्रत्येक नागरिकाला निर्णयाचा आधार काय आहे, हे समजून घेण्याचा आणि न्यायालयाच्या निर्णयांवर त्यांचे मत व्यक्त करण्याचा आधिकार आहे. पण, जेव्हा हे न्यायालयाच्या निर्णयांच्या पुढे वैयक्तिक पातळीवर न्यायमूर्तींना लक्ष्य करतात, त्यावेळी मूलभूत प्रश्न निर्माण होतात. हा प्रकार खरेच अभिव्यक्ती स्वातंत्र्यात येतो का? म्हणून प्रत्येकजण युट्यूब किंवा कोणत्याही समाज माध्यमावर जे पाहतो, त्याबद्दल २० सेकंदात मत बनवू इच्छितो. त्यामुळे गंभीर धोका निर्माण झाला आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# सहा ते सात आमदारांमागे एक मंत्रिपद

## असा असू शकतो फॉर्म्युला

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने ऐतिहासिक विजय मिळविला. २८८ सदस्यीय विधानसभेत महायुतीने २३४ जागा जिंकल्या. आता सरकार स्थापन करण्यासोबतच महायुतीतील घटक पक्ष मंत्रिपदाच्या मुद्यावर चर्चा करीत आहेत. सूत्रांच्या मते, महायुतीतील मंत्रिपद वाटपाचा फॉर्म्युला ठरला असून, सहा ते सात आमदारांच्या मागे एक मंत्रिपद, असे हे सूत्र राहण्याची शक्यता आहे.

महायुतीतील घटक असलेल्या भाजपाने १३२, शिवसेनेने ५७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसने ४१ जागांवर विजय मिळविला. या तिन्ही पक्षांनी आपापल्या नवनिर्वाचित आमदारांना विजयाचे प्रमाणपत्र घेऊन शक्य तितक्या लवकर मुंबईत येण्यास सांगितले आहे. त्यातच आज सकाळी तिन्ही घटक पक्षांच्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली. यात सत्तेतील वाटा असा असेल, यावर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

समोर आलेल्या माहितीनुसार, ज्या पक्षाचे जितके आमदार निवडून आले, त्यांच्या संख्येनुसार मंत्रिपदांचे वाटप केले जाईल. सहा ते सात आमदारांच्या मागे एक मंत्रिपद, असे हे सूत्र असण्याची शक्यता आहे. यानुसार, १३२ जागा जिंकणाऱ्या भाजपाला नव्या सरकारमध्ये २२ ते २४ मंत्रिपदे, ५७ जागा जिंकणाऱ्या शिवसेनेला १० ते १२ आणि ४१ जागा जिंकणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला ८ ते १० मंत्रिपदे मिळतील, असा अंदाज आहे. (वृत्तसंस्था)

# शिवसेनेने उबाठावर केली ३६ जागांवर मात

## १४ जागांवर झाला पराभव

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

एकनाथ शिंदे यांच्याच नेतृत्वाखालील पक्ष खरी शिवसेना आहे, यावर निवडणूक आयोगानंतर आता महाराष्ट्रातील मतदारांनीही शिक्कामोर्तब केले आहे. या खऱ्या शिवसेनेने विधानसभा निवडणुकीत ३६ जागांवर उद्धव ठाकरे यांच्या गटाचा पराभव केला, तर उबाठाने १४ जागांवर शिवसेनेला मात दिली.

महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेने विधानसभा निवडणुकीत ८१ जागा लढविल्या होत्या. त्यातील ५७ जागांवर विजय मिळविला आहे. तिथेच, महाविकास आघाडीचा भाग असलेल्या उबाठा गटाने ९५ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. मात्र, या पक्षाला अवघ्या २० जागांवर विजय मिळविता आला.

उद्धव ठाकरे यांनी २०१९ मध्ये मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत हातमिळवणी करून महाविकास आघाडी स्थापन केली आणि मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी एकनिष्ठ असलेल्या एकनाथ शिंदे यांनी सुमारे ४० आमदारांसह वेगळा गट स्थापन केला आणि भाजपाशी युती केली होती. यामुळे शिवसेनेत आजवरची सर्वांत मोठी फूट पडली होती. (वृत्तसंस्था)

# राकाँने केला शरद पवार गटाचा २९ जागांवर पराभव

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेसने शरद पवार गटाला राज्यात २९ जागांवर मात दिली आहे. तिथेच, सहा जागांवर शरद पवार गटाने राष्ट्रवादी काँग्रेसचा पराभव केला.

महायुतीचा भाग असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकीत ५९ जागा लढविल्या होत्या. त्यातील ४१ जागांवर मिळवला. त्याचप्रमाणे शरद पवार गटाने ८६ जागांवर उमेदवार उभे केले होते. मात्र, या पक्षाला अवघ्या १० जागांवर समाधान मानावे लागले. राष्ट्रवादी काँग्रेसने शरद पवार गटासोबतच्या थेट लढतीत २९ जागांवर विजय मिळविला.

शिवसेनेतील मोठ्या फुटीनंतर मागील वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही फूट पडली आणि अजित पवार यांच्या नेतृत्वात ४१ आमदारांचा एक मोठा गट बाहेर पडला. हा गटही भाजपा-शिवसेना सरकारमध्ये सहभागी झाला होता.

अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. हा वादही निवडणूक आयोगाकडे गेल्यानंतर आयोगाने अजित पवार यांचा पक्ष खरा राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचा निकाल दिला होता. (वृत्तसंस्था)



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत रविवारी हैदराबाद येथील लोकमंथन भाग्यनगर २०२४ च्या समारोपीय समारंभात सहभागी झाले होते. यावेळी केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांनी सरसंघचालकांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला

# संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून

◆ **नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर**

संसदेचे हिवाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू होत आहे. २० डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात वक्फ दुरुस्ती विधेयकासह अनेक महत्त्वपूर्ण विधेयक सादर केली जाणार आहेत. एक देश एक निवडणूक बाबतचे विधेयक या अधिवेशनात सादर केले जाण्याची चर्चा होती; मात्र जी विधेयके या अधिवेशनात सादर केली जातील, त्याच्या यादीत या विधेयकाचा समावेश नाही.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची उडालेली दाणादाण पाहता या अधिवेशनात सत्ताधारी पक्ष आक्रमक तर विरोधी पक्ष बचावात्मक पवित्र्यात दिसणार आहे. दुसरीकडे, अदानी प्रकरणावरून काँग्रेस आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सरकारला घेरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

काँग्रेस महासचिव प्रियांका वढेरा यांचेही पहिलेच अधिवेशन ठरणार आहे. वायनाडमधून निवडून आल्यानंतर प्रियांका वढेरा लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेत लोकसभेत येऊ शकतात. भारताच्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मंगळवारी संविधान सदनात म्हणजे जुन्या संसद भवनाच्या केंद्रीय कक्षात दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक होणार आहे. (तभा वृत्तसेवा)

# मिळाल्या जागा १६ अन् वाजले की बारा!

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २४ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने राज्यात १६ जागा जिंकत महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरचा नीचांक गाठला आहे. विशेष म्हणजे, या नीचांकात उबाठा तसेच शरद पवार गटानेही त्यांना तेवढीच तोलामोलाची साथ दिली. महाविकास आघाडीतील आपला सहकारी पक्ष एकटा पडणार नाही, याची काळजी घेतली.

महाविकास आघाडीत काँग्रेस हा एकमेव राष्ट्रीय पक्ष आहे, त्यामुळे त्याचे हे अपयश उठून दिसणारे आहे. शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस कधीकाळी राष्ट्रीय पक्ष होता; मात्र त्याने आपला हा दर्जा गमावला आहे.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने देशात ४४ जागा जिंकल्या होत्या. त्यावेळी त्याला लोकसभेत विरोधी पक्षनेतेपदही मिळू शकले नव्हते. तशीच स्थिती यावेळी काँग्रेसची महाराष्ट्रात झाली. काँग्रेसला फक्त १६ जागांवर समाधान मानावे लागले. २०१९ च्या तुलनेत काँग्रेसच्या २८ जागा कमी झाल्या. त्यावेळी काँग्रेसने ४४ जागा जिंकल्या होत्या. १९९९ नंतर म्हणजे काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी करून निवडणुका लढवायला सुरुवात केल्यानंतर कधीच शंभरीचा आकडा त्या पक्षाला गाठता आला नाही.

गेल्या काही निवडणुकांचा आढावा घेतला, तर २००९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला ८२ जागा मिळाल्या होत्या. २००४ च्या निवडणुकीत ६९ जागा, १९९९ मध्ये ७५ जागा आणि २०१४ मध्ये काँग्रेसला ४२ जागा मिळाल्या.



**महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरची काँग्रेसची नीचांकी कामगिरी**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर १९६२ मध्ये राज्यात झालेल्या पहिल्याच निवडणुकीत काँग्रेसने २६४ पैकी २१५ जागा जिंकल्या होत्या. १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत २७० जागांसाठी निवडणूक झाली. त्यापैकी काँग्रेसने २०३ जागा जिंकल्या. १९७२ च्या निवडणुकीत काँग्रेसने आपल्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावत २२२ जागा पटकावल्या. आणिबाणीनंतर काँग्रेस पक्षात फूट पडून काँग्रेस देवराज अर्स आणि इंदिरा काँग्रेस असे दोन गट पडले. १९७८ च्या निवडणुकीत या गटांनी मिळून १३१ जागा जिंकल्या आणि राज्यात सरकार स्थापन केले. त्यावेळी इंदिरा काँग्रेसने ६२ जागा जिंकल्या होत्या.

१९८० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने १८६ जागा जिंकत पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित केले. यावेळी काँग्रेसला ४६ जागा मिळाल्या होत्या. १९८५ च्या निवडणुकीत काँग्रेसने १६१ जागा जिंकल्या. १९९० च्या निवडणुकीत १४१ जागा मिळाल्या, तोपर्यंत झालेल्या सर्व निवडणुकीतील त्या सर्वांत कमी जागा होत्या. १९९५ मध्ये राज्यात शिवसेना-भाजपाचे सरकार स्थापन झाले. येथूनच राज्यात काँग्रेसची घसरण सुरू झाली, काँग्रेसला फक्त ८० जागा जिंकता आल्या. १९९९ मध्ये ७५ जागा जिंकल्या. यावेळी १६ जागा जिंकत राज्यात आपले बारा वाजले असल्याचे काँग्रेसने दाखवून दिले आहे. राहुल गांधींच्या नावावर आणखी एका अपयशी विक्रमाची नोंद झाली.

## अग्रलेख...

# जनादेशाचा अपमान करू नका

२०१९ साली भारतीय जनता पार्टीसोबत युती करून निवडणुका लढल्या, सभांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मदत घेतली, प्रत्येक सभेत मोदी आणि अमित शाह यांनी देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आहेत, हे स्पष्टपणे सांगितले. असे असतानाही प्रत्यक्ष निवडणूक निकाल लागल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबत न राहता जनतेने नाकारलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत हातमिळवणी केली. महाराष्ट्रातील जनता हे विसरलेली नाही. खरे तर हा जनादेशाचा अनादर होता. मतदारांनी भाजपा-शिवसेना युतीला कौल दिला होता. भाजपाला १०५ आणि शिवसेनेला ५६ जागा मतदारांनी दिल्या होत्या. या युतीने २८८ पैकी १६१ जागा पदरात पाडून घेत निर्विवाद बहुमत मिळविले होते. मात्र, उद्धव ठाकरे यांनी बंद खोलीत झालेल्या चर्चेचा दाखला देत मुख्यमंत्रिपद मागितले आणि त्याआधारे भाजपाला अक्षरश: ब्लॅकमेल केले. भाजपाच्या कोणत्याही नेत्यांचे फोन उद्धव ठाकरे उचलत नव्हते. मातोश्रीकडून भाजपाला प्रतिसादच मिळत नव्हता. ही बाब देवेंद्र फडणवीस यांनी नंतरच्या काळात जाहीरपणे सांगितलीही होती. भाजपाला दूर सारत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या साथीने उद्धव ठाकरे यांनी सरकार स्थापन केले आणि स्वत: मुख्यमंत्री होत पोराला कॅबिनेट मंत्री केले. मतदारांनी जो कौल दिला होता, त्याचा अपमान उद्धव यांनी केला होता. ते अडीच वर्षे मुख्यमंत्री राहिले. बहुतांश काळ त्यांनी घरी राहूनच राज्यकारभार केला. मंत्रालयात ते मोजक्याच वेळ गेले. फेसबुक लाईव्ह करून त्यांनी जनतेशी संवाद साधल्यामुळे त्यांच्यावर सातत्याने फेसबुक मुख्यमंत्री म्हणून टीकाही झाली. इच्छा नसतानाही सर्व आमदार त्यांच्यासोबत जरूर गेले होते. पण, काँग्रेस आणि राकाँसोबत त्यांचा जीव गुदमरत होता. ज्या एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करू असे आश्वासन उद्धव यांनी दिले होते, ते शिंदे तर फारच अस्वस्थ होते. त्यांना हिंदुत्वाचा मार्ग सोडायचा नव्हता. त्यामुळे अस्वस्थतेतूनच त्यांनी ठाकरेंना फारकत देत भाजपासोबत जाऊन सरकार स्थापन केले. त्यांच्या नेतृत्वातील सरकारला यशस्वी अडीच वर्षे पूर्ण झाली असतानाच राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्यात आणि या निवडणुकांमध्ये जो प्रचंड जनादेश महायुतीला म्हणजेच भाजपा-शिंदेंची शिवसेना-अजित पवार यांच्या महायुतीला मिळाला, तो नाकारण्याचे करंटेपण राज्यातील विरोधकांकडून, विशेषत: उद्धव ठाकरे यांच्याकडून दाखविले जात आहे. महाराष्ट्रातल्या जनतेने महायुतीच्या पारड्यात भरघोस मते टाकली असताना हा निकाल मान्य न करण्याचा करंटेपणा ठाकरेंकडून केला जात आहे. खरे तर हा जनमताचा अनादर आहे. लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला होता आणि महाविकास आघाडीला भरघोस जागा मिळाल्या होत्या तेव्हा भाजपा वा शिंदेंनी तर नाराजी व्यक्त केली नव्हती. पराभव स्वीकारून या दोन्ही पक्षांनी आत्मचिंतन केले होते. त्यातून धडा घेत झालेल्या चुका दुरुस्त केल्या आणि महायुती विधानसभेच्या निवडणुकीला सामोरी गेली. अडीच वर्षांत महायुतीच्या सरकारने केलेल्या कामांना पसंती देत आणि सरकारच्या कामगिरीवर विश्वास ठेवत मतदारांनी पुन्हा एकदा महायुतीला महाकौल दिला. हा कौल मान्य न करता, झालेल्या पराभवाबाबत आत्मचिंतन न करता निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यातच उद्धव ठाकरे, त्यांचे विश्वप्रवक्ते संजय राऊत धन्यता मानत असतील तर त्यांचे जे शिल्लक अस्तित्व आहे, तेही संपुष्टात येईल. आज त्यांचे जे २० आमदार निवडून आले आहेत, त्यातील आदित्य ठाकरे आणि वरुण सरदेसाई हे दोन सोडले तर इतर १८ आमदार संपूर्ण पाच वर्षे सोबत राहतील काय, याचा विचार उद्धव यांनी करायला नको? रडीचा डाव खेळण्यापेक्षा निवडणुकीत प्रचार करताना ज्या आक्रमकपणे तुम्ही टीका करीत होतात, त्याच आक्रमकपणे पराभवाला सामोरे जात जनादेश नम्रपणे स्वीकारण्याचे औदार्य दाखविणे आवश्यक आहे. निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर विश्वप्रवक्ते ज्या पद्धतीने प्रतिक्रिया देत होते, ती पद्धत लक्षात घेतली तर लोकशाहीवर आणि संविधानावर त्यांचा विश्वास नसल्याचेच प्रतीत होत होते. शनिवारी सायंकाळी उद्धव ठाकरे यांनी घेतलेली पत्रकार परिषद निरर्थक होती. अतिशय बालिशपणे ते मुद्दे मांडत होते. राज्यातल्या जनतेने जो कौल दिला, त्याचा स्वीकार करत कुठे चुका झाल्यात, याचा आम्ही विचार करू, त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न करू असे सांगत महायुतीचे अभिनंदन केले असते तर उद्धव ठाकरे यांच्या मनाचा मोठेपणा दिसला असता. त्यांच्या ठायी राजकीय परिपक्वता आहे, हेही राज्याला दिसले असते. ते स्वत:ला मर्द गडी म्हणत असतात. तो मर्दपणाही दिसला असता. पण, असे काही करण्याऐवजी त्यांनी ईव्हीएमवर आक्षेप घेतला. पंतप्रधान मोदी आणि शाह यांच्यावर टीका केली. पत्रकार परिषदेत त्यांनी एक अतिशय बालिश प्रश्न केला. जो निकाल लागला आहे, तो मतदारांना मान्य आहे काय, हा अतिशय हास्यास्पद प्रश्न त्यांनी केला. अहो, उद्धव ठाकरे मतदारांना मान्य होता, म्हणूनच त्यांनी महायुतीला कौल दिला. तुम्ही स्वत: मतदान केले, तुम्ही जे बटण दाबले तिथेच तुमचे मत गेले, याची तुम्ही खात्री केली होतीच ना? तशीच खात्री प्रत्येक मतदाराने केली. त्यामुळे महायुतीला जिंकवण्यात ईव्हीएमचे वेगळे योगदान असण्याचा प्रश्न येतोच कुठे? पराभव मान्य करायचे सोडून कशाला जनमताचा अपमान करताहात? एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत शिवसेना सोडून गेलेल्यांना तुम्ही सातत्याने गद्दार म्हणत आला आहात; ती बाब जनतेला पसंत पडलीच नव्हती मुळात. कारण, शिंदेंच्या आधी तुम्ही आणि तुमच्या पक्षाने जनमताशी गद्दारी केली होती. भाजपासोबत राहण्यासाठी तुम्हाला कौल मिळाला होता. तुम्ही काय केलंत? तुम्ही तो अमान्य करत मतदारांनी नाकारलेल्या शरद पवारांसोबत गेलात, ज्यांना तुमचे पिताश्री शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनीही कायम विरोध केला होता. तुम्ही तुमच्या पित्याने दाखविलेल्या मार्गावरून न चालता वेगळी वाट धरली. तेव्हा आपण जनमताशी गद्दारी करतो आहोत, असे एकदाही तुम्हाला का वाटले नाही? कारण, तुम्ही भाजपाचा, विशेषत: देवेंद्र फडणवीस यांचा सूड उगवण्याच्या नादात आंधळे झाला होतात. सूडाने तुम्ही एवढे पेटून उठला होतात की, आपण जनादेशाचा अनादर करतो आहोत, मतदारांच्या पाठीत खंजीर खुपसतो आहोत, याचेही भान तुम्हाला राहिले नाही. ही बाब तर तुम्ही अमान्य करूच शकत नाही आणि तुम्ही कितीही अमान्य केलीत तरी जनता सर्व काही उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. दूध पिताना मांजर डोळे मिटून घेते, याचा अर्थ इतरांना तुमची चोरी दिसत नाही, असे नाही. त्यामुळे तुम्ही ज्या चुका करता आहात त्याकडे जनतेचे लक्ष आहे. मतदारांनी महायुतीला कौल दिला आहे, त्यावर शंका घेऊन तुम्ही मतदारांचा अपमान करत आहात. लोकशाहीने दिलेला अधिकार त्यांनी वापरला, महायुतीला कौल दिला, तो तुम्ही स्वीकारला पाहिजे. ईव्हीएमच्या नावाने, निवडणूक आयोगाच्या नावाने विनाकारण थयथयाट करून स्वत:च्या निराशेचे असे किळसवाणे प्रदर्शन करू नका. तुम्ही ज्याप्रकारे निकालांवर शंका घेत आहात, तो प्रकार बघता तुमचा डॉ. बाबासाहेबांच्या संविधानावर विश्वास नाही असाच होतो. त्यामुळे भाजपा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांना संविधानाचे दाखले देण्याचे थांबवून आधी तुम्ही संविधान आत्मसात करा. जनता पुढल्या वेळी तुम्हाला कौल देईल. पण, हे करायचे सोडून तुम्ही निरर्थक टीका करण्यातच वेळ घालवणार असाल तर मतदार तुम्हाला पुढेही स्वीकारणार नाही. शरद पवार यांच्या चिथावणीला बळी पडून तुम्ही गेल्यावेळी जनादेशाशी गद्दारी केली होती, त्यासाठी माफी मागा. ज्या पवारांसोबत तुम्ही गेला होतात, त्या पवारांचे जे १० आमदार आज निवडून आले आहेत, त्यापैकी अनेक जण आज अजित पवारांच्या संपर्कात आहेत, हे लक्षात घ्या. अन्यथा, तुमच्या २० पैकी अनेक जण पुन्हा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जातील, हेही लक्षात ठेवा.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# मणिपूर पुन्हा भडकले!

संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत असून, यात वादग्रस्त वक्फ विधेयकासह १४ विधेयके मांडण्याची तयारी सरकारने केली आहे. दुसरीकडे सरकार व विरोधक यांच्यातील संघर्ष या अधिवेशनात वाढलेला दिसण्याची चिन्हे आहेत. मणिपूरमधील बिघडलेली स्थिती हे त्याचे कारण राहणार आहे. मणिपूरमधील स्थिती काहीशी निवळली होती. पण, अचानक मैतेई व कुकी या दोन समाजांमधील संघर्ष पुन्हा उफाळून आला आणि राज्याच्या काही भागांत कमालीचा तणाव निर्माण झाला.

**७ नोव्हेंबरची घटना :** मणिपूरमधील ताजा हिंसाचार ७ नोव्हेंबरच्या एका घटनेनंतर सुरू झाला. जिरिबाम जिल्ह्यातील एका खेड्यात सहा मृतदेह सापडले. यात काही लहान मुले होती. कुकी युवकांनी त्यांचे अपहरण करून नंतर त्यांना ठार केले होते. याची प्रतिक्रिया मैतेई समाजातून उमटणार होतीच. मैतेईंच्या एका गटाने झैरावन खेड्यावर हल्ला चढवीत काही महिलांवर बलात्कार करून नंतर त्यांची हत्या केली. यातून संघर्ष भडकला.

**११ नोव्हेंबर :** केंद्रीय राखीव पोलिस दल मैतेईंच्या बाजूने आहे, असे वाटल्याने कुकी बंडखोरांनी ११ नोव्हेंबर रोजी केंद्रीय राखीव पोलिसांवर हल्ला चढविला. यावेळी झालेल्या चकमकीत १० कुकी युवक ठार झाले. हा हल्ला करणारे कुकी युवक राज्याच्या दूरवरून आले होते. केंद्रीय पोलिसांसोबत झालेली ही चकमक जवळपास १० मिनिटे चालली होती. ठार झालेले युवक कुकी बंडखोर होते, असा दावा सरकारकडून केला जात आहे.

**शवपेटिका मोर्चा :** कुकी समाजाच्या या १० युवकांचे पार्थिव देह अद्याप स्थानिक रुग्णालयाच्या शवागारात असून, त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० शवपेटिका असलेला एक मोर्चा काढण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी काळे शर्ट घालून या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन कुकी समाजाने केले होते. या सर्व युवकांचा शवचिकित्सा अहवाल यांच्या कुटुंबीयांना दिला जाईपर्यंत त्यांचा अंत्यविधी न करण्याचा निर्णय कुकी समाजाने घेतला आहे. याऐवजी शवपेटिका मोर्चा काढण्यात येत आहे. त्यानुसार राज्याच्या काही भागांत असे मोर्चे काढण्यात आले. याने राज्यात पुन्हा तणाव निर्माण झाला असल्याचे समजते.

**खोरे विरुद्ध पर्वतीय भाग :** मणिपूरमधील या वादाने राज्यात भौगोलिक सीमाही तयार झाल्या आहेत. राजधानी इम्फाळ भागातील मैतेई विरुद्ध पर्वतीय भागातील कुकी असे या संघर्षाचे स्वरूप तयार झाले आहे. मैतेई विरुद्ध कुकी हे विभाजन वा ध्रुवीकरण अतिशय खोलवर झाले असल्याचे दिसून येत आहे. या दोन समाजांत निर्माण झालेली दरी बुजविण्यासाठी राज्य सरकार वा केंद्र सरकार यांना ठोस उपाययोजना करावी लागेल, असे आता मानले जात आहे.



राज्य सरकारला एका समाजाचा समर्थक मानले जात असल्याने केंद्र सरकारलाच यात पुढाकार घेऊन काही पावले उचलावी लागतील, असेही म्हटले जात आहे. विशेष म्हणजे मैतेई विरुद्ध कुकी या वादाने पक्षाच्या सीमारेषा केव्हाच ओलांडल्या आहेत.

**सरकार स्थिर :** राज्यातील कोनराड संगमा यांच्या पक्षाने मणिपूर सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली आहे. ६० सदस्यांच्या राज्य विधानसभेत बिरेन सिंग सरकारजवळ ३८ सदस्यांचा पाठिंबा असून काही सदस्यांनी सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची घोषणा केली असली, तरी त्याचा सरकारच्या स्थिरतेवर कोणताही परिणाम होणार नाही, असा दावा सरकारी गोटातून केला जात आहे. या साऱ्याचे पडसाद संसद अधिवेशनात उमटण्याची शक्यता आहे.

**तातडीने कारवाई :** मणिपूरमध्ये तणाव निर्माण होताच केंद्र सरकारने याची दखल घेत राज्यात निमलष्करी दलाच्या जवळपास ५० कंपन्या म्हणजे ५००० जवान पाठविले असून, त्यांनी राज्यातील स्थिती नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना सुरू केली आहे. मात्र, याचा फारसा सकारात्मक परिणाम राज्यात दिसून आलेला नाही. परिस्थिती जैसे थे असल्याचे समजते. मणिपूरमधील स्थितीबाबत केंद्रीय गृहमंत्रालयात बैठकी होत असून, केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या महासंचालकांना तेथे पाठविण्यात आले आहे. राज्यातील स्थितीचा अंदाज घेण्यास त्यांना सांगण्यात आले असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर गृहमंत्रालय यासंदर्भात पुढील कारवाई करील असे समजते. मणिपूरबाबत मुख्य विरोधी पक्ष काँग्रेसने दोन प्रमुख मागण्या केल्या आहेत. गृहमंत्री अमित शाह यांनी राजीनामा द्यावा व पंतप्रधानांनी मणिपूरला भेट द्यावी या त्या दोन मागण्या असून, या मागण्या राजकीय असल्याने त्याला केंद्र सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळण्याची चिन्हे नाहीत.

**दिल्लीतील धमाका :** नववर्षाच्या पहिल्या तिमाहीत राजधानी दिल्लीत विधानसभा निवडणूक होत असून केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाला मोठा धक्का देत दिल्ली सरकारचे एक मंत्री कैलास गहलोत यांनी मंत्रिपदाचा व आपचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला. गहलोत हे केजरीवाल यांचे विश्वासू होते. मात्र, मनीष सिसोदिया यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याकडे असलेले अनेक विभाग केजरीवाल यांनी विद्यमान मुख्यमंत्री आतिशी सिंग यांच्याकडे सोपविल्यानंतर गहलोत नाराज झाले आणि आतिशी सिंग यांना मुख्यमंत्री करण्यात आल्यानंतर तर गहलोत यांची नाराजी अधिकच वाढली. दिल्ली सरकारच्या कामकाजात आपल्याला सातत्याने डावलले जात आहे, अशी भावना त्यांच्या मनात तयार झाली आणि याचेच पर्यवसान गहलोत यांनी सरकार व पक्ष सोडण्यात झाले. गहलोत यांचा राजीनामा सीबीआय व प्रवर्तन निदेशालयाच्या दबावाखाली झाला असल्याचे आपमधून सांगितले जात असले, तरी त्यात काहीही तथ्य नाही. गहलोत स्वत:ला तिसऱ्या क्रमांकाचे मंत्री व नेता समजत होते. केजरीवाल-सिसोदिया तिहारमध्ये गेल्यानंतर मुख्यमंत्रिपदी आपली वर्णी लागेल, असे त्यांना वाटत होते. ते झाले नाही. त्यांनी राजीनामा दिला, असे आपच्याच एका नेत्याने सांगितले आहे.

**जाट चेहरा :** गहलोत हे प्रभावशाली मानल्या जाणाऱ्या जाट समाजाचे आहेत. ते आपचा जाट चेहरा होते. अण्णा हजारे आंदोलनापासून ते आपशी जुळलेले होते. त्यांचा राजीनामा आम आदमी पक्ष व केजरीवाल यांच्यासाठी एक मोठा धक्का मानला जातो. पक्षाने विधानसभा निवडणुकीची तयारी चालविली असता हा धक्का बसल्याने आपमध्ये काहीशी चिंता निर्माण झाली आहे. येणाऱ्या काळात राजधानीत आम आदमी पक्ष व भाजपात आयाराम-गयारामचे राजकारण सुरू होईल असे दिसते. भाजपाच्याही एका आमदाराने आम आदमी पक्षात प्रवेश केला. निवडणूक तयारीत आघाडी घेत केजरीवाल यांनी गुरुवारी आपल्या पक्षाच्या ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. ते लवकरच आणखी काही नावे घोषित करण्याची शक्यता आहे. राजधानीत जनमताचा कानोसा अद्याप स्पष्ट झाला नसला, तरी आम आदमी पक्षाचे पारडे आजही जड असल्याचे मानले जाते. सहानुभूती घटक हे त्याचे मुख्य कारण सांगितले जाते. यामुळे होणारा फायदा किती मोठा वा लहान असेल हे मात्र कुणालाही सांगता येत नाही. केंद्रात भाजपा, दिल्लीत आम आदमी पक्ष हे चित्र या निवडणुकीतही कायम राहण्याची चिन्हे सध्या तरी दिसून येत आहेत. मात्र, केजरीवाल यांना २०१५ व २०२० या दोन्ही निवडणुकीत जो एकतर्फी जनादेश मिळाला तो यावेळी मात्र मिळणार नाही, असे निश्चितपणे सांगता येईल.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# २६/११ आणि ताज..!

बरोब्बर १६ वर्षांपूर्वी, २६ नोव्हेंबर २००८ रोजी भारताची आर्थिक राजधानी मुंबईवर पाकिस्तानी अतिरेक्यांनी हल्ला केला. या दहा अतिरेक्यांनी २६ ते २९ नोव्हेंबर असे तीन दिवस मुंबईकरांना अक्षरश: वेठीस धरून १२ ठिकाणांवर १७५ जीव घेतले. सोळा वर्षे झाल्यानंतरसुद्धा '२६/११' अशी ही ओळख आणि जखम आजही भळभळत आहे. आज २०२४ मध्ये या हल्लेखोरांनी लक्ष्य केलेल्या हॉटेल ताजची आठवण प्रकर्षाने झाली. या ताजचे आणि टाटा ग्रुपचे सर्वेसर्वा रतन टाटा यांचे नुकतेच, ९ ऑक्टोबर २०२४ ला निधन झाले. या निमित्ताने २००८ च्या अतिरेकी हल्ल्याची आठवण झाली. मुळात 'ताजमहाल पॅलेस' नाव असलेल्या या हॉटेलची पुढे 'ताज' अशीच सोपी, सुटसुटीत ओळख झाली. डिसेंबर १९०३ मध्ये रतन टाटांचे पणजोबा जमशेद टाटा यांनी हे हॉटेल सुरू केले. आज सव्वाशे वर्षांनंतरही 'ताज म्हणजे ताजच' अशी ख्याती या हॉटेलने टिकवून ठेवली आहे. मुंबईतील अरबी समुद्र आणि गेट वे ऑफ इंडियाच्या विहंगम भागात हे हॉटेल आहे. मुंबईत गेलेला प्रवासी किंवा पर्यटक 'ताज'ला बाहेरूनही पाहून समाधानी होतो. 'ताज'च्या दोन इमारती असून एक जुनी अभिजात पारंपरिक शैलीतील असून दुसरी अत्याधुनिक बहुमजली आहे. जुन्या १९०३ च्या इमारतीत जुने पेंटिंग्ज, फर्निचर, सजावट इतकी अप्रतिम आहे की एखाद्या म्युझियमचाच भास होतो. येथे ४२ विशेष सूट्स् आणि २८५ खोल्या आणि नव्या ताज टॉवरमध्ये २७५ अशा एकूण ६०२ खोल्या आहेत.

आज जगातील अव्वल हॉटेल मानल्या जाणाऱ्या मुंबईच्या या ताजमध्ये आज प्रतिदिन राहण्याचा खर्च २० ते २५ हजार रुपये असावा. सहज म्हणून मराठीतील सार्वकालिक लोकप्रिय साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचे एक व्यक्तिचित्र आठवले. त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या संग्रहात 'नंदा प्रधान' हा लेख आहे. हा नंदा अमेरिकेत असतो. तो एकदा पुलंना मुंबईत भेटतो. ते नंदाला विचारतात, मुंबईत राहतोस कुठे? तो सांगतो, ताजमध्ये. त्या ताजच्या आसपासही फिरण्याचीसुद्धा माझ्यात ऐपत नाही असे सांगून ते, अरे बापरे काय भयंकर महाग हे हॉटेल, अशी प्रतिक्रिया देतात. दिवसाला १५-१६ रुपये पडतात ना, असे विचारल्यानंतर नंदा सांगतो. ४५ रुपये..! असा १९६३ मधील या लेखात उल्लेख आहे. याचा अर्थ त्यावेळी या पंचतारांकित 'ताज'मध्ये राहण्याचे फक्त ४५ रुपये लागत होते आणि आता २० ते २५ हजार रुपये. अशा या वैभवशाली ताजला पाकी अतिरेक्यांनी 'टार्गेट' केले होते. पाकिस्तानी १० अतिरेक्यांनी मुंबईत १२ ठिकाणी हे हल्ले केले होते. त्या शिवाय छत्रपती शिवाजी टर्मिनस (सीएसटी) रेल्वे स्टेशन, कामा हॉस्पिटल, ताज, ओबेरॉय व लिओपोल्ड ही सारी गर्दीचीच ठिकाणे होती. 'ताज'मध्ये प्रवेश केल्याबरोबर चार अतिरेक्यांनी एके-४७ मधून गोळीबार करत हॉटेलभर आणि वरच्या मजल्यावरसुद्धा गोंधळ घातला होता. या हल्ल्यात त्यांनी ३१ निरपराधांचे बळी घेतल्याची नोंद आहे. यात वीस पर्यटक आणि 'ताज'चे ११ कर्मचारी होते.

मुंबईवरील या हल्ल्यात भारताचे गृहमंत्री शिवराज पाटील, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि गृहमंत्री आर. आर. पाटील या तीन तत्कालीन काँग्रेसी नेत्यांचाही वेगळ्या अर्थाने, मंत्रिपद गमावून बळी गेला होता. आर. आर. पाटलांनी या हल्ल्याची जबाबदारी घेत राजीनामा दिला. मुख्यमंत्री विलासराव देशमुख 'ताज'ला भेट देत असताना बॉलीवूडवाले रामगोपाल वर्मा व सुपुत्र रितेश देशमुख यांना पर्यटनासाठी नेल्याच्या 'स्टाईल'मध्ये घेऊन गेले होते. त्याची बोंबाबोंब झाल्यावर त्यांचा राजीनामा घेतला गेला. या हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी दिल्लीत याच विषयावर झालेल्या ३ तासांत ३ गंभीर बैठकांमध्ये ३ वेळा कपडे बदलून जाणारे शिवराज पाटील हेही पदच्युत झाले होते. ताजवरील हल्ल्याला त्याचे सर्वेसर्वा रतन टाटा यांनी फारच गंभीरपणे घेतले होते. हा घटनाक्रम अतिशय वेदनादायी असल्याचे ते नेहमीच बोलून दाखवत. 'ताज'वर तीन दिवस अतिरेक्यांचा कब्जा होता. त्याही काळात कणखर टाटा ताजमध्ये जाऊन आले होते. ताजमध्ये जीव गमवाव्या लागलेल्या आपल्या कर्मचाऱ्यांसह ३१ ही जणांसाठी त्यांनी शक्य ते सर्व केले. त्यांना वैद्यकीय व आर्थिक संपूर्ण मदत केली. ८३ कोटी रुपये ताजच्या दुरुस्तीवर खर्च करून त्यांनी महिनाभरातच ताज पुन्हा सुरू करून दाखवले होते. आज जगभरात टाटांच्या या ताज हॉटेल ग्रुपची २५० पेक्षा अधिक हॉटेल्स आहेत. साखळी हॉटेल समूहांमध्ये ताज अनेक वर्षांपासून जगात पहिल्या स्थानावरच आहे. 'आपल्या देशात खरे उद्योगपती टाटाच, बाकीचे जवळपास सर्व विस्तारित व्यापारीच' अशी ओळख असलेला टाटा समूह १०० वर्षांतील दानशूरांच्या जागतिक यादीत अव्वल आहे. १८८२ पासून शिक्षण व आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या टाटांच्या शंभर वर्षांतील देणग्यांचे मूल्य ७.६० लाख कोटी रुपये आहे. तर बहुचर्चित बिल गेट्स दुसऱ्या स्थानावर, टाटांपेक्षा २ लाख कोटींनी कमी, म्हणजे ५.५३ लाख कोटींवर आहेत. 'वाह टाटा' क्या बात..!

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# विजयाचे पद पुढे टाकिले...

'देदीप्यमान विजय' असेच भारतीय जनता पार्टीच्या विजयाचे वर्णन करावे लागेल. सर्व दूरचित्रवाहिन्यांनी त्रिशंकू सरकार येईल किंवा भारतीय जनता पार्टीला निसटता विजय मिळेल, अशा पद्धतीचे भाकीत केले होते. परंतु या सर्व अंदाजांना चुकीचे ठरवून भारतीय जनता पार्टीने यश प्राप्त केलेले आहे. निवडणुकीच्या आधी बरेच पाणी वाहून गेलेले आहे. अनेक प्रकारच्या घडामोडी, दूषित वातावरण महाराष्ट्राने अनुभवलेले आहे. या सर्व प्रकारांची सुरुवात २०१९ मध्ये झाली. ज्यावेळेस भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांना महाराष्ट्रातील जनतेने सरकार स्थापन करण्याचा जनादेश दिलेला होता. परंतु उद्धव ठाकरे यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी आणि खुर्चीच्या मोहासाठी भारतीय जनता पार्टीशी २५ वर्षांपासून असलेली युती तोडली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी म्हटले होते की, 'मी कधीही शिवसेनेची काँग्रेससोबत युती होऊ देणार नाही.' ते विचार खोटे ठरवत आपल्या हिंदुत्वाच्या विचाराला तिलांजली देत शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या सोबत युती केली. साहजिकच ज्या सत्तेमध्ये ते सहभागी झाले व ज्यांच्यासोबत सहभागी झाले, त्यांचे संस्कार त्यांच्यावर होत गेले. एका प्रसंगी १९९२ च्या मुस्लिम दंग्यांमध्ये हिंदू समाजासाठी शिवसेनेने जी आक्रमक भूमिका स्वीकारलेली होती, त्या भूमिकेबद्दलसुद्धा उद्धव ठाकरे यांना मुस्लिम समाजाची माफी मागावीशी वाटली. शिवसेनेने हिंदुत्व सोडले आणि गठ्ठा मतदानासाठी त्यांनी मुस्लिमांचे लांगूलचालन केले. काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार यांच्या मार्गावर शिवसेना उद्धव ठाकरे चालू लागली.

शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्रात जातीयवादी वातावरण निर्माण केले. फडणवीस सरकारच्या काळात एल्गार परिषदेच्या निमित्ताने जातिविद्वेष निर्माण करण्यात आला. त्यानंतर जरांगे यांना समोर करण्यात आले. महाराष्ट्र पेटविला गेला. मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष निर्माण करण्यात आला. भाजपाच्या उमेदवारांना पाडण्याच्या गोष्टी केल्या गेल्या. शरद पवारांनी पहिले उद्धव ठाकरेंना भाजपापासून दूर केले. नंतर जरांगेच्या रूपाने त्यांनी मराठा समाजाला भाजपापासून दूर करण्याचे काम केले. पवारांच्या या खेळीला फडणवीसांनी शिवसेना फोडून व राष्ट्रवादी फोडून उत्तर दिले. उद्धव ठाकरेंचे सरकार पाडून पुन्हा महायुतीचे सरकार आणले.



सर्वच वृत्तवाहिन्या आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे, शरद पवार यांनाच दाखविण्याचे काम करीत होत्या. दोन महिन्यांपूर्वीपासून भाजपाविरोधी वातावरण तयार केले जात होते. भाजपाला फार तर ५० जागा मिळतील, असे चांगले विद्वान सांगत होते. एक्झिट पोलने १२५ जागा सांगितल्या. यावरून आपल्या असे लक्षात येईल की, बरेच वेळा आपण आपल्याला जे बघायचे तेच बघत असतो. एक्झिट पोल आणि सर्व विद्वानांचे असेच झाले. काँग्रेसच्या राज्यात काँग्रेसने कधीच महिलांना काही दिले नाही; परंतु भाजपाने जेव्हा लाडकी बहीण योजना आणली, त्यावेळेस जनतेला खूप आनंद झाला. लाखो महिलांना याचा लाभ झाला. लोकांच्या मनामध्ये भाजपाचे सरकार आले पाहिजे, अशा पद्धतीचा विचार पहिल्यांदा निर्माण झाला व यातूनच भाजपाच्या सरकारची प्रचंड यशाची मुहूर्तमेढ रोवली गेली. परंतु सर्व पोथी पंडित, एक्झिट पोलचे विद्वान, महाराष्ट्राचे जाणते राजे शरद पवार, उद्धव ठाकरे, विश्वप्रवक्ते संजय राऊत, बडबोले नाना पटोले या कोणालाच या सर्व गोष्टींचा अंदाज आला नाही. लाडक्या बहिणींमुळे मतदानाचा टक्का वाढेल, त्यामुळे भाजपाच्या जागा वाढतील, अशा पद्धतीचा विचारच कोणी केला नाही; आणि ज्याचा कोणी विचार केला नाही तेच घडले. महाराष्ट्रामध्ये भाजपाचे सरकार येण्याची अनेक कारणे असतील, पण त्यामध्ये 'लाडकी बहीण'चा प्रमुख सहभाग आहे, हे आता सर्वच मान्य करीत आहेत. परंतु, २०२९ ची निवडणूक ही भाजपाने स्वतंत्रपणे लढविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात सातत्याने भाजपा कोणा ना कोणा साथीदारासोबत निवडणूक लढवीत आहे. त्यामुळे भाजपाचे यश हे नेहमीच मर्यादित यश असते. यावेळेस १४८ जागा लढवून भाजपाच्या १३२ जागा निवडून आलेल्या आहेत. यावरून आपल्या असे लक्षात येईल की, जर भाजपाने स्वबळावर २८८ जागा लढविल्या तर १४४ जागांपेक्षा अधिक जागा भाजपाच्या निश्चितच निवडून येऊ शकतात. भाजपाला राजकीयदृष्ट्या महाराष्ट्रामध्ये स्वतंत्रपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे. कारण ज्या प्रादेशिक पक्षांसोबत भाजपा युती करीत आहे, हे प्रादेशिक पक्ष हे कधीही धोका देऊ शकतात. हे राष्ट्रीय स्तरावरचा विचारच करू शकत नाही. ज्या योजना भाजपा महाराष्ट्रात आणू शकते त्या यांच्या डोक्याच्या पलीकडल्या राहू शकतात. केंद्रामध्ये भाजपाचे सरकार आहे. महाराष्ट्रात भाजपाचे सरकार आलेले आहे. भाजपाने जे यश आज मिळविले ते अंतिम साध्य नाही. राजकारण सत्ता हे साधन आहे व त्याद्वारे समाजाची सेवा करणे व राष्ट्राला परम वैभवापर्यंत पोहोचविणे हे साध्य आहे. अनेक संस्था, संघटना व लाखो कार्यकर्त्यांच्या भरवशावर हे यश मिळालेले आहे, त्या कार्यकर्त्यांचा विसर सत्ता आल्यानंतर भाजपाने पडू देऊ नये, ही स्वाभाविकच कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आता पुढे काय?

मतदान झाले. टक्केवारीवर चर्चा झाली. निकाल जो असेल तो सगळे स्वीकारतील, पण मतदारयादीचा घोळ कसा दुरुस्त होईल? हा प्रश्न मात्र कायम राहतो आहे.

विज्ञानाने बरीच प्रगती केली आहे. तिचा उपयोग यावेळी चांगल्याप्रकारे करण्यात आला. लोक त्यामुळे खुष होते. हे जरी खरे असले तरी यादीचा मूळ आकडा चुकीचा आहे आणि त्यावरूनच टक्केवारीची मांडणी होते. इथे खरी गोम आहे. नगरवार मतदान बघितले तर ८० टक्क्यांच्यावर पण यादीप्रमाणे ५० ते ५५ दरम्यान समोर येते. यामुळे नकारात्मक विचार वाढत जातो. उगाच हे लोक असे आणि ते तसे, अशा मनोकल्पित विचार होऊ लागतो. विषय ताजा आहे. यापुढे अशी वेळ येऊ नये ही मागणी आतापासूनच लावून धरली तर असे वाटते की नकारात्मकता कमी होईल.

● नगराप्रमाणे यादी असावी, ज्यामुळे खूप पाने पलटायचा प्रकार बंद होईल. ● नगराप्रमाणे नावे कमी-जास्त करण्यासाठी योग्य यंत्रणा उभी असावी. ● ॲपचा वापर सहजपणे करता येईल अशी सोय व्हावी. ● मतदान खूप दूरवर जाऊन करणे नेहमीच त्रासाचे असते. त्याकरिता जवळ व्यवस्था झाली तर उत्तम. ● मतदान कार्डाशी आधार लिंक करता आले तर त्याचाही प्रशासनाला फायदाच होईल. चुकीच्या पद्धतीने होणारे मतदान टाळता येऊ शकते. ● नवीन नावनोंदणीसाठी जे ॲप उपलब्ध आहे त्याचा सतत प्रसार केला गेला पाहिजे. आणखी बरेच मुद्दे असू शकतील. पण मनात असलेली खंत ही सहजपणे व्यक्त व्हायला जागा उपलब्ध करून दिली पाहिजे. शासन करेल की नाही, यावर अवलंबून न राहता आपल्या नगरसेवकाजवळ ही नवीनतम माहिती सदैव तयार असावी.

**अतुल ठाकरे**/नागपूर

## विधानसभा निवडणुकीपासून मिळालेला धडा

विधानसभा निवडणूक २०२४ चे निकाल म्हणजे, 'दूध का दूध और पानी का पानी' असे लागले आहेत. या निकालामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा यांनी एकदम सिक्सरच मारला आहे. असे दिसतं. गेल्या सहा महिन्यांपासून त्यांनी जी प्रचंड मेहनत घेतली आहे, त्याचाच हा परिपाक आहे, यात शंका नाही. या निकालावरून खालील गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

१. मतदार अतिशय जागृत झाला आहे. २. स्वत:चे कर्तृत्व न पाहता, दुसऱ्या पक्षाला घालून-पाडून बोलणे, हे आता मतदार सहन करणार नाही. ३. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा मुद्दा सोडून चालणार नाही. ४. जातीचे राजकारण चालणार नाही. ५. विकास कामांनाच महत्त्व आहे. ६. युवा राजकारण्यांना संधी देण्यात यावी. ७. राजकारणात कोणत्या पक्षाबरोबर राहावे याची जाण असावी. ८. स्वत:पेक्षा पक्ष मोठा असून पक्षातील वरिष्ठ मंडळींना आदर देणे गरजेचे आहे. ९. आपल्या पूर्वजांबद्दल आदर असावा. १०. राजकारणात पुत्रप्रेम टाळावे, मुलांना त्यांच्या कर्तृत्वाने मंत्रिपद मिळवू द्यावे. ११. निवडणुकीचे जे निकाल लागलेले आहेत, ते खिलाडूवृत्तीने मान्य करावे. १२. राजकारणात सद्बा. उच्चशिक्षण. उत्तम चरित्र. संयम. चिकाटी व मेहनत आवश्यक आहे. या निकालावरून वरील बाबी सिद्ध झालेल्या आहेत, तसेच हे सरकार पुढील पाच वर्ष उत्तम काम करेल याची खात्री आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

## वाचक पत्रे

## जातीयवादी शक्तींचा पराभव

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी जो जनादेश दिला तो अनेक अर्थांनी लक्षणीय तसेच विरोधकांना आत्मपरीक्षण करण्यास बाध्य करणारा ठरणार आहे. मविआचे सरकार सत्तेत आले की विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्याची वल्गना करणाऱ्या आणि वैयक्तिक हिशेब चुकते करू पाहणाऱ्या, मविआच्या मस्तवाल नेत्यांना जनतेने जबरदस्त चपराक दिली आहे. मविआच्या जनहिताच्या योजना सांगण्याऐवजी माझा बाप-पक्ष चोरला असे सांगून गद्दार, मिंधे, विश्वासघातकी, दगाबाज, खोके, खंडणी, वसुली अशा अपशब्दांची लड लावणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या हातून बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेनाही गेली, यावरही शिक्कामोर्तब झाले. शरद पवारांच्या अवस्थेचे वर्णन करून त्यांच्या ज्येष्ठतेचा अपमान न करता, त्यांनी इतकी वर्षे जे पेरले त्याची किंमत त्यांना चुकवावी लागली, एवढे सांगितले तर पुरेसे आहे.

महाराष्ट्रात आता मविआला विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदही मिळणार नाही अशी व्यवस्था जनता जनार्दनाने करून ठेवली आहे. महाराष्ट्रात हिंदूंमध्ये जातीयवादाचे विष कालवून निवडणूक जिंकण्याचे कारस्थान करणाऱ्या मविआला जनतेने अक्षरशः धूळ चारली. जरांगे फॅक्टर सुद्धा किती तकलादू होता हेही सिद्ध झाले. मुस्लिम समाजानेही मविआच्या कारस्थानाला बळी न पडता जागरूकपणे मतदान केले. आता विरोधक नेहमीप्रमाणे ईव्हीएमचे तुणतुणे वाजवणार आणि महायुतीच्या गगनभेदी विजयाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करणार, हेही उघड आहे. खुल्या दिलाने पराभवाचा स्वीकार करून आत्मपरीक्षण करण्याची इच्छा नसलेल्या नेत्यांना आणि पक्षांना राजकारणात स्थान नाही असाही इशारा जनतेने दिला आहे. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली आणि देवेंद्र फडणवीस-एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांच्या एकतेमुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुती सरकार सत्तेत येत आहे. महायुतीच्या या नवीन सरकारला मनापासून शुभेच्छा!

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## गोरोबा काका पालखीचे स्वागत; तेर येथे दिपोत्सव साजरा

**तेर, दि.२२ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे श्री संत गोरोबा काका यांच्या पालखीचे स्वागत करण्यासाठी ग्राम सेवा संघाच्या वतीने दिपोत्सव २५ नोव्हेंबरला साजरा करण्यात आला. दिपोत्सवाचा शुभारंभ हभप. दिपक महाराज खरात, पद्माकर फंड, विजयकुमार लाड, बालाजी भक्ते याच्या हस्ते करण्यात आला. दपोत्सवाचे नयनरम्य दृश्य पहाण्यासाठी नागरिक उपस्थित होते. गेल्या चार वर्षांपासून तेर येथील ग्रामसेवा संघाच्या वतीने श्री संत गोरोबा काका यांच्या पालखीचे पंढरपूरहून तेर येथे आगमण होताच श्री संत गोरोबा काका यांच्या मंदिराजवळील तेरणा नदीच्या दगडी घाटावर पाच हजार दिवे लावून दिपोत्सव साजरा केला जातो.





## ▶▶क्राईम वृत्त...

### अवैध मद्य विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.२४ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील सारोळा येथे धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत अवैध देशी, विदेशी दारूवर कारवाई करून ३ हजार ५५० रूपयांच्या ३५ बाटल्या जप्त केल्या आहेत. याबाबत माहिती अशी की, आरोपी प्रविण भारत साठे (वय ३५, रा. सारोळा) यांनी दि.२३ नोव्हेंबर रोजी सारोळा शिवारात साई हॉटेल जवळ अंदाजे ३ हजार ५५० रूपये किंमतीच्या देशी, विदेशी दारुच्या ३५ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम- ६५ (ई), अन्वये धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.




### माळुंब्रात चोरी; ७२ हजारांचा ऐवज लंपास

**तुळजापूर, दि.२४ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील माळुंब्रा येथे अज्ञात व्यक्तीने घराचे कुलूप तोडून १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व १८ हजार रूपयांची रक्कम चोरून नेहल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी माहिती अशी की, फिर्यादी राजकुमार तात्या वडणे (वय २५, रा. माळुंब्रा ता. तुळजापूर) यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२३ नोव्हेंबर रोजी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन कपाटातील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम १८ हजार रूपये असा एकुण ७२ हजार रूपये किंमतीचा माल चोरुन नेला, अशी फिर्यादी राजकुमार वडणे यांनी दि.२३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या तक्रारीवरून तामलवाडी पोलीस ठाण्याते भा.न्या.सं. कलम ३३१ (३), ३०५ (अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



### लग्नाचे आमीष दाखवून महिलेवर अत्याचार

**तुळजापूर, दि.२४ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील एका गावातील एका ३८ वर्षीय महिला लग्नाचे आमीष दाखवून वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी तुळजापूर पोलिसात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माहिती अशी की, तुळजापूर तालुक्यातील एका गावातील एक ३८ वर्षीय मुलगी (नाव- गाव गोपनीय) मागील कांही वर्षापासून दि.१६ नोव्हेंबर रोजी ही घरी असताना गावातील एका गावातील तरुणाने तिस लग्नाचे आमीष दाखवून तीच्यावर वारंवार लैंगीक अत्याचार केला. व व्हिडीओ तयार करुन सोशल साईटवर टाकण्याची धमकी दिली. यावरुन पिडीतीने दि.२३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.वि.सं. कलम-३७६,३७६ (२)(एन), ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



### आरळीत शेताच्या कारणावरून लाथाबुक्यांनी हाणामारी

**नळदुर्ग, दि.२४ नोव्हेंबर -**

शेतात जाण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी व कत्तीने मारहाण करून जखमी केल्याची घटना नळदुर्ग तालुक्यातील आरळी (बु.) येथे घडली. याबाबत माहिती अशी की, आरोपी बाळासाहेब उर्फ शाहुराज सिद्राम सोमवंशी (रा. आरळी बु. ता. तुळजापूर) यांनी दि.२२ नोव्हेंबर रोजी आरळी (बु.) शिवारातील शेतात फिर्यादी पांडुरंग दत्तु मोहिते (वय ४८) यांना व त्यांचा आत्याचा मुलगा यांना नमुद आरोपीने शेतात जाण्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, कत्तीने मारहाण करुन जखमी केले. अशा मजकुराच्या फिर्यादी बाळासाहेब सोमवंशी यांनी दि.२३ नोव्हेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पोलीस ठाणे येथे भा.न्या.सं. कलम ११८ (१), ११५ (२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



### धाराशिव जिल्ह्यात वाहतुक शाखेची ७० वाहनांवर कारवाई

**धाराशिव, दि.२४ नोव्हेंबर -**

धाराशिव शहर व जिल्हाअंतर्गत विविध ठिकाणी ७० वाहनांवर कारवाई करून वाहतुक शाखेने ७३ हजार ८०० रूपयांचा दंड वसुल केला आहे. धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२३ नोव्हेंबर रोजी मोटार वाहन कायदा- नियम भंग प्रकरणी एकुण ७० कारवाया करुन ७३ हजार ८०० रूपये 'तडजोड शुल्क' वसुल केले आहे. वाहन चालकांनी वाहन चालविताना वाहनांची आवश्यकती कागदपत्रे, वाहन परवाना, हेलमेंटचा वापर करून वाहतुक शाखेला सहकार्य करावे, तसेच वाहतुक नियमांचे पालन करावे, असे आवाहन धाराशिव वाहतुक शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.




## दै. तरुण भारतचे भाकीत खरे ठरले...!

# प्रविण स्वामींनी चौगुलेंचा चौकार रोखला; कैलास पाटलांची दुसरी बाजी यशस्वी

### स्वामींच्या विजयात सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप, कार्यकर्ते ठरले विजयाचे 'किंगमेकर'...

**तभा वृत्तसेवा / विपिन वीर**
**धाराशिव, दि.२४ नोव्हेंबर -**

उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघातून आ. कैलास पाटील यांच्या विजयाचा मार्ग सुकर असे भाकित दैनिक सोलापूर 'तरुण भारत'च्या वतीने करण्यात आले होते. ते तंतोतत खरे ठरले आहे.

उमरगा विधानसभा मतदारसंघात सलग तीन निवडणुका जिंकून हॅड्रिक करणारे शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांना यंदा पराभवाचा सामना करावा लागला आहे. शिवसेनेचे नवखे उमेदवार प्रवीण स्वामी यांनी चौगुले यांचा ३९६५ मतांनी पराभव केला आहे. प्रवीण स्वामी हे पहिल्या फेरीपासूनच आघाडीवर होते.

मतमोजणीच्या २३ व्या फेरीअखेर स्वामी यांना ९६२०६ मते मिळाली तर चौगुले यांना ९२२४१ मते मिळाली. हा विजय निर्णायक ठरला असून मतदारांनी चौगुले यांच्या नेतृत्वावर स्पष्ट नाराजी व्यक्त केली आहे.

लोहारा तालुक्याचा निर्णायक वाटा उमरगा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या लोहारा तालुक्याने प्रवीण स्वामी यांना ७,००० मतांची मोठी आघाडी दिली. यामध्ये अनिल जगताप आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीचे विशेष योगदान आहे. २००९ ची लोकसहभागाची निवडणूक २००९ साली मतदारांनी पैसे गोळा करून ज्ञानराज चौगुले यांना निवडून दिले होते. मात्र, स्थानिकांशी दुरावा यामुळे मतदारांमध्ये असंतोष पसरला. यावेळी मतदारांनी त्याच पद्धतीने पैसे गोळा करून स्वामी यांना पाठिंबा दिला आणि चौगुले यांचा पराभव घडवून आणला.







भाजप कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष महागात भाजप मित्रपक्ष असूनही, चौगुले यांनी भाजप कार्यकर्त्यांकडे सापत्न वागणूक ठेवली. यामुळे त्यांच्याविरोधातील नाराजी अधिक तीव्र झाली आणि त्यांचा पराभव अटळ ठरला. राज्यात महायुतीची लाट असतानाही चौगुले यांचा झालेला पराभव उमरगा मतदारसंघातील बदललेल्या राजकीय समीकरणांची जाणीव करून देणारा ठरला आहे. दै. 'तरूण भारत'चे भाकीत खरे ठरले! यंदाच्या निवडणुकीत आ. ज्ञानराज चौगुले हे डेंजर झोनमध्ये असल्याचे भाकीत दैनिक 'तरूण भारत'ने व्यक्त केले होते.

हे भाकीत तंतोतंत खरे ठरले आहे.


सोलापूर तरुण भारत
epaper.dainiktarunbharat.com 22 Nov 2024 - Page 13
'लोकशाही'चा उत्सव धाराशिव जिल्ह्यात शांततेत साजरा...
१४ लाख ४ हजार १५ मतदारांपैकी ९ लाख २१ हजार २८० मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क
जिल्ह्यातील मतदानाचा टक्का घसरला... सर्वात कमी मतदान उमरगा-लोहारा मतदारसंघात... सर्वाधिक मतदान भूम-परंडा-वाशी मतदारसंघात...
विजयाचा मार्ग सुकर...
डेंजर झोनमध्ये...

## जिल्हा पर्यटन विकास समितीचे चामर लेणीत हेरिटेज वॉक

**धाराशिव, दि.२४ नोव्हेंबर -**

जिल्हा पर्यटन विकास समिती व पुरातत्व विभागाच्यावतीने २४ नोव्हेंबर रोजी धाराशिव शहरालगत वैराग रोडवर धाराशिवचा प्राचीन वारसा असलेली चामर लेणी येथे १९ ते २४ नोव्हेंबर जागतिक वारसा सप्ताहनिमित्त चामर लेणी हेरीटेज वॉक करण्यात आला.

याप्रसंगी पर्यटन समितीचे चामर लेणी पासून जवळच असलेल्या जुणी गल्ली येथील पुरातन गढीचीही पाहणी केली. या हेरिटेज वॉक करिता मुरुम येथील प्रा.डॉ. शीला स्वामी उपस्थित होत्या. यावेळी प्रा. अभिमान हंगरगेकर, अब्दुल लतीफ, गणेश वाघमारे, कोषाध्यक्ष बाबा गुळीग, राजेंद्र अत्रे, विजय गायकवाड, शेषनाथ वाघ, राजाभाऊ परदेशी, अॅड. विक्रम साळुंके, बालाजी जाधव, सतीश जाधव, अर्जुन सुरवसे, प्रदीप पांढरे, स विनोद कुलकर्णी, प्रभाकर बनसोडे, गोविंद वारे इत्यादी उपस्थित होते. आभार देविदास पाठक यांनी मानले.

### विजयाचे किल्लेदार ठरली भाजपा; माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर...

# अतितटीच्या मतमाजणीत अखेर डॉ. तानाजीराव सावंतांचा १५०९ मताने विजय

### शिवसेनेकडून जल्लोष...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२४ नोव्हेंबर -**

२४३ परंडा विधानसभा निवडणुकीसाठी महायुती व महाविकास आघाडीत अतिशय अतितटीने झालेल्या निवडणुकीकडे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे लक्ष लागले होते. परंडा विधानसभेचा प्रचारही शिगेला पोहचला होता. अतितटीणे घासुन घासून झालेल्या मताची मतमोजणी दि.२३ शनिवार रोजी भूम येथे निवडणुक अधिकाऱ्यांच्या उपस्थित व मोठ्या पोलीस बंदोबस्तात तब्बल १३ तासानंतर पार पडली. या निवडणुकीचा निकाल निवडणुक अधिकाऱ्यांनी जाहीर केला.



पहिल्या फेरीपासुन शेवटच्या फेरीपर्यंत महायुती व महाविकास आघाडीत काट्याची टक्कर झाली.शेवटच्या क्षणी महायुतीचे शिवसेना शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार डॉ. तानाजीराव सावंत हे फक्त १५०९ मताने विजयी झाले आहेत. परंडा शहरात सावंत यांना लिड मिळाल्याने त्यांच्या विजयाचे किंगमेकर ठरले आहेत माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर.

डॉ. तानाजी सावंत यांना १ लाख ३ हजार २५४ मते पडली तर त्यांचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार राहुल मोटे यांना १ लाख १ हजार ७४५ मते मिळाली आहेत. तर वंचित आघाडीचे प्रविण रणबागुल यांना १२ हजार ६९८ मते मिळाली आहेत.



या निवडणुकीत एकूण २१ उमेदवार आपले नसीब अजमावत होते. एकूण ३ लाख ३० हजार ३७३ मतदारांपैकी २ लाख ३० हजार ९७५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. अखेर अतितटीने झालेल्या परंडा विधानसभेच्या या निवडणुकीचा निकाल अतिशय घासुन घासुन झाला. या निवडणुकीत महायुतीचे तानाजी सावंत यांच्याकडून महाविकास आघाडीचे राहुल मोटे हे फक्त १५०९ मतानी पराभूत झाले आहेत.

परंडा मतदार संघात डॉ. तानाजीराव सावंत यांचा विजय झाल्याने मतदार संघात भाजप महायुती व शिवसेनेच्या कार्यकर्त्यानी माजी नगरसेवक रत्नकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली फटाके फोडून पेढे वाटून गुलालाची उधळण करीत एकच जल्लोष केला आहे.

# वैद्यकीय क्षेत्रात काम करताना सकारात्मकता ही औषधांइतकीच प्रभावी : डॉ. सय्यद

### शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ नोव्हेंबर -**

वैद्यकीय क्षेत्रात काम करत असताना सकारात्मकता हेच अत्यंत प्रभावी औषध आहे. रुग्णावर उपचार करताना रुग्णाची सकारात्मकता वाढविण्यावर डॉक्टरांनी भर दिल्यास कोणत्याही आजाराचे रुग्ण बरे होण्यास मदत होईल. त्यामुळे रुग्णाची सकारात्मकता वाढून औषधोपचाराबरोबर त्यांची मानसिकता देखील प्रभावी होईल, असे मत प्रेरक वक्ते डॉ. अर्शद सय्यद यांनी व्यक्त केले.

धाराशिव शहरातील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील प्रथमवर्ष आणि पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस. गंगासागरे, डॉ. तबस्सुम शेख, डॉ. किरण मगर, डॉ. शेवाले, डॉ. स्नेहल जाधव, डॉ. स्वामी, डॉ. पारडे, डॉ. गुरमे, डॉ. मिरजकर यांची प्रमुख उपस्थिती होती.





डॉ. अर्शद सय्यद म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रात सेवा करत असताना सकारात्मक पद्धतीने काम करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आपल्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव देखील रुग्णाला आजारातून बरे करण्यासाठी कामी येतो. म्हणून आपण व्यक्तीमत्त्व विकासावर देखील भर दिला पाहिजे. त्याकरिता आपण वैद्यकीय सेवा देताना कोणत्या गोष्टीवर भर द्यावा आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याबाबतही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेला शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील प्रथमवर्ष आणि पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेसाठी अब्दुल्ला खान, फैजान शेख यांनी परिश्रम घेतले.

### तेर येथे श्री संत गोरोबा काकांच्या पालखीचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२४ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका यांच्या पालखीचे २५ नोव्हेंबरला पंढरपूरहून तेर येथे आगमन होताच भाविक भक्त यांनी अभूतपूर्व स्वागत केले.

कार्तिक सोहळा करून श्री संत गोरोबा काका यांच्या पालखीचे २५ नोव्हेंबरला सायंकाळी तेर येथे आगमन होताच भाविक भक्त यांनी अभूतपूर्व पालखीचे स्वागत केले. रस्तावर जागोजागी सडा टाकून सुशोभित रांगोळी काढून फटाक्यांच्या आतिषबाजीत पालखीचे स्वागत केले. श्री संत गोरोबा काका यांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त यांनी अभूतपूर्व गर्दी केली होती.

# राणादादांच्या दुसऱ्या विजयाने तुळजापूर भाजपाचा बालेकिल्ला होणार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ नोव्हेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघावर सलग दुसऱ्यांदा विजयी होऊन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आई तुळजाभवानीच्या तुळजापुर विधानसभा मतदारसंघावर भाजपचा झेंडा फडकविला आहे. तुळजापुर विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील हे ३६ हजार ८७९ मताधिक्याने विजयी झाले. या निवडणुकीत त्यांना १ लाख ३१ हजार ८६३ मते मिळाली तर त्यांचे प्रतीस्पर्धी कॉंग्रेसचे अॅड. धीरज पाटील यांना ९४ हजार ९८४ मते मिळाली. या मतदारसंघातुन सलग चार वेळेस आणि एकुण पाच वेळेस निवडुन येण्याचा विक्रम कॉंग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी केला आहे मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे राणाजगजितसिंह पाटील यांनी त्यांचा पराभव केला होता. यावेळी तर कॉंग्रेस पक्षाने जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांना उमेदवारी नाकारून अॅड. धीरज पाटील यांना कॉंग्रेसीची उमेदवारी दिली. २०२४ विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा आमदार राणा जगजितसिंह पाटील मोठ्या मताधिक्याने विजय मिळवुन सलग दुसऱ्यांदा तुळजापुर विधानसभा मतदार संघावर भाजपचा झेंडा फडकविला आहे. त्यामुळे आता भविष्यात तुळजापुर विधानसभा मतदार संघ हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला होता ही ओळख पुसली जाणार आहे यापुढे हा मतदार संघ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यामुळे भाजपचा बालेकिल्ला म्हणुन ओळखला जाणार आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केवळ विकास कामांच्या जोरावर हा विजय मिळविला आहे. कृष्णा खोऱ्यातील पाणी आणण्यासाठी ११ हजार ७०० कोटी रुपयाचा निधी मंजुर करून घेऊन काम पुर्ण करुन डिसेंबर अखेर पाणी आणण्याचा केलेला प्रयत्न, नळदुर्ग शहरात महात्मा बसवेश्वर महाराज यांची भव्य दिव्य अशी बसवश्रुष्टी उभारणे, नळदुर्ग येथे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे भव्य स्मारक उभारणे,तुळजापुर येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणे, तामलवाडी येथे ३७० एकर जमिनीवर एमआयडीसी उभारणे, नळदुर्ग शहराची पुढील तीस वर्षाची गरज लक्षात घेऊन ४८ कोटी रुपये खर्चाच्या पाणी पुरवठा योजनेचे काम, नळदुर्ग येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरु करणे यासह अनेक महत्वाच्या कामांचा समावेश आहे. या विकास कामांमुळेच खरे तर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा हा विजय झालेला आहे. त्याचबरोबर भाजपसह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निवडणुकीत केलेले प्रामाणिक काम यामुळेही आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा विजय सुकर झाला आहे.

### सुनील चव्हाणांचा खारीचा वाटा...



त्याचबरोबर आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या विजयात युवा नेते सुनिल चव्हाण यांचाही मोठा वाटा आहे. त्यांनी तुळजापुर तालुक्यातील प्रचार यंत्रणा आपल्या खांद्यावर घेऊन अतिशय नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा त्यांनी राबविली त्यामुळे ज्या गावात भाजपला मतदान नव्हते त्या गावातुनही या निवडणुकीत भाजपला मताधिक्य आहे.

नळदुर्ग शहरात झालेली केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची जाहीर सभा यामुळे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मताधिक्यामध्ये मोठी वाढ झाली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकी प्रमाणेच याही वेळी त्या ७२ गावांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना मताची मोठी लीड दिली. हाच सिलसिला पुढे तुळजापुर तालुक्यातही तसाच सुरु राहिला. दस्तुरखुद्द कॉंग्रेसचे उमेदवार ऍड. धीरज पाटील आणि समाजवादी पक्षाचे उमेदवार देवानंद रोचकरी हे ज्या तुळजापुर शहरातील उमेदवार आहेत. त्या तुळजापुर शहरातही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना तब्बल ३ हजार ३२० मतांची लीड मिळाली आहे. नळदुर्ग शहरातही यावेळी पहिल्यांदा भाजपच्या उमेदवाराला लीड मिळाली आहे.

हे सर्व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेल्या विकास कामाची त्यांना मतदारांनी दिलेली पावती आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### प्रो-कबड्डी लीग खेळाडूंसाठी यशस्वी होण्याचा मार्ग : नीरज

**नोएडा** : प्रो कबड्डी लीग (पीकेएल) या खेळातील सर्वात मोठी व्यावसायिक लीगने महत्त्वाकांक्षी



खेळाडूंना अडथळे तोडून खेळात व जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग तयार केला आहे, असे व्यावसायिक मुष्टियोद्धा नीरज गोयत म्हणाला. हरयाणा स्टीलर्स व जयपूर पिंक पँथर्स यांच्यादरम्यानचा सामन्यापूर्वी नीरज गोयत पत्रकार परिषदेत बोलत होता. यावेळी कर्णधार जयदीप दहिया व हरयाणा स्टीलर्सचे मुख्य प्रशिक्षक मनप्रीत सिंगही उपस्थित होते. यावेळी नीरजने कबड्डीची उत्क्रांती व त्याचा ग्रामीण खेळाडूंवर होणारा परिणाम याविषयी आपले विचार मांडले. देश विविध खेळांमध्ये सुवर्णपदके मिळवत आहे आणि कबड्डी आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेली आहे, असे गोयत म्हणाला. प्रो-कबड्डी लीगबद्दल उल्लेखनीय बाब म्हणजे या ११ वर्षांमध्ये पीकेएलमध्ये बराच बदल झाला. लीगने अशा महत्त्वाकांक्षी खेळाडूंसाठी संधी निर्माण केल्या आहेत. खेळाडूंनी स्थानिक सीमांच्या पलीकडे जाण्याची कल्पनाही केली नव्हती, असेही तो म्हणाला.

### ऑस्ट्रेलियाला नमवून इटली अंतिम फेरीत

**मालगा** : जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या जॅनिक सिनरच्या उत्कृष्ट खेळाच्या बळावर इटलीने ऑस्ट्रेलियावर २-० असा विजय मिळवत डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. सिनरने ॲलेक्स डी मिनौरचा ६-३, ६-४ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. आता पुन्हा एकदा विजेतेपद जिंकण्यासाठी इटलीला नेदरलॅण्डशी अंतिम सामना खेळावा लागणार आहे. शुक्रवारी नेदरलॅण्डने जर्मनीला पराभूत केले होते. पहिल्या एकेरीत मॅटिओ बेरेटिनीने ऑस्ट्रेलियाच्या थानासी कोक्विनाकिसवर दोन तास ४६ मिनिटांत ६-७ (६/८), ६-३, ७-५ असा मिळवला. गत वर्षी डेव्हिस चषक जिंकून माझ्या मनात सर्वात चांगली भावना होती. आता मी पुन्हा एकदा इटलीला डेव्हिस चषक जिंकून देण्यास उत्सुक आहे, सिनर म्हणाला. हा अंतिम सामना खूप कठीण असेल, पण आम्ही १०० टक्के योगदान देऊ, असेही तो म्हणाला. ऑस्ट्रेलिया गत दोन वर्षात प्रत्येक अंतिम फेरीत पराभूत झाला. २८ विजेतेपदांसह स्पर्धेच्या इतिहासात ऑस्ट्रेलिया हा दुसरा सर्वात यशस्वी संघ आहे.

### गुलवीर सिंगचा नवीन राष्ट्रीय विक्रम

**हाचिओजी** : आशियाड क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता भारतीय धावपटू गुलवीर सिंगने जपानमधील हाचिओजी लाँग डिस्टन्स मीटमध्ये १०,००० मीटर शर्यतीत नवीन राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली. २६ वर्षीय गुलवीरने टोकियोजवळील हाचिओजी येथे २७ मिनिटे १४.८८ सेकंद अशी वेळ नोंदवत शर्यत जिंकली. या स्पर्धेत त्याने आपला २७:४१.८१ सेकंदाचा जुना राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. त्याने १६ मार्च रोजी सॅन जुआन, अमेरिका येथील स्पर्धेत हा विक्रम नोंदवला होता. त्याने २०२३ हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत २८:१७.२१ सेकंदांसह कांस्यपदक जिंकले. गुलवीर सिंगच्या नावावर सध्या ५००० व १०००० मीटरमध्ये असे दोन्ही राष्ट्रीय विक्रम आहेत. सप्टेंबरमध्ये त्याने जपान ॲथ्लेटिक्स मीटमध्ये १३:११.८२ सेकंदांच्या वेळेसह स्वतःचा ५००० मीटरच्या राष्ट्रीय विक्रमात सुधारणा केली होती. तथापि, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तो स्थान मिळवू शकला नाही. ऑलिम्पिकसाठी पात्रता वेळ २७:००.०० अशी होती.

### राष्ट्रीय रॅली शर्यत गौरव गिलला विजेतेपद

**अम्मठी** : सातवेळा राष्ट्रीय विजेता गौरव गिलने रविवारी येथे एफएमएससीआय इंडियन नॅशनल रॅली चॅम्पियनशिप २०२४ स्पर्धेच्या पाचव्या व अंतिम फेरीत पुरेसा वेग आणि कौशल्य दाखवत विजेतेपद पटकावले. गत महिन्यात रॅलीमध्ये मिळालेल्या यशानंतर त्याचे हे सलग दुसरे विजेतेपद ठरले. विजेतेपद पटकावताना अर्जुन पुरस्कारप्राप्त गिल, सहचालक अनिरुद्ध रांगणेकरसह शानदार फॉर्ममध्ये होता. या विजयामुळे गिल अर्का मोटरस्पोर्ट्सच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेल्या कर्ण कदूरच्या (मुसा शेरीफ) जवळ पोहोचला. त्याने एकूण दुसरे स्थान पटकावले. आदित्य ठाकूर (वीरेंद्र कश्यप) याने शेवटच्या टप्प्यात स्थानिक आवडत्या जेसन साल्दान्हा (थिम्मू उद्दपांडा) याला मागे टाकत एकूण दुसरे स्थान पटकावले. हिमाचल प्रदेशच्या आदित्य ठाकूर व वीरेंद्र कश्यपने आयएनआरसी-२ शर्यतीत जेसन साल्दान्हा आणि थिम्मू उद्दपांडा या कर्नाटकच्या जोडीला पराभूत केले. आयएनआरसी-३ शर्यतीत डारायस श्रॉफ (मुंबई) आणि चेट्टीनाड स्पोर्टिंगचे अर्जुन धीरेंद्र या जोडीने अव्वल स्थानावर राहण्यासाठी सरस कामगिरी केली. अर्णव प्रताप सिंग आणि स्नॅप रेसिंगच्या रोहीन एन या गुरुग्राम-बंगळुरू जोडीने दुसरे स्थान पटकावले आणि हैदराबादच्या जोडीने तिसरे स्थान पटकावले.

# जयस्वाल, कोहलीची दमदार शतके

## ऑस्ट्रेलियाला विजयासाठी आणखी ५२२ धावांची गरज

◆ **पर्थ, २४ नोव्हेंबर**

सलामीवीर यशस्वी जयस्वालसह विराट कोहलीने झळकवलेल्या शतकांच्या बळावर भारताने बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेतील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात तिसऱ्या दिवशी १३४.३ षटकांत ६ बाद ४८७ धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला आणि ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ५३४ धावा काढण्याचे जबरदस्त लक्ष्य ठेवले. यजमान ऑस्ट्रेलियाने दिवस अखेर ४.२ षटकांत ३ बाद १२ धावा केल्या. आता सामन्याचे दोन दिवस शिल्लक असून ऑस्ट्रेलियाला आणखी ५२२ धावांची गरज आहे, त्यांच्याकडे सात गडी शिल्लक आहे. भारला विजय मिळवण्यासाठी ऑस्ट्रेलियाने लक्ष्य गाठण्यापूर्वी उर्वरित सात फलंदाजांना झटपट बाद करणे आवश्यक आहे.

ज्या शहरात सचिन तेंडुलकर व विराट कोहलीने शतके झळकावली, त्याच शहरात भारताच्या नवीनतम फलंदाज यशस्वी जयस्वालने ऑप्टस स्टेडियमवर पहिल्या कसोटीत शानदार १६१ धावांची खेळी करून स्वतःचे एक आगळे-वेगळे स्थान निर्माण केले.

२०१८ मध्ये याच मैदानावर कोहलीने तिसऱ्या दिवशी शतक झळकावले होते, परंतु त्याप्रसंगी त्याचे शौर्य व्यर्थ ठरले, परंतु यावेळी कोहलीने शतक साजरे केल्यानंतर भारताने डाव घोषित केल्यानंतर आता परिस्थिती नक्कीच वेगळी असेल. भारताचा दुसरा डाव ६ बाद ४८७ धावांवर घोषित करण्याता आला.

विक्रमी ५३४ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या दिवस अखेरपर्यंत ४.२ षटकांत ३ बाद १२ धावांपर्यंत मजल मारली.

कालचे नाबादवीर यशस्वी जयस्वाल व केएल राहुलने बिनबाद १७२ धावांवरून पुढे



ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सला बाद केल्याचा आनंद साजरा करताना मोहम्मद सिराज (मध्यभागी) संघ सहकारी विराट कोहली (डावीकडे) व यशस्वी जयस्वाल

भारताच्या दुसऱ्या डावाला सुरुवात केली. दरम्यान यशस्वी जयस्वालने आपले शतक साजरे केले, मात्र केएल राहुल वैयक्तिक ७७ धावांवर खेळत असातना स्टार्कने त्याला कॅरीकडून झेलबाद केले. केएल राहुलने १७६ चेंडूंत ५ चौकारांसह ७७ धावांची खेळी केली. राहुलने जयस्वालसोबत ६३ षटकांत २०१ धावांची भागीदारी केली. देवदत्त पडिक्कल २६ धावा काढून हेझलवूडच्या गोलंदाजीला बळी पडला. पुढे जयस्वालने विराट कोहलीसोबत ३८ धावांची भर घालत भारताला तिनशे धावांचा उंबरठा ओलांडून दिला,याचवेळी यसशवी जयस्वाल मार्शच्या गोलंदाजीत स्मिथकडून झेलबाद झाला. जयस्वालने २९७ चेंडूंचा सामना करत १६१ धावांची दिमाखदार खेळी केली, यात त्याने तब्बल १५ चौकार व ३ षट्कार हाणलेत. त्यानंतर विराट कोहलीने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. ऋषभ पंत व ध्रुव ज्युरेल प्रत्येकी एक धाव काढत तंबूत परतले, मात्र वॉशिंग्टन सुंदर (२९) व नितीश कुमार रेड्डीच्या (नाबाद ३८) कोहलीने आपले आपले शतक साजरे केले व संघाला १३४.३ षटकांत ६ बाद ४८७ धावांचा डोंगर उभा करून दिला. याचवेळी भारताने आपला दुसरा डाव घोषित केला. कोहली १०० धावांवर नाबाद राहिला. कोहलीने १४३ चेंडूंच्या खेळीत ८ चौकार व २ षट्कार खेचलेत.

ऑप्टस स्टेडियमच्या खेळपट्टीचे राक्षस भारतासाठी नाहीसे झाले असे वाटत होते, परंतु पहिल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाला त्रास देण्यासाठी परतले. पहिल्या दिवशी १७ फलंदाज बाद झाल्याच्या गोंधळानंतर, बॉर्डर-गावस्कर मालिकेली पहिला कसोटी सामना तीन दिवसही चालणार नाही असे वाटत होते. तथापि, जयस्वाल व कोहलीच्या दमदार शतकामुळे भारताने सामन्यात मुसंडी मारली व यजमानांसमोर ५३४ धावांचे जबरदस्त लक्ष्य ठेवले.

एक मोठे लक्ष्य दिल्यानंतर भारताकडे ऑस्ट्रेलियाविरुद्ध गोलंदाजी करण्यासाठी २७ मिनिटे होती व अल्पवेळेतही जसप्रीत बुमराहने त्वरित प्रभाव पाडला आणि ऑस्ट्रेलियाची पहिली फलंदाजी फळी उद्ध्वस्त केली.

खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियाने ३ बाद १२ धावा केल्या होत्या. भारत आता पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेण्याच्या तयारीत आहे.

हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहने सलामीवीर नॅथन मॅकस्वीनी (०) व मार्नस लॅबुशेनला (३) झटपट तंबूत परत पाठवले. मोहम्मद सिराजने कर्णधार पॅट कमिन्सला (२) कोहलीकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. खेळ थांबला तेव्हा उस्मान ख्वाजा नाबाद ३ धावांवर खेळत होता. ◀(वृत्तसंस्था)

# ऋषभ पंत सर्वात महागडा खेळाडू

## आयपीएल लिलावात २७ कोटींमध्ये खरेदी

## श्रेयस अय्यर २६.७५ कोटी रुपयांत करारबद्ध

◆ **जेद्दाह, २४ नोव्हेंबर**

ऋषभ पंत इंडियन प्रीमियर लीग क्रिकेटच्या (आयपीएल) इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. सौदी अरबच्या जेद्दाह येथे सुरू असलेल्या आयपीएल लिलावात रविवारी लखनौ सुपर जायण्ट्सने या भारतीय यष्टिरक्षक-



फलंदाजला विकत घेण्यासाठी २७ कोटी रुपये खर्च केले आहेत.

पंतसाठी खर्च केलेल्या रकमेने श्रेयस अय्यरचा स्पर्धेतील सर्वात महागडा खेळाडू होण्याचा विक्रम थोडक्यात हुकला. पंजाब किंग्सने श्रेयस अय्यरला २६.७५ कोटी रुपयांना विकत घेतले.

पंत सर्वात महागडा खेळाडू म्हणून उदयास येण्याच्या काही क्षण आधी, अय्यरने ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कचा विक्रम मागे टाकला. स्टार्कला कोलकाता रायडर्सने गत लिलावात २४.७५ कोटी रुपयांना विकत घेतले होते.

त्याच्या पूर्वीच्या फ्रॅन्चायझी दिल्ली कॅपिटल्सने त्याला परत विकत घेण्यासाठी राईट टू मॅच कार्ड न वापरल्याने पंत लखनौ सुपर जायण्ट्समध्ये गेला.

यावेळी स्टार्कला खूपच कमी किंमत मिळाली व त्याला दिल्ली कॅपिटल्समध्ये ११.७५ कोटी रुपयांना विकले गेले, तर इंग्लंडचा जोस बटलर गुजरात टायटन्सला १५.७५ रुपयांना विकला गेला.

डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगच्या सातत्यामुळे त्याला पंजाब किंग्सकडून राईट टू मॅच कार्डद्वारे १८ कोटी रुपयांची बोली लागली, तर दक्षिण आफ्रिकेचा



वेगवान गोलंदाज कॅगिसो रबाडाला गुजरात टायटन्सने १०.७५ कोटी रुपयांना विकत घेतले.

कोलकाता नाईट रायडर्सचा माजी कर्णधार असलेल्या श्रेयस अय्यरची मूळ किंमत दोन कोटी रुपये होती. दिल्ली कॅपिटल्सने त्याच्यासाठी २६ कोटी रुपयांची बोली लावली होती, पण पंजाब किंग्सने श्रेयसला मिळवण्यासाठी रक्कम वाढवली.

चेन्नई सुपर किंग्सने अर्शदीपसाठी पहिली बोली लावून सुरुवात केली, ज्याची मूळ किंमतही दोन कोटी रुपये होती. अखेरीस, तीव्र बोली युद्धानंतर अर्शदीपला पंजाब किंग्सने परत विकत घेतले. गत वर्षी दुबईत झालेल्या लिलावानंतर आयपीएलचा लिलाव देशाबाहेर होण्याची ही दुसरी वेळ आहे. ◀(वृत्तसंस्था)

# कोहलीने सर डॉन ब्रॅडमनच्या कामगिरीला मागे टाकले

## ३० वे कसोटी शतक

◆ **पर्थ, २४ नोव्हेंबर**

भारताचा धडाकेबाज फलंदाज विराट कोहलीने रविवारी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात आपल्या कारकिर्दीतील ही सर्वात महत्त्वाची खेळी केली. कोहलीने आपले ३० वे कसोटी शतक झळकावत सर डोनाल्ड ब्रॅडमन यांच्या अतुलनीय शतकाला मागे टाकले .

जुलै २०२३ मध्ये पोर्ट ऑफ स्पेन येथे वेस्ट इंडीजविरुद्ध १२१ धावांनंतर कोहलीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध नाबाद १०० धावांची खेळी केली. हे त्याचे ऑस्ट्रेलियाविरुद्धचे आठवे शतक




ठरले. पर्थ येथे २०१८ मध्ये कोहलीने शतक झळकावले होते, परंतु ते भारताला विजय मिळवून देण्यास पुरेसे नव्हते.

मी संघाच्या हितासाठी शतकी खेळी केली. मला केवळ संघाच्या कार्यात योगदान द्यायचे होते, असे कोहली म्हणाला.

कोहलीने मार्नस लॅबुशेनच्या चेंडूवर जोरकसपणे फटका मारला व शंभर धावा पूर्ण केल्या.

सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांच्यानंतर कसोटी क्रिकेटमध्ये ३० किंवा त्याहून अधिक शतके नोंदवणारा कोहली हा चौथा भारतीय फलंदाज झाला आहे. त्याच्या या शतकी खेळीचे कौतुक करण्यासाठी त्याची पत्नी अनुष्का शर्मासुद्धा ऑप्टस स्टेडियमवर हजर होती.

अनुष्का माझ्या उत्तम व कठीण काळात माझ्या पाठीशी आहे. पडद्यामागे घडणाऱ्या सर्व गोष्टी तिला माहीत आहेत. देशासाठी कामगिरी केल्याचा मला अभिमान वाटतो, असे तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# कपिल देवकडून भारताच्या लढ्याचे उत्तम नेतृत्व केल्याबद्दल जसप्रीत बुमराहचे कौतुक

◆ **मुंबई, २४ नोव्हेंबर**

भारताचे दिग्गज क्रिकेटपटू कपिलदेवने रविवारी ऑस्ट्रेलियाविरुद्ध पर्थ येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताच्या लढ्याचे उत्तम नेतृत्व केल्याबद्दल हंगामी कर्णधार जसप्रीत बुमराहचे कौतुक केले. भारतीय संघाने आतापर्यंत अपेक्षेपेक्षा जास्त उत्तम कामगिरी केली, असे त्यांनी म्हटले आहे.

पर्थ कसोटीसाठी हंगामी कर्णधार असलेल्या बुमराहने ३० धावांत ५ बळी टिपून ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव केवळ १०४ धावांत गुंडाळला व भारताला पहिल्या डावांत ४६ धावांची आघाडी मिळवून दिली. यशस्वी जयस्वाल व विराट कोहलीच्या दमदार शतकाच्या आधारे भारताने ६ बाद ४८७ धावांवर आपला दुसरा डाव घोषित करून



ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ५३४ धावांचे लक्ष्य ठेवले. तिसऱ्या दिवस अखेर बुमराहने दोन फलंदाजांना बाद करत ऑस्ट्रेलियाची स्थिती ४.२ षटकांत ३ बाद १२ धावा अशी केली. मोहम्मद सिराजने एक गडी बाद केला.

**बुमराहने केली कपिलदेवच्या विक्रमाशी बरोबरी**

बुमराहने कसोटी क्रिकेटमध्ये पाच बळी टिपण्याची ही ११ वी वेळ आहे. त्याने ही कामगिरी दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियामध्ये केली. या राष्ट्रांमध्ये सर्वाधिक पाच बळी घेण्याच्या बाबतीत बुमराहने कपिलदेवच्या पराक्रमाशी बरोबरी केली.

जसप्रीत बुमराहचे विशेष अभिनंदन करणे आवश्यक आहे, कारण गोलंदाजांची कर्णधार म्हणून निवड होणे फारच कमी असते. त्याने ज्या प्रकारे नेतृत्व करताना गोलंदाजीसुद्धा केली, हे पाहून खूप चांगले वाटते, असे कपिलदेव विश्व समुद्र गोल्डन ईगल गोल्फ स्पर्धेदरम्यान प्रसारमाध्यमांना बोलताना म्हणाला.

मला बुमराहच्या गोलंदाजीबद्दल काहीही सांगायची गरज नाही. तो किती चांगला आहे, हे त्याचे रेकॉर्डच सांगते. तो जगातील अव्वल गोलंदाज आहे, आम्हाला आणखी काय हवे आहे? असेही कपिलदेव म्हणाला.

भारतात वेगवान गोलंदाजाची एवढी चर्चा होईल असे मला वाटले नव्हते, पण आज ते घडत आहे याचा आनंद आणि अभिमान वाटतो, असेही तो म्हणाला.

भारतीय संघ खरोखरच चांगला खेळत आहे. त्यांनी पहिली कसोटी अशीच खेळली पाहिजे. न्यूझीलंड मालिकेनंतर संघ इतका चांगला खेळ करेल अशी अपेक्षा नव्हती, असेही तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# विदर्भाचा जितेश शर्मा ११ कोटींत आरसीबीमध्ये

◆ **जेद्दाह, २४ नोव्हेंबर**



आयपीएल लिलावात रविवारी विदर्भाचा यष्टिरक्षक-फलंदाज जितेश शर्मा याला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ११ कोटी रुपयंत करारबद्ध केले आहे. जोफ्रा आर्चरला राजस्थान रॉयल्सने १२.५० कोटी रुपयांत खरेदी केले आहे.

**विक्रीस गेलेले खेळाडू असे -**

| | | |
|---|---|---|
| ऋषभ पंत | (लखनौ)- | २७ कोटी रुपये |
| श्रेयस अय्यर | (पंजाब किंग्स)- | २६.७५ कोटी रूपये |
| व्यंकटेश अय्यर | (कोलकाता)- | २३.७५ कोटी रुपये |
| अर्शदीप सिंग | (पंजाब)- | १८ कोटी रुपये |
| युझवेंद्र चहल | (पंजाब)- | १८ कोटी रुपये |
| जोश बटलर | (गुजरात)- | १५.७५ कोटी रुपये |
| केएल राहुल | (दिल्ली)- | १४ कोटी रुपये |
| जोश हेझलवूड | (बंगळुरू)- | १२.५० कोटी रुपये |
| जोफ्रा आर्चर | (राजस्थान)- | १२.५० कोटी रुपये |
| ट्रेंट बोल्ट | (मुंबई)- | १२.५० कोटी रुपये |
| मोहम्मद सिराज | (गुजरात)- | १२.२५ कोटी रुपये |
| मिचेल स्टार्क | (दिल्ली)- | ११.७५ कोटी रुपये |
| फिल सॉल्ट | (बंगळुरू)- | ११.५० कोटी रुपये |
| ईशान किशन | (हैदराबाद)- | ११.२५ कोटी रुपये |
| जितेश शर्मा | (बंगळुरू)- | ११ कोटी रुपये |
| मार्कस स्टोयनिस | (पंजाब)- | ११ कोटी रुपये |
| कॅगिसो रबाडा | (गुजरात)- | १०.७५ कोटी रुपये |
| टी. नटराजन् | (दिल्ली)- | १०.५० कोटी रुपये |
| मोहम्मद शमी | (हैदराबाद)- | १० कोटी रुपये |
| नूर अहमद | (चेन्नई)- | १० कोटी रुपये |
| आर. अश्विन | (चेन्नई)- | ९.७५ कोटी रुपये |
| आवेश खान | (लखनौ)- | ९.७५ कोटी रुपये |
| प्रसिध कृष्णा | (गुजरात)- | ९.५० कोटी रुपये |
| जॅक फ्रेझर-मॅकगर्क | (दिल्ली)- | ९ कोटी रुपये |
| लियाम लिव्हिंग्स्टोन | (बंगळुरू)- | ८.७५ कोटी रुपये |
| हर्षल पटेल | (हैदराबाद)- | ८ कोटी रुपये |
| डेव्हिड मिलर | (लखनौ)- | ७.५० कोटी रुपये |
| ॲनरिक नॉर्टिज | (कोलकाता)- | ६.५० कोटी रुपये |
| हॅरि ब्रुक | (दिल्ली)- | ६.२५ कोटी रुपये |
| डेव्हॉन कॉनवे | (चेन्नई)- | ६ कोटी रूपये |
| वनिंदू हसरंगा | (राजस्थान)- | ५.२५ कोटी रुपये |
| खलिल अहमद | (चेन्नई)- | ४.८० कोटी रुपये |
| महेश थिक्षणा | (राजस्थान)- | ४.४० कोटी रुपये |
| ग्लेन मॅक्सवेल | (पंजाब)- | ४.२० कोटी रुपये |
| रचिन रवींद्र | (चेन्नई)- | ४ कोटी रुपये |
| क्विंटन डिकॉक | (कोलकाता)- | ३.६० कोटी रुपये |
| राहुल त्रिपाठी | (चेन्नई)- | ३.४० कोटी रुपये |
| राहुल चहर | (हैदराबाद)- | ३.२० कोटी रुपये |
| ॲडम झॅम्पा | (हैदराबाद)- | २.४० कोटी रुपये |
| एडन मार्कराम | (लखनौ)- | २ कोटी रुपये |
| रहमान गुरबाझ | (कोलकाता)- | २ कोटी रुपये |

# डी. गुकेश व डिंग लिरेन यांच्यात आजपासून लढत

## जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा

◆ **सिंगापूर, २४ नोव्हेंबर**

भारताचा १७ वर्षीय डी. गुकेश व विद्यमान विश्वविजेता चीनचा डिंग लिरेन यांच्यादरम्यान सोमवारपासून येथे जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत लढणार आहे.

२५ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर या कालावधीत सिंगापूर येथे होणाऱ्या या स्पर्धेत सहभागी होऊन १७ वर्षीय डी. गुकेशने इतिहास घडवला आहे. कोणत्याही मोठ्या अमेरिकन किंवा युरोपियन सहभागाशिवाय ही इतिहासातील पहिली जागतिक स्पर्धा आहे. या स्पर्धेत प्रथमच दोन आशियाई बुद्धिबळपटू विश्वविजेतेपदासाठी झुंजणार आहे.

फिडे पात्रता मिळवण्यासाठी चेन्नईचा ग्रॅण्डमास्टर डी. गुकेशने कारूआनासारख्या अव्वल खेळाडूला पराभूत करूनकॅण्डिडेट बुद्धिबळ स्पर्धा जिंकली व या




स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली. डी. गुकेशने भारताला ऑलिम्पियाड विजेतेपद पटकावून देण्यातही योगदान दिले आहे, त्यामुळे तो भारताचा उगवता बुद्धिबळ स्टार म्हणून उदयास आला. लवचिकता, दृढनिश्चय व उल्लेखनीय कामगिरीच्या मालिकेने गुकेशचा या टप्प्यापर्यंतचा प्रवास विलक्षण आहे.

जागतिक बुद्धिबळ स्पर्धेपर्यंतचा गुकेशचा मार्ग खडतर होता. विश्वचषक व स्विस स्पर्धेसारख्या महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये कमी पडल्यानंतर त्याला फिडे सर्किटमधील स्पर्धेवर आशा होती. २०२३ मध्ये चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेतून त्याने महत्त्वपूर्ण २० गुणांची कमाई केली,

ही स्पर्धा त्याच्यासाठी महत्त्वपूण ठरली. या गुणांच्या आधारावर त्याने कॅण्डिडेट स्पर्धेत स्थान मिळविले. नंतर कॅण्डिडेट स्पर्धेत बाजी मारून जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता मिळविली. ◀(वृत्तसंस्था)

# निर्भयपणे खेळलो, धाडसी निर्णय घेतले : यशस्वी जयस्वाल

◆ **पर्थ, २४ नोव्हेंबर**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात मी निर्भयपणे खेळलो व धाडसी निर्णय घेण्याची क्षमता आसल्यामुळेच शतक झळकावू शकलो, असे भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वाल म्हणाला.

यैस्वालने ऑस्ट्रेलियन भूमीवर केवळ दुसऱ्या डावात १६१ धावांची खेळी केली व केएल राहुल (७७) सोबत २०१ धावांची सलामी भागीदारी केल्यामुळे भारतासाठी आव्हानात्मक ५३३ धावांचा पाया रचला. वेगवान गोलंदाज जोश हेझलवुडच्या चेंडूवर षट्कार ठोकून २२ वर्षीय यशस्वी जयस्वालने आपले चौथे कसोटी शतक झळकावले.

माझ्यासाठी हा खूप खास क्षण असून मला नेहमीच ऑस्ट्रेलियाचा दौरा करून चांगली कामगिरी करायची होती. ही खेळी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे, असे असे यशस्वी जयस्वाल पत्रकार परिषदेत म्हणाला.

मला नेहमीच निर्भय

> मी एवढी मोठी शतकी खेळी करेन असे मला कधीच वाटले नव्हते. कारण माझे ध्येय सत्रानुसार खेळायचे होते. त्यानंतर केएल राहुलसोबत माझी चांगली भागीदारी झाली. या भागीदारीदरम्यान तो मला मार्गदर्शन करत होता व त्याचा मला फायदा झाला, असेही यशस्वी म्हणाला.
>
> मध्यभागी जेव्हा जेव्हा मला चिंताग्रस्त वाटायचे, तेव्हा राहुल भाई मला एकाग्र व शांत राहण्यास सांगत होता, हे मला उपयुक्त ठरले, असे तो म्हणाला.

मानसिकतेने खेळायचे होते. मी नेहमी स्वतःवर विश्वास ठेवतो व धाडसी निर्णय घेतो. त्यामुळे ऑस्ट्रेलियात त्यांच्या दर्जेदार गोलंदाजांविरुद्ध खेळणे हा एक अद्भूत अनुभव होता आणि जगातील सर्वोत्तम गोलंदाजांविरुद्ध शतक ठोकणे विशेष आहे, असे तो म्हणाला. जयस्वाल पहिल्या डावात आठ चेंडूत शून्यावर बाद झाला होता. ◀(वृत्तसंस्था)

# सर्व प्रयत्न करूनही कोहली कोंडीत सापडला नाही : हेझलवूड

◆ **पर्थ, २४ नोव्हेंबर**

आम्ही ऑफ-स्टम्प लाईन, आखुड टप्प्याचे चेंडूंचे डावपेच आणि स्टम्पच्या रेषेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, परंतु विराट कोहलीच्या विरोधात कोणतीही योजना काम करत नव्हती, असे ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड म्हणाला.

हेझलवूड भारताविरुद्धच्या पहिल्या कसोटीत आपल्या संघाचा मोठा पराभव पाहत आहे. आम्हाला सामना वाचवण्यासाठी चमत्कार करावा लागेल. आम्ही काही योजना



आखल्या. संघाला पराभवातून वाचवण्याची जबाबदारी फलंदाजांवर आहे व मी केवळ आराम करेल, असे तो म्हणाला.

हेझलवूडने ऑस्ट्रेलियन जलदगतीने पाठवलेल्या ८४ पैकी २१ षटके टाकली व त्याने २९० धावा देत केवळ चार बळी टिपलेत. ◀(वृत्तसंस्था)

# भविष्यात दोन भारतीय खेळाडू विश्वविजेतेपदासाठी खेळतील : पीटर स्विडलर

◆ **सिंगापूर, २४ नोव्हेंबर**

भविष्य काळात दोन भारतीय खेळाडू जागतिक बुद्धिबळ विजेतेपदासाठी स्पर्धा करताना पाहून आश्चर्य वाटणार नाही, असे रशियाचा ग्रॅण्डमास्टर पीटर स्विडलर म्हणाला.

सोमवारपासून येथे सुरू होणाऱ्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या डी. गुकेशचा सामना विद्यमान विजेता चीनच्या डिंग लिरेनशी होणार आहे.

दोन भारतीय विजेतेपदासाठी लढण्याच्या शक्यतेबद्दल विचारले असता स्विडलरने फिडेला सांगितले की, हे निश्चितपणे धक्कादायक ठरणार नाही. विश्वविजेतेपदाच्या लढतीसाठी पात्र होणे कठीण आहे, मात्र भारताचा अर्जुन एरिगाईसी सारख्या खेळाडूने सुद्धा यावर्षीचे वर्चस्व गाजविले आहे. त्याने किती गुण मिळवले हे पूर्णपणे अविश्वसनीय आहे, परंतु ही स्पर्धा जागतिक स्पर्धेची सायकल नाही.

जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेमुळे अतिरिक्त दबाव येत असला तरी, भारतीय खेळाडू किमान पुढील दीड दशकांपर्यंत वर्चस्व गाजवत राहिले, तर आश्चर्य वाटण्यासारखे नाही, असेही तो म्हणाला.

सर्वप्रथम अर्जुनला जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या सायकलसाठी पात्र होणे आवश्यक आहे. त्याच्याकडे बरेच सर्किट पॉईंट आहेत आणि तो कदाचित विश्वचषकात चांगली कामगिरी करू शकेल, परंतु तरीही सायकलच्या बाबतीत काहीही हमी नाही. आणि नंतर उमेदवार स्वतःची आव्हाने सादर करते, असे तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राचे ज्युनिअर खो-खो संघ प्रथमच विमानाने रवाना

## अलीगड, उत्तरप्रदेश येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघ सज्ज





### धाराशिवचे भरतसिंग वसावे आणि सुहानी धोत्रे महाराष्ट्र संघाचे कर्णधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

२५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान अलीगड, उत्तरप्रदेश येथे होणाऱ्या ४३ व्या कुमार आणि मुली (ज्युनिअर) राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे कुमार आणि मुली संघ रविवारी सकाळी प्रथमच विमानाने रवाना झाले. सदर स्पर्धा महाराणी अहिल्याबाई होळकर स्टेडीयम, अलीगड, उत्तर प्रदेश येथे आयोजित केली आहे.

धाराशिवचे भरतसिंग वसावे आणि सुहानी धोत्रे यांची अनुक्रमे कुमार आणि मुली संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या इतिहासात प्रथमच खेळाडूंना विमानाने प्रवासाची सुविधा मिळाली असून, याचे श्रेय संघटनेचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव व त्यांच्या टीमला दिले जात आहे. विमान प्रवासाचा आनंद सर्व खेळाडूंच्या चेहऱ्यावर दिसत होता. खेळाडूंनी ओम साईश्वर सेवा मंडळ, लालबाग येथे मुंबईत १७ नोव्हेंबरपासून आयोजित प्रशिक्षण शिबिरात कठोर मेहनत घेतली. यावेळी मंडळाचे श्रीकांत गायकवाड, नंदिनी धुमाळ, राजेश मोरे अस्मिता गायकवाड इ. कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

स्पर्धेला रवाना होताना सर्व खेळाडू आनंदी व उत्साही दिसत होते. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले आणि खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र संघ या राष्ट्रीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे. महाराष्ट्राचे कुमार आणि मुली (ज्युनिअर) संघ असे **कुमार गट:** भरतसिंग वसावे (कर्णधार), सोत्या वळवी, विलास वळवी, राज जाधव, जितेंद्र वसावे (सर्व धाराशिव), प्रज्वल बनसोडे, प्रेम दळवी, पार्थ देवकाते (सर्व सांगली), कृष्णा बनसोडे, शुभम चव्हाण (सर्व सोलापूर), आशिष गौतम (ठाणे), चेतन गुंडगळ, भावेश माशिरे (सर्व पुणे), अनय वाल्हेकर (अहिल्यानगर), प्रतिक जगताप (सातारा), प्रशिक्षक: युवराज जाधव (सांगली), संघ व्यवस्थापक: आकाश लोखंडे (धाराशिव) **मुली गट:** अश्विनी शिंदे, तन्वी भोसले, सुहानी धोत्रे (कर्णधार), प्रणाली काळे (धाराशिव), सानिका चाफे, प्रतीक्षा बिराजदार, धनश्री तामखडे (सांगली), प्राजक्ता बनसोडे, स्नेहा लामकाने (सोलापूर), दीक्षा काटेकर, धनश्री कंक (ठाणे), सुषमा चौधरी (नाशिक), दिव्या गायकवाड (मुं. उपनगर), रिद्धी चव्हाण (रत्नागिरी), जोया शेख (जालना), प्रशिक्षक: श्रीकांत गायकवाड (मुंबई), संघ व्यवस्थापिका: सुप्रिया गाढवे (धाराशिव).

### सोलापूरच्या चौघांचा समावेश

महाराष्ट्र संघात सोलापूरच्या दोन कुमार व दोन मुलींचा समावेश आहे. कृष्णा बनसोडे, प्राजक्ता बनसोडे ( अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ, वेळापूर), शुभम चव्हाण ( दिनबंधू खो-खो क्लब, मंद्रूप) व स्नेहा लामकाने (कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लब, वाडीकुरोली, ता. पंढरपूर ) हे निवड झालेले खेळाडू आहेत. त्यांचे सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.

# नीता नरेंद्र तांबोळकर चषक बुद्धिबळ स्पर्धा १ डिसेंबरला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर -**



येथील दानशूर व्यक्तिमत्त्व असलेल्या व गेल्या १९ वर्षांपासून सोलापूर येथे सातत्याने आपले पती नरेंद्र तांबोळकर यांच्या स्मृती निमित्ताने जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करून सोलापुर जिल्ह्यात बुद्धिबळ खेळाचा प्रचार करणाऱ्या श्रीमती नीता तांबोळकर (सोलापूर च्या माजी नायब तहसीलदार) यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने तसेच सोलापुर चे निष्णात बुद्धिबळ खेळाडू नरेंद्र तांबोळकर यांच्या स्मृती निमित्ताने नीता नरेंद्र तांबोळकर चषक भव्य बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

श्री रमा जगदीश महिला बहुउद्देशीय उत्कर्ष संस्थेच्या विद्यामाने आयोजित व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन च्या सहकार्याने संपन्न होणार आहे जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक स्पर्धा मालिकेतील १० दहावी स्पर्धा असून रविवार दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ठीक १० वा. सुंदर मल्टिपर्पज हॉल विजयपूर रोड सोलापूर येथे ही स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. १०,१३,१७,३० या वयोगटात ही स्पर्धा आयोजित होणार असून प्रत्येक गटात १७ बक्षिसे देण्यात येणार आहेत व ३० वर्षाखालील गटात ९ बक्षिसे देण्यात येणार आहेत. तसेच ७,८,९,११ या प्रत्येक गटात ४ उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत. करमाळा, धाराशिव, लातूर, बीड या जिल्ह्यातील सहभागी खेळाडूंना व मुलीच्या साठी उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेसाठी रोख बक्षीसे चषक व मेडल्स मिळून २१ हजार रूपयांची बक्षीसे विजयी खेळाडूंना दिली जाणार आहेत. या स्पर्धेसाठी येताना खेळाडूंनी स्वतःचे बुद्धिबळपट व सोंगट्या आणाव्यात व स्पर्धे च्या संपूर्ण माहिती करता शरद नाईक सचिव सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन यांना ९४२३३३७३४६ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष अर्जुन कदम यांनी केले आहे.



## सेंट थॉमस स्कूलची कराटे व किक बॉक्सींग स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

शहरस्तरीय अंतरशालेय कराटे व किक बॉक्सींग स्पर्धेत सेंट थॉमस स्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक अमित येवलेकर, राजेंद्र गायकवाड व सिल्वेस्टर जॉन यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे स्कूलचे प्राचार्य फादर रॉबिन, व्यवस्थापक फादर पॉल यांनी कौतुक केले. **कामगिरी केलेले खेळाडू :** कराटे व किक बॉक्सींग : अनिष बिरोळी (सुवर्ण व रौप्य), अर्णव लोंढे (२ रौप्य), शुभम पाटील ( सुवर्ण व रौप्य), वरद गोलवलकर ( रौप्य व ब्राँझ), आर्यन बेनगी (ब्राँझ), वेदांत महिंद्रकर (रौप्य), किशा पांडा (रौप्य).

## ऐतिहासिक विजयानंतर भाजपाचा सदस्यता नोंदणी करण्याचा संकल्प

**मुंबई, दि.२४ नोव्हेंबर:**

विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजयानंतर भाजपाने आता सदस्यता मोहीम हाती घेतली आहे. भाजप प्रदेश मुख्यालयात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी सदस्यता अभियान सुरू करण्यात आले.

देशात भाजपाची सदस्यता मोहीम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. मात्र विधानसभा निवडणुकीमुळे महाराष्ट्रात अभियान राबविण्यात आले नव्हते .आता ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर ऐतिहासिक सदस्यता नोंदणी करण्याचा संकल्प बैठकीत करण्यात आला आहे. मोबाईलवर मिस कॉलद्वारे मेंबरशिप करता येणार आहे. त्यासाठी तुमच्या फोनवरून ८८०००२०२४ या मोबाईल क्रमांकावर मिस कॉल करावा लागेल. मिस कॉल केल्यानंतर, तुम्हाला तुमच्या फोनवर एक मेसेज प्राप्त होईल, त्यामध्ये सदस्यत्व क्रमांक नमुद केलेल्या असणार आहे अभियानावेळी श्रीकांत भारतीय, विक्रांत पाटील, माधवी नाईकसह पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्यशस्त्र दांडपट्टा प्रशिक्षण शिबीर; जिल्हा निवड चाचणी यशस्वी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर -**

ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूर यांच्यावतीने येथील अक्कलकोटरोडवरील तमशेट्टी लॉन्स येथे प्रशिक्षण शिबिर व जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या राज्यशस्त्र दांडपट्टा राज्यस्तरीय स्पर्धेची पूर्व जिल्हा निवड चाचणी यशस्वी झाली. यामध्ये ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ही स्पर्धा ही सब ज्युनिअर, ज्युनिअर व सीनियर एज ग्रुप मध्ये झाली. यामध्ये एकेरी पट्टा, दुहेरी पट्टा, पट्टा पवित्र (आठ वार पट्टा, बारा वार पट्टा, अठरा वार पट्टा) व संघ हात पट्टा या प्रकारात झाली. याच क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य शिवकालीन दांडपट्ट्यास राज्यशस्त्राचा दर्जा दिल्याने हा शिवछत्रपतींचा जलंत इतिहास लाभलेला खेळ जगाच्या कानाकोपऱ्यात जावावा.. यासाठी याला खेळाच्या रूपात न व नवनवीन खेळाडू घडवण्यासाठी जगासमोर आणण्याचे मानस ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र हे करीत आहे. या प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना ट्रॅडिशनल दानपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे टी-शर्ट व जिल्हा निवड चाचणीचे प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष शिवराम भोसले. उपाध्यक्ष अंजना कडलासकर. ॲड अविनाश कडलासकर, सिनेट सदस्य सामाजिक कार्यकर्ते संजय साळुंखे, ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव अश्विन कडलास्कर यांच्या उपस्थितीत हे प्रशिक्षण शिवर व निवड चाचणी यशस्वीरित्या पार पडली. जिल्हा प्रतिनिधी म्हणून रोहित भोसले यांनी हे प्रशिक्षण दिले.

## इप्पाकायल प्रशालेची कराटे स्पर्धेत कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

रामदास नरसय्या इप्पाकायल प्रशालेचय खेळाडूंनी शालेय कराटे स्पर्धेत कामगिरी केली. या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना मुख्याध्यापक नागेश खुने, प्रशिक्षक लक्ष्मण चंदनशिवे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे पद्मशाली शिक्षण संस्थेचे श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, विश्वस्त श्रीनिवास इप्पाकायल यांनी अभिनंदन केले.

कामगिरी केलेले खेळाडू : १४ वर्षांखालील : वेणेला भास्कर गुंडला (प्रथम), साक्षी योगेश सलगर (द्वितीय), देवेंद्र रविंद्र सिंगराल (प्रथम), ओंकार बालाजी पेदरपेट्टी.

## विधानसभा निवडणुकीची अधिसूचना, राजपत्राच्या प्रती राज्यपालांना सादर

**मुंबई, दि.२४ नोव्हेंबर-**

भारत निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन येथे भेट घेतली.

त्यांना विधानसभा निवडणुकीच्या जाहीर झालेल्या निकालाची अधिसूचना - निवडून आलेल्या सदस्यांची यादी - व राजपत्राची प्रत सादर केली. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकांचे निकाल २३ नोव्हेंबरला जाहिर करण्यात आले. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७३ मधील तरतूदीनुसार, या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, भारत निवडणूक आयोगाच्या दि. २४ नोव्हेंबर, २०२४ च्या अधिसूचनेन्वये राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली. हे राजपत्र व अधिसूचनेच्या प्रती निवडणूक आयोगाचे उपमुख्य निवडणूक आयुक्त व मुख्य निवडणूक अधिकारी यांनी राज्यपालांना सादर केल्या.

## निधन वृत्त...

### शिवाजी गिड्डे



**मोडनिंब, दि. २४ नोव्हेंबर-**

येथील शिवाजी तुकाराम गिड्डे (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा,३ मुली, सून, नातवंडे, असा परिवार आहे. डॉ. योगेश गिड्डे यांचे ते वडील होते. भूविकास बँक माढा शाखाचे माजी शाखा अधिकारी होते.

### शरणव्वा अंटद



**वळसंग दि. २४ नोव्हेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील सरपंच जगदीश दयानंद अंटद यांच्या मातोश्री व माजी पंचायत समिती सदस्या शरणव्वा दयानंद अंटद (वय ८५) यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. वळसंगच्या राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### राजव्वा गोसकी



**सोलापूर दि. २४ नोव्हेंबर-**

गांधीनगर मधील आनंद विणकर सोसायटीचे रहिवासी श्रीमती राजव्वा सिद्राम गोसकी (वय ७४) यांचे आज सायंकाळी ५.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंतयात्रा राहत्या घरापासून सोमवारी ( दि. २५) रोजी सकाळी १० वाजता निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी व नातू नातवंडे आहे

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website** http://srmetender.mahatransco.in; for following works.

**Tender No :-** CE/EHV PC O&M Zone/Pune/T-61/2024-25 **RFX No.** 7000034285

**Subject :-** Tender for Annual Contract for Transportation, Loading, Unloading, Winching, Turning & Clearing, Dismantling & Erection of Power Transformers / ICTs / Reactors, Weights ranging from 20 MT to 180MT by standard/Hydraulic Trailors for various EHV S/s under EHV O&M Circle, Solapur.

**Tender Amount :-** Rs. 1,00,00,000/- ; **EMD :-** Rs. 1,00,000/-; **Tender Fees :-** Rs. 500/- +GST. **Download of tender Documents :-** From dtd. 25/11/2024 to dtd. 10/12/2024 up to 11:00 Hrs. **Bid Opening :-** Dtd. 10/12/2024 after 11:05Hrs (Tech.); Dtd. 11/12/2024 after 11:05Hrs (Price)

**For further details visit our website http://mahatransco.in and open above RFX for downloading tender document, schedules, and annexures.**

**Sd/-**
**Chief Engineer (I/C) EHV PC O&M Zone Pune**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे तांदूळवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील लोकांस व वित्त संस्थांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या प्लॉट जागेचे मालक गनी बाबूलाल शेख, भास्कर सुदर्शन आरकल, हारून कासिमसाब शेख, पार्वती संगप्पा कलशेट्टी, सर्व रा. तांदूळवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली खुली प्लॉट जागा ही आमचे अशील शोभा चनविर मोरडे व चनविर मल्लिनाथ मोरडे यांना खरेदी देण्याचे ठरविले आहे. सदर प्लॉट जागा ही आमचे अशिलांनी कायम खुष खरेदी घेण्याचे ठरविले असून त्यापोटी काही इसारा रक्कम देखील दिलेली आहे. सदर प्लॉट जागेचे वर नमूद मालकांनी सदरील प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची ग्वाही आमचे अशिलांना दिलेली आहे.

तरी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या प्लॉट जागेबाबत कोणाचाही कसलाही हक्क, अथवा हितसंबंध उदा. खरेदी, साठेखत, गहाणखत, दान, बक्षीस, पोटगी अंगवस्त्र, दावा, अपील अथवा अन्य कोणताही हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमचे अशिलांची खात्री करावी. वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार न आल्यसास सदरची प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून व ज्यांचा कोणाचा हक्क आहे, त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची सक्तरित्या नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. ता. २४/११/२०२४

**परिशिष्ठ** :- जि. सोलापूर, पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे तांदूळवाडी येथील बिनशेती गटनं. १०२ यापैकी प्लॉट नं. २५, क्षेत्र ०.९६.७८ आर. चौ. मी. आकारणी

रु. 0.00 पैसे. यांसी चतुःसिमा :पूर्वेस : प्लॉट नं. ३४ दक्षिणेस :- प्लॉट नं. २६ पश्चिमेस :- रस्ता उत्तरेस : प्लॉट नं. २४

**ॲड. उडचाण एस. एम.**
**ॲडव्होकेटस्**
**ऑफीस : फत्तेसिंह चौक, अक्कलकोट**

क्रमांक: न.भू.//अपील/एस. आर. ३०२४/२०२३

**सोलापूर येथील मा.जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचे कोर्टात**

प्रति,
१) **जाहेराबी अ. मजीद जिनेरी,**
२) **आरीफ अ.मजीद जिनेरी,**
३) **बीबी सादिक उस्ताद** ---**अपीलदार**
वरील सर्व रा.१०१२ मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

१अ) **नसीमबी अहमद पंजेशा** रा. मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
१ब) **मन्नाबी अजीज जलसे** रा. बारंगुळे प्लॉट बार्शी,ता. बार्शी जि.सोलापूर
१क) **शमशाद रफीक जलसे**, रा. हुसेनी चोक, मालाड (इ), मुंबई
१ड) **बाबु (खाँजा) म. हनिफ मोमीन** रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
१इ) **मुसा म. हनिफ मोमीन** रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
१ई) **सईदा सलिम मोमीन** रा. मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापुर
१उ) **मलेका म. हनिफ मोमीन,** रा. करणी नगर, ७ रस्ता सोलापूर
२अ) **बिलकीस मंजूर मंद्रुपकर** रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२ब) **जरीना मन्नान मोमीन** २क) **रहेमत मुस्तफा जिनेरी** रा. मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२ड) **यास्मीन अजीज मोमीन** रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२इ) **फरीदा गौस डब्बु,** रा. मोमीन गल्ली, देशनुर, ता. जि. बेळगाव
२ई) **हलीमा इरशाद बासडे**, रा. मोमीन गल्ली, परंडा, जि. उस्मानाबाद
२उ) **अरजुमन मुस्तफा जिनेरी** रा. मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
३अ) **अजीज म. गौस अंडगी,** रा. कोंडवा, पुणे,
३ब) **कैसर म. गौस अंडगी,** रा. कोंडवा पुणे
३क) **फरीदा बाबू, (खाजा) मोमीन** रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
३अ) **सायरा न्यामत मोमीन,** रा. घारेपडी पेठ, पुणे
३क) **शकीला हमजु जिनेरी,** रा. मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
४अ) **जास्मीन लालमहंमद मोमीन** रा. मिठा नगर, कोंडवा, पुणे
४ब) **परवीन युसुफ बाबुडे**
५अ) **फिरोज अख्तर जिनेरी**
५ब) **मुबारक अख्तर जिनेरी**
५क) **करीम अख्तर जिनेरी**
**अ.क्र. ४अ) ते ५क)** सर्व रा. मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
५ड) **शमशाद कादर मोमीन** रा, मोमीन गल्ली, देशनुर, ता. जि. बेळगाव
६) **चाँदबी निसार मोमीन** रा. अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापर
७अ) **सादीक म. कासीम हन्नुरे**
७ब) **नसरीन म, कासीम हन्नुरे**
७क) **परवीन म. कासीम हन्नुरे**
**अ.क्र. ७ अ) ते ७ क)** सर्व रा. मंगळवार पेठ, परंडा, ता. परंडा, जि. उस्मानाबाद
८अ) **पापु युसुफ लांडगे**
८ब) **राजु युसुफ लांडगे**
**अ.क्र. ८अ) ते ८ब)** दोघे रा. मलीक चौक, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
८क) **मन्नान युसुफ लांडगे**
८ड) **शमीम इस्माईल निंबर्गी**
**अ.क्र. ८क) व ८ड)** दोघे रा. बारंगुळे प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**विषयः- मौजे बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील न.भूक्र. १०१२ या मिळकतीबाबत अपील.**

ज्याअर्थी अपीलदार यांनी सोलापूर येथील मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांचे न्यायालयात क्र. न.भू./अपील/एस आर ३०२४/२०२३ अन्वये मौजे बार्शी, ता. बार्शी येथील न.भूक्र. १०१२ या मिळकतीबाबत अपील दाखल केलेले असून सदर अपीलामधील वाद मिळकतीवर दाखल जाबदार १अ) नसोमबी अहमद पंजेशा रा, मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, त्यांनी अगर त्यांचे वारसांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ०८ दिवसांचे आत किंवा नेमलेली तारीख २६/११/२०२४ रोजी मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांचे कार्यालय, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे सकाळी ११.३० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून वर नमुद अपीलाकामी हजर राहून जरूर ते म्हणणे द्यावे. येणेप्रमाणे वागण्यास कसूर केल्यास सदर अपीलाचे कामी जाबदार १अ) नसीमबी अहमद पंजेशा रा. मेहंदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर अगर त्यांचे वारस यांचे विरूध्द एकतर्फी अपीलाचे कामकाज चालवून निकाल होईल. सबब, सदरची जाहीर नोटीस दिली.

शिक्का

**सही/-**
**दादासाहेब घोडके**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**सोलापूर**



# महायुती-२ मध्ये मुख्यमंत्रीपदी फडणवीसच?

## शिंदे व अजित पवार उपमुख्यमंत्री; आज शपथविधी

**तभा वृत्तसेवा/ जमीर काझी**
**मुंबई, दि.२४ नोव्हेंबर-**

विधानसभा निवडणुकीतील ऐतिहासिक विजयानंतर महायुती-२ सरकारची सोमवारी स्थापना होत आहे मात्र यावेळी सर्वाधिक जागा जिंकलेल्या भाजप आणि मुख्यमंत्रीपद आपल्याकडे ठेवण्याचे निश्चित केले असून त्यासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव जवळपास निश्चित झाले असल्याचे सांगण्यात येते . भाजपा श्रेष्ठीकडून त् हिरवा कंदील मिळाल्यानंतर रात्री उशिरा केव्हा सोमवारी ते जाहीर केले जाईल, असे भाजपच्या बड्या नेत्याकडून सांगण्यात आले. तर मावळत्या सरकार प्रमाणेच या सरकारमध्येही दोन उपमुख्यमंत्री असणार असून शिवसेनेकडून एकनाथ शिंदे तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार हे त्यासाठी शपथ घेतील ,हे जवळपास निश्चित झाले आहे .

शिवसेनेकडून एकनाथ शिंदेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत अशी आग्रह केला जात असलातरी भाजपाच्या आमदारांच्या प्रचंड संख्येमुळे यावेळी हे पद जाऊ न देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीने तब्बल २३६ जागा जिंकत मोठा विक्रम केला आहे त्यामध्ये सर्वाधिक १३२ आमदार हे निव्वळ भाजपाचे आहेत तर शिंदे गटाचे ५७ व अजित पवार गटाचे ४१ आमदार निवडून आले आहेत. विरोधी महाविकास आघाडीला जेमतेम ४८ जागा मिळवता आल्या तर अन्य दहा आमदार निवडून आले आहेत. मावळत्या विधान सभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपत असून आज राज्य निवडणूक आयोगाच्या मुख्याधिकाऱ्यांनी राज्यपालांची भेट घेत विधानसभा निवडणुकीचा निकाल राजपत्राची प्रत व नूतन सदस्यांची नावांची यादी राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांना सादर केले त्यामुळे सोमवारी नवीन सरकार स्थापन होणार हे जवळपास निश्चित झाले असून भाजपाने मुख्यमंत्रीपद आपल्याकडे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे त्यासाठी सर्वांची पसंती पक्षाचे मुख्य नेते देवेंद्र फडणवीस यांनाच असून त्यांच्या चाणक्य नीतीमुळे ऐतिहासिक कामगिरी पक्षाने बजावली आहे. अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडीला हटवून सत्ता स्थापन करताना भाजपाने मुख्यमंत्री पदाचा त्याग केला होता. मात्र यावेळी अशी करण्याची आवश्यकता नसल्याचे पक्षांच्या नेत्यांचे म्हणणे आहेत. त्यामुळे भाजपाचा मुख्यमंत्री व शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचा उपमुख्यमंत्री असा फॉर्मुला जवळपास निश्चित झाला आहे मुख्यमंत्री पदासाठी भाजपाकडून देवेंद्र फडणवीस यांचेच नाव आघाडीवर असून दिल्लीतील श्रेष्ठींची संमती मिळाल्यानंतर ते जाहीर केले जाणार आहे.

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसने रविवारी गटनेते पदी अपेक्षेप्रमाणे आपल्या पक्षाचे प्रमुख अनुक्रमे एकनाथ शिंदे व अजितदादा यांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे नव्या सरकारमध्ये हे दोघेही उपमुख्यमंत्री असतील असे सांगितले जात आहे.

### शिंदे गटाकडून मुख्यमंत्रीपदासाठी आग्रह

निवडणुकीपूर्वी महायुतीने मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर केलेला नव्हता मात्र मावळते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवल्या होत्या. तसेच मुख्यमंत्री पदासाठी संख्याबळ अचाही निर्णय झालेला नव्हता त्यामुळे एकनाथ शिंदे यांना पुन्हा संधी मिळाली हवी असं मागणी त्यांच्या पक्षाचे आमदाराकडून होत आहे जरी अडीच अडीच वर्षासाठी हे पद देण्याचे निश्चित झाले तरी पहिल्यांदा शिंदे यांना संधी द्यावी असेही त्यांच्याकडून मागणी होत आहे. मात्र भाजपाकडे १३२ आमदार असल्याने मुख्यमंत्री पद त्यांच्याकडेच ठेवण्याचे महायुतीच्या बैठकीत निश्चित करण्यात आले आहे शिंदे गटाकडूनही त्याला विरोध होऊ शकणार नाही.

### राजभवनातच शपथविधी?

प्रचंड बहुमत मिळाल्याने महायुती-२ सरकारचा शपथविधी वानखेडे स्टेडियम किंवा शिवाजी पार्कवर करण्यात यावा, असा तीन पक्षातील प् नेत्यांचा आग्रह आहे. मात्र वानखेडे स्टेडियमवर सध्या क्रिकेटचे सामने सुरू असून शिवाजी पार्कवर सहा डिसेंबरच्या महानिर्वाण दिन समारंभाची तयारी सुरू आहे. त्यामुळे दोन्ही ठिकाणी मिळणे अडचणीचे असून तिसरा पर्याय म्हणून आझाद मैदानावर किंवा राजभवनातच शपथविधी केला जाईल, असे समजते

### २२-१२-१० मंत्रीपदाचा फार्मूला

महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत नव्या सरकारमधील मंत्री पदाच्या फॉर्मुला ही जवळपास निश्चित झाला आहे सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या भाजपाला २२ तर शिवसेना शिंदे गटाला बारा व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला दहा पदे असतील .उद्या तिन्ही पक्षाचे प्रमुख नेत्यांच्या शपथविधी बरोबरच तिने पक्षातील काही ज्येष्ठ नेतेही शपथ घेतील अशी शक्यता आहे.

# ठाकरे गटाच्या आमदारांची आज मातोश्रीवर बैठक

**मुंबई दि.२४ नोव्हेंबर:**

विधानसभा निवडणुकीतील धक्कादायक पराभवामुळे विरोधी महाविकास आघाडी अद्याप सावरलेली नाही . त्यांच्यामध्ये सर्वात जास्त २० आमदार असलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांची उद्या सोमवारी मातोश्रीवर बैठक होणार आहे .दुपारी बारा वाजता होणारे बैठकीत नवनिर्वाचित आमदारांना पाचारण करण्यात आले असून पक्षप्रमुख ठाकरे यांना मार्गदर्शन करणार आहेत.

१५ व्या विधानसभेत महायुतीला तब्बल २३२ तर महाविकास आघाडीला अवघ्या ४८ जागावर समाधान मानावे लागले आहे त्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला सर्वाधिक २० तर काँग्रेसला १६ व शरद पवार यांच्या गटाला १० आणि समाजवादी पक्षाला २ जागा मिळाल्या आहेत.

नव्या विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदासाठी किमान आवश्यक २८ आमदाराचे संख्याबळ विरोधी गटातील एकाही पक्षाकडे नाही. त्यामुळे हे सभागृह विरोधी पक्षनेत्याविना अस्तित्वात येईल ,अशी शक्यता आहे .त्यामुळे विरोधी गटनेत्यांना सभागृहात महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागेल. उद्धव ठाकरे यांनी सोमवारी बोलावलेल्या नवीन आमदारांच्या बैठकीत कदाचित गटनेत्याची निवड केली जाण्याची शक्यता आहे.

# अक्कलकोटवासीयांना लागले लाल दिव्याच्या गाडीचे वेध

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. २४ नोव्हेंबर-**

सातवी विधानसभा निवडणुक लढविणारे कॉग्रेसचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मदतीला पोलादी पुरुष अशी ओळख असलेले भाजपाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील जिपचे माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील रमेश पाटील . दिमतीला असतानाही भाजपा सोलापुर जिल्हा पुर्व अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी म्हेत्रे यांचा दुसऱ्यांदा मोठया मताधिक्याने पराभव केला. २५० अक्कलकोट विधानसभा मतदार संघाच्या इतिहासात सर्वाधिक ३८००० (आडोतीस हजारापेक्षा अधिक) मताधिक्य कल्याणशेट्टी यांच्या नावावर असलेला विक्रमही आमदार कल्याणशेट्टी यांनी तोडून आता ४९००० (ऐक्कोण पन्नास हजार) पेक्षा अधिक मताचा विक्रम केला आहे . अक्कलकोट विधान सभा मनदार संघ मॉडेल विधानसभा मतदार संघ म्हणून विकसित होत असताना आता भाजपा कार्यकर्त्यानां अक्कलकोट विधानसभा मतदार संघाकरिता लाल दिव्याची गाडी यावी असे वेध लागल्याचे शहरात ठिक ठिकाणी लागलेल्या फलकावरून अक्कलकोट वासीयांची भावना व्यक्त होताना दिसत आहे.

आमदार तथा भाजपा सोलापुर जिव्हा पुर्व अध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांनी विधान सभा निवडणुकीत अंत्यंत चाणाक्ष पद्धतीने व्युह रचना करून दुसऱ्यादां विजय मिळविला . ही निवडणुक मात्र वेगळी होती . राजकारणात कधीही काहीही होऊ शकते याचा अनुभव आला . भाजपाचे माजी




आमदार सिद्रामप्पा पाटील रमेश पाटील जिप माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील कांग्रेसचे उमेदवार माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या प्रचारात मैदानात उतरले . हा अक्कलकोट विधानसभा मतदार संघात भाजपाला मोठा धक्का होता . मतदारांनी मात्र भाजपा चे उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांनी केलेली प्रचंड विकास कामे याची पोहच म्हणून आ कल्याणशेट्टी यानां २०१९ निवडणुकीपेक्षा अधिक मताने विजयी केले . यंदा २० २४ ची विधान सभा फारच अटीतटीची लढत होईल . भाजपाचे माजी आमदार पोलादीपुरुष सिद्राम प्पा पाटील तडवळ भागासह समर्थक मतदार संघात प्रभाव टाकतील.

लोकसभेला भाजपाचे तालुक्यातील मताधिक्य घटले असे चित्र स्पष्ठ झाले होते मात्र मतदारांनी अमदार कल्याणशेट्टी यांनी भाजपासाठी दिलेल्या योगदानाचे अचुक मुल्यमापन करून मताधिक्यरूपी आशिर्वाद आ. कल्याणशेट्टी याना छप्पर फाडके दिले.

२०१९ विधानसभा निवडणुकीत तात्कालीन भाजपा तालुकाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी याना उमेदवारी मिळू नये याकरिता मोठा त्रास झाला. सर्वप्रकारचे विरोध झुकारून भाजपाने तालुकाध्यक्ष कल्याणशेट्टी ना उमेदवारी दिली. गृहमंत्री अमित शहांनी बाहुबली विरुद्ध सामान्य भाजपा कार्यकर्ता अशी २०१९ च्या लढतीचा उल्लेख केला होता मात्र मतदारांनी पहिल्याच विधानसभा निवडणुकीत आणि आता २०२४ च्याही निवडणुकीत सारे जुने विक्रम मोडीत काढीत विजयी केले.

### आ. सचिक कल्याणशेट्टींचे भाजपासाठी मोठे योगदान

भाजपाने दिलेली प्रत्येक जबाबदारी कल्याणशेट्टीनी पार पाडली. गोवा विधान सभा निवडुकीत तसेच तेलंगणा विधान सभा निवडणुकीत भाजपाने दिलेली जबाबदारी पार पाडली याशिवाय पक्षाने न दिलेली एक मोठी जबाबदारी व भाजपासाठी मोठा त्याग त्यांनी केल्याचे तालुकावासीयांना अवगत आहे. आणि याची पोच म्हणून मतदारांनी आ कल्याणशेट्टी यांनी दिलेल्या योगदानाची उतराई म्हणून मतदारांनी मोठे मताधिक्य दिले काय आहे ते पक्षाने दिली नसलेली जबाबदारी आणि कल्याणशेट्टीचा मोठा त्याग! अक्कलकोट तीर्थक्षेत्र येथील मध्यवर्ती जुना राजवाडा जवळील मोठी जागा जिथ कुठलाही मोठा व्यवसाय होऊ शकतो अशी जागा भाजपा कार्यालयसाठी आदयवत फर्निचर स्वतंत्र केबीन सभा साठी हॉल अशी अंत्यत उच्च दर्जाचे भाजपाचे कार्यालय स्वखर्चाने केले. भाजपा कार्यकर्ते चुकुन ग्रामीण भागात जाण्यासाठी त्यांची एसटी जरी हुकली तरी भाजपा चा सामान्य कार्यकर्ता पंचतारांकित सोय सारख्या भाजपा कार्यालयात त्याची रात्री निवासाची सोय होईल अशी सोय केली आहे. सोलापुर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात भाजपाचे असे मोठे कार्यालय कदाचित नसावे असे मोठे कार्यालय भाजपा पक्षासाठी स्वखर्च करून आ कल्याणशेट्टी यांनी करून दिले. तालुक्यातील जनतेनी आ कल्याणशेट्टी यांचे भाजपासाठी दिलेलं योगदान पाहुन च मोठया मताधिक्याने विजयी केलेच शिवाय आता तालुका वासीयानां लाल दिव्याच्या गाडीचे वेध लागल्याचे तालुक्यात लावण्यात आलेल्या फलकावरून जनतेची भावना व्यक्त होताना दिसत आहे .

# गाताचीवाडी बायपास चौकात युवकाचा मृतदेह आढळला

## खून करुन पुरावा नष्ट करण्यासाठी चेहरा केला छिन्नविछिन्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ नोव्हेंबर-**

कुर्डुवाडी, लातूर बायपासवरील गाताचीवाडी चौकात एका युवकाचा मृतदेह सापडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतदेहाची ओळख पटू नये यासाठी चेहरा व गळा छिन्नविछिन्न करण्यात आला असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खून इतरत्र करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह या ठिकाणी आणून टाकल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळच्या सुमारास गाताचीवाडी बायपास रस्त्याच्या कडेला असलेल्या चारीत अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाच्या पुरुषाचा मृतदेह आढळला. पोलीस कर्मचारी दशरथ बोबडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली. मृतदेहाचा चेहरा व गळा धारदार हत्याराने छिन्नविछिन्न करण्यात आला होता. मृताच्या उजव्या हातावर रोशन असे इंग्रजीत गोंदलेले आढळले. तालुका पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा तपास सुरु आहे. हा खून नेमका कुठे झाला, मृत व्यक्ती कोण आहे आणि कोणत्या कारणासाठी हा प्रकार घडला, याचा शोध पोलीस घेत आहेत. या संदर्भात कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी तत्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राजशेखर शिवदारे यांच्या इंगळगी गावात भाजपाला मिळाले ४१७ चे मताधिक्य!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात अपक्ष म्हणून धर्मराज काडादी यांना उभे करण्यास अग्रेसर असलेल्या स्वामी समर्थ सूतगिरणीचे चेअरमन राजशेखर शिवदारे यांच्या इंगळगी गावात भाजपला तब्बल ४१७ चे मताधिक्य मिळाले आहे.

इंगळगी गावात गेल्या दहा वर्षापासून आमदार सुभाष देशमुख यांच्या गटाची एकहाती सत्ता आहे. इंगळगी गावात बूथ क्रमांक १३४ आणि १३५ असे एकूण दोन बूथ आहेत. या दोन्ही बूथवर भाजपचे उमेदवार सुभाष देशमुख यांना चांगले मताधिक्य मिळाले आहे. बूथ क्रमांक १३४ वर सुभाष देशमुख यांना ३६६, धर्मराज काडादी यांना १३९, अमर पाटील यांना ६९, बाबा मिस्त्री यांना २२, महादेव कोगनुरे यांना ८ आणि संतोष पवार यांना ६ मते मिळाली आहेत. या बुथवर सुभाष देशमुख यांना २२७ चे मताधिक्य मिळाले आहे. बुथ क्रमांक १३५ वर सुभाष देशमुख यांना ३३२, धर्मराज काडादी यांना १४२, अमर पाटील यांना ११७, बाबा मिस्त्री १४ यांना , महादेव कोगनुरे यांना १० आणि संतोष



पवार यांना ५८ मते मिळाली आहेत. असे एकूण इंगळगी गावात ४१७ चे मताधिक्य सुभाष देशमुख यांना मिळाले आहे.

गत विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सोडचिट्टी देऊन राजशेखर शिवदारे हे आमदार सुभाष देशमुख यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. सुभाष देशमुख यांचा प्रचार ही त्यांनी गेल्या निवडणुकीत जोरात केला होता. मात्र निवडणुकीनंतर शिवदारे हे भाजपपासून अलिप्त होते. मात्र यंदाच्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहत असताना शिवदारे यांनी धर्मराज काडादी यांना निवडणूक लढवण्यास तयार केले. त्यांची मनधरणी केली. काडादी हे ही निवडणूक लढवले. मात्र शिवदारे यांच्या इंगळगी गावातच गावात भाजपला ४१७ चे लीड मिळाले आहे.

# मित्रनगर येथून दुचाकी चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

शहरातील शेळगी परिसरातील मित्र नगर येथून चोरट्याने २० हजार रुपयांची दुचाकी चोरून नेली. याबाबत रमेश सिद्राम शेट्टी (वय ५४, रा. बसवेश्वर नगर, मित्र नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ नोव्हेंबर रोजी बसवेश्वर नगर येथील घरासमोर रमेश शेट्टी यांनी त्यांची एमएच १३ बीजे ९३७७ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार शिवशरण तपास करीत आहेत.

# आनंददायी शनिवार... विद्यार्थ्यांचे समाजभान वाढवणार

विद्यार्थ्यांमध्ये त्यांचे वर्तन, जबाबदारीबाबत जागरूकता निर्माण व्हावी, चांगल्या सवयी, सहकार्य वृत्ती, नेतृत्वगुणांचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राहावे, संभाषण कौशल्य विकसित व्हावे तसेच खेळातून शिक्षण हा हेतू ठेवून शालेय शिक्षण विभागामार्फत प्रत्येक शाळेवर आनंददायी शनिवार राबवण्यासाठी आलेल्या सूचनेनुसार हा उपक्रम सर्वत्र प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये तर्कसंगत विचार करण्याचे कौशल्य निर्माण व्हावे तसेच विद्यार्थी कार्य करण्यासाठी सक्षम बनावेत आणि त्यांच्यामध्ये करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती व नैतिकमूल्य रुजावेत यासाठी या उपक्रमाची आज प्रत्येक शाळेला खूप गरज आहे. या उपक्रमाचे शैक्षणिक, सामाजिक, नैतिकृष्ट्या महत्त्व जाणून घेऊन शासनाने सांगितल्याप्रमाणे आनंददायी पद्धतीने चालू शैक्षणिक वर्षातील सर्व शनिवारी आनंददायी शनिवार हा उपक्रम प्रभावीपणे व यशस्वीपणे राबवणे गरजेचे आहे.

आनंददायी शनिवार अंतर्गत कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण तसेच इतर शालेय व सहशालेय उपक्रम राबवण्यासाठी नियोजन करताना वेळेची मर्यादा येत आहे. विद्यार्थ्यांबाबत पूर्वग्रह दूषितपणा असल्यामुळे विद्यार्थ्यांमधील क्षमता आम्हाला माहीत नव्हत्या. त्यामुळे ठराविक विद्यार्थ्यांना संधी दिली जात होती. विद्यार्थी शनिवारी गैरहजेरीचे प्रमाण जास्त होते. विद्यार्थी उपक्रमात कृतीयुक्त सहभागी होताना लाजत होते. मोकळेपणाने सहभागी होत नव्हते. बऱ्याचशा कृती मला जमणार नाही असे त्यांचे मत होते. विविध उपक्रम राबवण्यासाठी शैक्षणिक साहित्य अपुरी पडत आहेत. अभ्यास सोडून इतर उपक्रम खूप होतात का असे विचार शिक्षकांच्या मनात येत होते. कधीकधी मुली आनंददायी शनिवारमधील उपक्रमात भाग घ्यायला कंटाळा करत आहेत.

अध्ययन-अध्यापनाचे व्यवस्थापन व मूल्यमापन या प्रशिक्षणानंतर चालू शैक्षणिक वर्षापासून जागतिक दर्जाचे पिसा पातळीवरील मुले तयार करण्याचे आव्हान सर्वच शिक्षकांसमोर उभे आहे. तेव्हा अध्ययन-अध्यापनाचा ताण विद्यार्थी व शिक्षकांना येऊ नये म्हणून खेळीमेळीच्या



आनंददायी वातावरणात मूल शिकले पाहिजे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी चालू शैक्षणिक वर्षातील सर्व शनिवार आनंददायी शनिवार म्हणून साजरी करण्यात यावेत असे सांगितले. सध्याच्या काळात लहान वयातही विद्यार्थ्यांना ताण-तणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी शनिवार हा उपक्रम राबवल्यास विद्यार्थ्यांची शिक्षणाची अभिरुची वाढीस लागेल. त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम होईल. विद्यार्थ्यांची गळती व अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होईल, तसेच विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपले जाऊन त्यांचे उत्तम अध्ययन होईल म्हणून सर्व शिक्षकांनी एकत्रित येऊन या उपक्रमासाठी विचारविनिमय करून नियोजन करण्यास सुरुवात केली. नियोजन करताना विद्यार्थी संख्या, शैक्षणिक साहित्याची उपलब्धता या गोष्टी विचारात घेतल्या. तसेच स्थानिक कारागीर, कलाकार, पालक व ग्रामस्थांचा यात सहभाग घेण्याचे नियोजन केले. उपक्रमामध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धेचे व बक्षिसांचे नियोजन करण्यात आले. प्रत्येक महिन्यात येणारे सण-उत्सव, जयंती-पुण्यतिथी लक्षात घेऊन उपक्रम लिहून काढले व वेळापत्रक तयार करून त्यानुसार कार्यवाही करण्याचे सर्व शिक्षकांनी ठरवले. वेळापत्रकानुसार कार्यवाही सुरू झाली. प्रत्येक शनिवारचे नियोजन, त्यासाठी करावयाची तयारी, शैक्षणिक साहित्याची जमवाजमव, कोणाकोणाचे सहकार्य घ्यायचे, त्यांना व वद्यार्थ्यांना शुक्रवारीच व्यवस्थित सूचना दिल्या जाऊ लागल्या व प्रत्येक शनिवारी ठरलेले उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येऊ लागले आहे. आनंददायी शनिवारसाठी संपूर्ण नियोजन झाल्यानंतर व कार्यवाही सुरू झाल्यानंतर प्रत्येक छोट्याछोट्या कृतींची वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. यामध्ये पुढीलप्रमाणे कृतींचे नियोजन करण्यात आले व अंमलबजावणी सुरू झाली. या कृतीमुळे विद्यार्थी मनाचे नियंत्रण करायला शिकणार आहेत. विद्यार्थ्यांच्या मनाची एकाग्रतेची शक्ती वाढेल. विद्यार्थी व शिक्षकांचे मानसिक स्वास्थ्य टिकून राहील. विद्यार्थी नवीन विषय शिकण्यास सज्ज होतील. यामध्ये आमच्या शाळेने सहज योग केंद्र अकलूजच्या डॉ. देशमुख व त्यांच्या संपूर्ण टीमकडून शास्त्रशुद्ध पद्धतीने श्वसनाची तंत्रे, प्राणायाम, योगासने, ध्यानधारणा याविषयी मार्गदर्शन घेतले. दररोज परिपाठानंतर १० मिनिटे श्वसन, प्राणायाम, ध्यान सुरू झाले आहे.

### काम निमपट, गती दुप्पट

शिक्षकांचे काम निमपट, मुलाची शिकण्याची गती दुप्पट व कृतीतून मिळणारा आनंद तिप्पट झाला आहे. मुले स्व:प्रयत्नाने कृती पूर्ण करत आहेत. जिंकण्याच्या उद्देशाने पूर्ण क्षमतेने मुले काम करत आहेत. मुले आनंददायी शनिवारची वाट बघतात व पुढील शनिवारी कोणत्या कृती असतील त्यासाठी काय तयारी करावी लागेल. यासाठी उत्सुक असतात. बऱ्याचशा शैक्षणिक साहित्याची जमवाजमव मुले स्वतः करत आहेत. घरून, आजूबाजूच्या परिसरातून सहज उपलब्ध होणारे साहित्य गोळा करून शाळेत आणत आहेत. अशाप्रकारे आनंददायी शनिवार उपक्रम यशस्वीपणे सुरू आहे. त्याचे फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर, शाळेच्या यूट्यूब चॅनलवर, फेसबुकवर अपलोड केले जात आहेत. चांगल्या कृतींचे शाळा व्यवस्थापन समिती, पालक, केंद्रप्रमुख व इतर शाळेतील शिक्षकांकडून कौतुक होत आहे.

### उपक्रमाचे फायदे

- विद्यार्थ्यांची शिक्षणाची अभिरुची वाढीस लागेल
- गुणवत्ता वाढण्यास मदत होईल
- विद्यार्थी गळती व अनुत्तीर्णचे प्रमाण कमी होईल
- विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती वाढत आहे
- विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागला आहे
- संभाषण कौशल्याचा विकास होत आहे
- सभाधीठपणा वाढत आहे
- कृतीयुक्त शिक्षण सहज व आनंदी होत आहे
- नवनिर्मितीस चालना मिळत आहे
- मुले पूर्ण क्षमतेने काम करू लागले आहेत
- विचारशक्तीला वाव, मुले चिकित्सक होत आहेत
- वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागला आहे
- मुलांची शब्द संपत्ती वाढत आहे
- मुले स्वनिर्मितीचा आनंद घेत आहेत
- शिकण्याची तयारी खेळीमेळीच्या वातावरणत
- शिक्षक-विद्यार्थ्यांवरील ताण-तणाव कमी
- विविध मूल्यांचा विकास होत आहे

**माहिती मिळवणे :** विद्यार्थी चौकस बनतील, मोठ्यांशी संवाद कसा साधावा याचे तंत्र आत्मसात करतील. या कृतीसाठी आम्ही स्थानिक कारागीर, पोस्ट, दवाखाने, ग्रामपंचायत, बँक इत्यादी ठिकाणांना भेटी देऊन मुलाखत घेण्याचे नियोजन केले आहे. तसेच परिसर भेट, शैक्षणिक सहलचेही नियोजन केले आहे. याद्वारे मुले आपले गाव, शहराविषयी माहिती मिळवतील व प्रत्येक शनिवारी यातील एक एक भेट चालू आहे.

**खेळ :** यामध्ये आम्ही मनोरंजनात्मक, वैयक्तिक, सामूहिक खेळ व स्पर्धा निवडून आनंददायी पद्धतीने खेळातून शिक्षण देत आहोत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होईल. मुले आजारी पडण्याचे प्रमाण कमी होईल. पारंपरिक खेळ घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख होईल. ते सर्वांशी खिलाडू वृत्तीने वागतील, सहकार्याची भावना वाढीस लागेल.

**प्रयोग करणे :** विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जागृत होऊन विज्ञानाविषयी पर्यायाने शाळेविषयी आवड निर्माण होईल. वैज्ञानिक दृष्टिकोन जाणून घेऊन अंधश्रद्धा दूर होतील. प्रयोगासाठी घरातून, परिसरातून मिळणाऱ्या वस्तू मुले घेऊन येत आहेत. स्वतः छोटे-छोटे प्रयोग करून निष्कर्ष काढत आहेत. यामुळे निरीक्षण शक्ती वाढीस लागणार आहे.

**अवांतर वाचन :** विद्यार्थ्यांना आम्ही महावाचन चळवळीत सहभागी केले आहे. विविध पुस्तके शाळेच्या ग्रंथालयांमधील तसेच लोकसहभागातून मिळालेली गोष्टीची पुस्तके विद्यार्थ्यांना प्रत्येक शनिवारी वाचायला देतो. यामुळे मुलांची वैचारिक उंची वाढत आहे. वाचन कला विकसित झाल्यामुळे लेखन कला ही विकसित होत आहे.

**कला कार्यशाळा :** कलेमधील विविध प्रकार शनिवारी घेत आहोत. चित्रकला, गीत-गायन, कृतीगीते, गीतमंच गाणी, नृत्य-नाट्य इत्यादीमुळे विद्यार्थ्यांचे शाळेमधील उपस्थितीचे प्रमाण वाढत आहे. तसेच वेगवेगळ्या सणावाराला मेहंदी, रांगोळी, चित्रकला, रंगभरून स्पर्धा चे नियोजन केले आहे.

**कार्यानुभव कार्यशाळा :** यामध्ये टाकाऊपासून शोभेच्या, वर्ग सजावटीच्या वस्तू, मातकाम, कागदकाम, जलसाक्षरता, आपत्ती व्यवस्थापन, दैनंदिन उपक्रम, परिपाठ इत्यादी कृती प्रत्येक शनिवारी एकेक करून घ्यायची नियोजन आहे.

**गणिती व भाषिक खेळ :** यामुळे विषयातील मूलभूत संकल्पना पक्क्या होण्यास मदत होईल. विविध गणिती खेळ, जसे बाजार भरवणे, गणिती पेटीतील साहित्य द्वारे खेळातून शिक्षण, सापसीडी नाणी नोटांवरील व्यापार, इत्यादी कृती तसेच भाषिक खेळामध्ये कोडी सोडवणे, शब्द साखळी, शब्दभेंड्या, शब्दडोंगर, वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध, भाषणे इत्यादी कृती घेत आहोत.

याशिवाय विविध कृतींचे नियोजन केले आहे. जसे आरोग्यदायी सवयी, रस्तेसुरक्षा, माईंड फुलनेस वर आधारित कृती, नातेसंबंध वरील कृती, गटचर्चा, गटकार्य तसेच इतर प्रयोगशील शाळांच्या यशोगाथा टीव्हीवर दाखवणे, ई-लर्निंग साहित्य हाताळणे व माहिती मिळवणे, स्थानिक लोकांचे मार्गदर्शन, माता गटांचा सहभाग, स्थानिक कलाकारांचा सहभाग इत्यादी कृती वर्षभर घेण्यासाठी ठरलेले आहे.

**- कविता धन्यकुमार हिंगमिरे,**
जिल्हा परिषद शाळा, खंडाळी, ता. माळशिरस
मो. ९०७५००६१८९

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दैनिक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शहीद अशोक कामटे विचारमंचचे उद्या रक्तदान, नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

येथील शहीद अशोक कामटे विचारमंचचे संस्थापक अध्यक्ष योगेश कुंदूर आणि लायन्स क्लब मिडटाऊन, एचडीएफसी बँक, बिग ९२.७ एफएम, ड्रिम फौंडेशन, आस्था फौंडेशन, आस्था सामाजिक संस्था, विन गेम यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर रोजी रक्तदान, मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर होईल. संविधान दिनाचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबई येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांच्या स्मरणार्थ तसेच सोलापूरचे तत्कालीन लोकप्रिय पोलीस आयुक्त स्व.अशोकजी कामटे यांच्या १६व्या पुतण्यतिथीनिमित्त मंगळवारी सकाळी ९ ते ४ या वेळेत शिवस्मारक सभागृह नवी पेठ आणि रेल्वे स्टेशन रोड, विटा बँके समोर सांगोला येथे रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे.



तसेच मोफत नेत्ररोग तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे उद्घाटन सकाळी ११ होईल. नोंदणीसाठी ९३७०७०३००७ अथवा ७६२०६८०४६६ या मोबाईलवर संपर्क साधावा.




दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860


# सोलापुरातून कोणाची लागणार भाजपाच्या मंत्रिमंडळात वर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

भारतीय जनता पार्टीचे सोलापूर शहरातून ३ आणि जिल्ह्यातून २ तगडेच उमेदवार निवडून आलेले आहेत. या सर्वांनीच आपल्या विजयाचा जल्लोष आपापल्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात केला. मात्र, आता मंत्रीपदासाठी आपापल्या राजकीय गॉडफादरकडून प्रत्येकजण प्रयत्न करू लागल्याचे दिसून येत आहे. आता मंत्रीपदाची लॉटरी कोणाला लागणार? हे येणारा काळच सांगणार आहे.

सोलापूर शहरातील आ. सुभाष देशमुख, आ. विजय देशमुख यांनी यापूर्वी मंत्रीपद भोगली आहेत. या दोघांनीही ऐतिहासिक असाच विजय मिळविला आहे. दोन्ही देशमुखांनी तगडी प्रचारयंत्रणा राबविली. सुरूवातीला कासवगतीने प्रचार केला आणि शेवटचे तीन-चार दिवस रात्रीचा दिवस करून जोरदार प्रचार केला. पक्षाचे धोरण, लाडकी बहीण योजना, कामगार-शेतकरी, शेतमजुरांसाठी सरकारने केलेले काम आणि भविष्यात करावयाच्या विविध विकासकामाचा लेखा-जोखाच जनतेसमोर मांडला. यामुळे दोन्ही मतदारसंघातील जनतेने डोळे झाकून दोघांसाठी कमळावर शिक्का मारला. दोघांचा राजकीय अनुभव दांडगा आहे. यामुळे या दोघांपैकी एक आणि युवा नेता म्हणून कल्याणशेट्टी यांचे नावही मंत्रीपदासाठी चर्चिले जात आहे. आता मंत्रीपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? हे येणारा काळच सांगणार







आहे. आ. समाधान आवताडे आणि युवा नेते आ. देवेंद्र कोठे यांनीही त्यांच्या मतदारसंघात आपला प्रचार जोरात केला होता. मात्र, समोरचे उमेदवारही निब्बर (तितक्याच ताकदीचे) असल्याने दोघांनाही प्रचारात रात्रीचा दिवस करावा लागला. या दोघांचेही कार्यकर्ते-पदाधिकारी दक्षच होते. त्यामुळेच या दोघांनाही विजय संपादित करता आला. दोघेही तसे राजकारणात नवखेच असल्याने सध्यातरी मंत्रीपदासाठी यांच्या नावाची शहर-जिल्ह्यात चर्चा होताना दिसत नाही. विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्ष किंवा आघाडी दोनशेहून अधिक जागा मिळविण्याचा प्रकार राज्यात तब्बल ५२ वर्षांनंतर घडला आहे.

यापूर्वी १९७२ च्या निवडणुकीत असे घडले होते. यंदाच्या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीने दोनशेहून अधिक जागा मिळविण्याच्या इतिहासाची पाच दशकांनंतर पुनरावृत्ती केली आहे. विधानसभेच्या निकालानंतर आता मुख्यमंत्रिपदापासून मंत्रिमंडळाच्या फॉर्म्युलावर महायुतीमध्ये चर्चा सुरु झाली आहे. महायुतीच्या मंत्रिमंडळाचा संभाव्य फॉर्म्युला समोर आला आहे. भाजपा २१, शिवसेना (शिंदे) १२ व अजितदादा गट राष्ट्रवादी १० अशी मंत्रिमंडळाची विभागणी केली जाऊ शकते. वरील २१ मध्ये सोलापूरचे आमदार कोण राहणार? याबाबत सोलापूर शहर-जिल्ह्यात सध्या चर्चा सुरू आहे. सध्यातरी भाजपला सर्वाधिक म्हणजे २१ मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला १२, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला १० मंत्रिपदं मिळण्याची शक्यता आहे. या सूत्रावर प्राथमिक चर्चा झाली असून तिन्ही पक्षांचे मुख्य नेते दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करतील. त्यानंतर यामध्ये बदल होऊ शकतो. सोलापुरातील एकतरी नेता कॅबिनेटच्या मंत्रीमंडळात घ्यावा, अशी मागणी सोलापूर शहर-जिल्हा भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते करू लागले आहेत.

### महायुतीच्या उमेदवारांना 'सांगावा'

राज्यातील महायुतीच्या नवीन सरकारचा शपथविधी २५ तारखेला मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. दरम्यान, विधानसभेचे मैदान मारताच तिन्ही पक्षांची बैठक होणार आहे. यामध्ये भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना या तिन्ही पक्षांकडून स्वतंत्र बैठक घेतल्या जाऊ शकतात. यासाठी महायुतीच्या राज्यातील विजयी उमेदवारांना महायुतीतील जेष्ठ नेत्यांनी सांगावा धाडल्याची माहिती राजकीय गोटातून मिळाली.



सोलापूर : महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रविवारी सकाळी विजयी उमेदवार कार्यालयासमोर स्वच्छता केली. (छायाचित्र : केवल तिवारी)

## अमरावतीच्या महिलेचे ४२ हजारांचे साहित्य चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर -**

खुराणा ट्रॅव्हल्समधून प्रवास करणाऱ्या अमरावतीच्या महिलेचे ४२ हजारांचे साहित्य चोरट्याने चोरून नेले.

याबाबत अमृता वैभव चव्हाण (वय २४, रा. सिव्हील लाईन, दर्यापूर, जि. अमरावती) यांच्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमृता चव्हाण यांनी २२ नोव्हेंबर रात्री खुराणा ट्रॅव्हल्सच्या बस क्र. एमपी १३ पी ३८९९ मधून अकोला ते सोलापूर असा प्रवास केल्या. या प्रवासादरम्याने अमृता चव्हाण यांची मोठी ट्रॅव्हलींग बॅग चोरट्याने चोरून नेली. या बॅगेत रोख ४० हजार रुपये, साड्या, मेडीकलची कागदपत्रे, पर्स, बॅग असा ४२ हजार रुपयांच्या साहित्यांचा समावेश आहे. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक भद्रशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

### ▶▶ संक्षिप्त वृत्त...



ममता बोलबत्तीन



सुनील पवार

## रोज क्लबच्या अध्यक्षपदी ममता बोलाबत्तीन, सचिव सुनील पवार

**सोलापूर दि.२४ नोव्हेंबर-**

रोज क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षपदी ममता बोलबत्तीन तर सचिव पदी सुनील पवार यांची निवड झाली. संस्थापक अध्यक्ष प्रकाश भुतडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. अन्य पदाधिकारी : वैशाली कुलकर्णी (खजिनदार), संजीवनी देवसानी, अनुराधा चांडक, पुष्पा गुंगे (उपाध्यक्ष), कला चन्नापटण (सहसचिव), शिरीष गोळवलकर (सहखजिनदार), शांता येळंबकर, गुरुचरण गेदू, आनंद जोशी, मंजुषा वल्लाकाटी, अरुणा कापसे, संगीता धायफुले, भारती भगत, उदय कुंभार, संगीत खंदारे, समीर इनामदार, स्नेहा जोशी (संचालक), मदनमोहन बुरगुल (जनसंपर्क अधिकारी)

## बुधवारपासून शिक्षकांसाठी स्काऊट गाईड प्रशिक्षण

**सोलापूर दि.२४ नोव्हेंबर-**


सोलापूर शहर-जिल्हा स्काऊट गाईड संस्थेच्यावतीने प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी बाळे येथील ज.रा.चंडक प्रशालेत २७ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर दरम्यान स्काऊट गाईड निवासी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्राथमिक व प्रगत हे दोन्ही प्रशिक्षण होणार आहे. सध्या शासनाच्यावतीने सर्व शाळेत स्काऊट गाईड विषय अनिवार्य करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड गणवेश देण्यात आली आहे. यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. पहाटे ५.३० ते रात्री १० अशी प्रशिक्षणाची दिनचर्या असते. पहाटे राम धून, फिजीकल जर्क ,बी. पी. व्यायाम,योगा, प्राणायाम, सूर्य नमस्कार, संचलन मार्च पास, इस्पेक्षण, कोपरा सजावट, ध्वजारोहण, बौद्धिके अभ्यासक्रम, मैदानी खेळ,परिसर भेटी, प्रात्यक्षिके, शेकोटी आदी अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिली जाते. या प्रशिक्षणाप्रसंगी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त शंकर यादव यांच्यासह राज्यातील अधिकारी भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत.तरी शहर जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या शासकीय, खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेण्याचे आवाहन उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेली, स्काऊट संघटक श्रीधर मोरे, गाईड संघटक अनुसया सिरसाट यांनी केले आहे.



## जिल्हा गणित स्पर्धा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात

**सोलापूर दि.२४ नोव्हेंबर-**

सोरेगाव येथील अजिंक्य रॅफ्लेशिया क्लासेसतर्फे थोर गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या १३८ व्या जयंतीनिमित्त १५ डिसेंबरनंतर जिल्हा गणित स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा दुसरी ते पाचवी आणि सहावी ते दहावी या दोन गटात होणार आहे. सहभाहगी व उत्तीर्ण सर्व स्पर्धकास प्रमाणपत्र व विविध बक्षिसे व आकर्षक भेट वस्तू देण्यात येणार आहे. विजेत्यास सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. इच्छुकांनी ९६३७७८३७५० या वॉटसअप नंबरवर इयत्ता व शाळेच्या नावासह नोंदवावी, असे संचालक काशीनाथ माळी यांनी कळविले आहे.





## भाजपा कार्यालय परिसरात विजयाचा जल्लोष

**● शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील विजयाचा आनंदोत्सव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर -**

राज्यातील महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश संपादन करता आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीला मिळालेल्या न भूतो न भविष्य घवघवीत यश मिळाल्याबद्दल, भाजपा शहर कार्यालया समोर भाजपच्या पदाधिकारी यांनी जल्लोष करून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

भाजप येथील कार्यालया समोर दुपारी तीन वाजता मोठा जल्लोष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याने सदरचा जल्लोष करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी महाराष्ट्रातील लाडक्या बहिणीला दसरा-दिवाळी सणासाठी भेट म्हणून दीड हजार रुपये थेट अकाउंटमध्ये जमा केल्याने तसेच अडीच वर्षात न भूतो न भविष्य असा विकास करून दाखवला, अशा अनेक जनतेच्या, विशेष करून शेतकऱ्यांसाठी हिताचे निर्णय घेण्यात आले. त्यामुळे जनतेने आम्हाला पुन्हा एकदा सत्तेवर आणले आहे असे प्रतिक्रिया राज्याचे तीनही प्रमुख नेते एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, आणि अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान स्थानिक पातळीवर देखील जनतेने महायुती आणि पर्यायाने भाजपला साथ देत, जनतेने भुलथापांना बळी न पडता महायुती सरकारला भरभरून प्रतिसाद देऊन एक हाती सत्ता मिळवुन दिल्याबद्दल जनतेचे आभार मानण्यात आले.

भाजपा शहर कार्यालयासमोर जल्लोष करण्यात आला यावेळी शहर सरचिटणीस पांडुरंग दिंडी, विजया वड्डेपल्ली, दत्तात्रेय पोसा, नगरसेविका राजश्री चव्हाण, भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप शिंदे, अनिल सरगम, सुभाष मोडे, रमेश बिंगी, अनिल चव्हाण आदींसह पदाधिकारी प्रमाणात उपस्थित राहून जल्लोष साजरा केला.

## पैशाच्या कारणावरून घरात घुसून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर -**

पैशाच्या कारणावरून घरात घुसून मारहाण करणाऱ्याविरूध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रभाकर शंकर निली (वय ४९, रा. शिरालिंग नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमित क्षिरसागर (रा. सोना चांदी अपार्टमेंट, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२२ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास प्रभाकर निली यांच्या घरात त्यांच्या ओळखीचा अमित क्षिरसागर हा आला व त्याने निली यांना तु माझे घेतलेले पैसे का देत नाही या कारणावरून घरात घुसून दमदाटी करून जबर मारहाण केली. यामध्ये निली यांच्या मनगटाला मार लागून ते जखमी झाल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

## पद्मशाली समाजाचे एकमेव उमेदवार देवेंद्र कोठेंना मंत्रीपद द्या

**श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनची उपमुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

महाराष्ट्रातील पद्मशाली समाजाचे एकमेव आणि भाजपाचे शहर मध्यचे विजयी उमेदवार देवेंद्र कोठे यांना मंत्रीपद द्यावे,अशी मागणी श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, सोलापूर आणि पद्मशाली सखी संघम यांच्या वतीने भाजपाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महाराष्ट्रातील पद्मशाली समाजाचे आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार पहिल्यांदाच विधानसभा निवडणुक लढणारे देवेंद्र कोठे हे भरघोस मताधिक्यानी निवडुन आले आहेत. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील पद्मशाली समाजासाठी भूषणावह आहे. त्याची उमेदवारी उशीरा घोषणा होऊनही रात्रदिवस स्वतः देवेंद्र कोठे, त्यांचा परिवार, संघाचे, भाजपाचे, महायुतीचे ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते, पद्मशाली समाजाचे काही संघटनेचे पदाधिकारी यांच्यासह अनेक नागरिकांनी देवेंद्र कोठे यांच्या विजयासाठी कठोर परिश्रम घेतले आहे. देवेंद्र कोठे यांच्याकडून सोलापूरकरांची व पद्मशाली समाजातील अनेकांची अपेक्षा वाढली आहे. महाराष्ट्रात पद्मशाली समाजाची असलेली लोकसंख्या विचारात घेणेही महत्वाचे आहे. यासाठी देवेंद्र कोठे यांना मंत्रिमंडळात स्थान दिल्यास समाजासह इतर अनेक प्रश्न मार्गी लागतील, असे निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर अध्यक्षा मेघा इट्टम, सचिव पूजा विप्पा, उपाध्यक्षा कल्याणी पेनगोंडा, सल्लागार कल्पना अर्शनपल्ली, उपाध्यक्षा मंजुळा आडम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भाजपा कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांनी जीवाचं रान केल्यानेच तीनही जागांवर यश


**भाजपा शहराध्यक्ष काळे यांची प्रतिक्रिया | लाडक्या बहिणींचाही लाभला आशीर्वाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

केंद्र आणि राज्य सरकारने सोलापूर शहरच नाही तर जिल्ह्यात हजारो कोटींची विकासकामे केल्याने सर्वसामान्य जनतेतून यंदा समाधानाचे वातावरण होते. या निवडणुकीत सोलापूर शहर मध्यचीही जागा भारतीय जनता पार्टीकडे यावर्षी आल्याने अत्यंत समाधान वाटत होते. कारण अशी निवडणूक पहिल्यांदाच होती. या तीनही जागांवरील उमेदवारांना निवडून आणण्यासाठी मी आणि आमच्या पदाधिकाऱ्यांनी जीवाचं रान करून निवडूण आणण्याचा शब्द दिला होता आणि तो शब्द आम्ही आता पूर्णही करून दाखविला. इतकेच कायतर आमच्या उमेदवारांना लाडक्या बहिणींचाही मोठा आशीर्वाद असल्याची प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे सोलापूर शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दैनिक तरूण भारतशी खास संवाद साधताना रविवारी (दि.२४) दिला.

यंदा विधानसभा निवडणुकीसाठी कधी नव्हे ते तीन पक्षांचे कोंडाळे झाले होते. पूर्वी मतदारसंघात परंपरागत पक्ष एकमेकांविरोधात उमेदवार उतरवून प्रचाराचा बार उडवत होते. मात्र यंदा राज्याच्या राजकारणाने कूस बदलली. या विधानसभा





निवडणुकीत कोण कुणाचा शत्रू आणि कोण मित्र? हे आघाडी आणि महायुतीवरून कळले. यामुळे या निवडणुकीत आमच्या पक्षश्रेष्ठींनी तीनही मतदारसंघात उमेदवार स्ट्रॉंग दिले होते. त्या सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी आमचे कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांनी रात्रंदिन उमेदवारांने काम केले. शहर दक्षिण आणि उत्तर मतदारसंघातील बापू आणि मालक यांची प्रचारयंत्रणा स्ट्रॉंगच होती. शहर मध्यसाठीही ही यंत्रणा सक्षम करून आम्ही नवीन उमेदवार असलेले देवेंद्र कोठे यांच्यासाठी जास्तीचे कष्ट घेतले. यामुळे हे तीनही उमेदवार मोठ्या मतदाधिक्याने निवडून आले आहेत.

या तीन उमेदवारांसाठी पक्षश्रेष्ठींकडून वरिष्ठ नेतेही प्रचारात उतरले होते. गेल्या अडीच वर्षात महायुतीने केलेल्या कामाचा लेखा-जोखा घेवूनच आम्ही मतदारांपुढे गेलो होतो. इतकेच नाहीतर भविष्यातील संकल्पही जनतेसमोर मांडले होते. या उमेदवारांसाठी विविध कॉर्नर सभा, जाहीर सभा आणि रोजच पदयात्रा काढणे सुरू होते. यामध्ये शहर-जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग होता. आता जनतेने भरभरून मताचे दान दिले असून, आता त्याबदल्यात जनतेची सर्व कामे या उमेदवारांकडून मी करून घेणार आहे. शहरातील बेरोजगारीचा विषय असो, विमानसेवा, उड्डाणपुलं, नवीन उद्योजक शहरात आणून आयटी पार्क निर्मिती करणार असल्याचा मनोदय भाजपा शहराध्यक्ष काळे यांनी व्यक्त केला. येणाऱ्या काळात लाडक्या बहिणींना पुन्हा अर्थसाहाय्य करणे, शेतकरी, शेतमजूर, कामगारांची विविध कामे मार्गी लावण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांची वीजबील माफी आमच्या सरकारने केली आहे. आता त्यांची कर्जमाफी, मुलींना मोफत शिक्षण व इतरही समाजातील घटकांना योग्य पध्दतीने न्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचेही काळे यांनी शेवटी सांगितले.

## बॅलेट पेपरशिवाय यापुढे निवडणूक लढवणार नाही : ॲड. सोमनाथ वैद्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर -**

बॅलेट पेपरवर निवडणूका सुरु झाल्याशिवाय यापुढे कोणतीही निवडणूक लढवणार नाही, अशी भूमिका सोलापूर दक्षिण मतदार संघातील अपक्ष उमेदवार ॲड. सोमनाथ वैद्य यांनी जाहीर केली आहे.



ॲड.वैद्य यांचे सोलापूर दक्षिण विधानसभा निवडणुकीत डिपॉझिट जप्त झाले असून यापुढे जोपर्यत ईव्हीएम मशीन सोडून बॅलेट पेपरवर जोपर्यंत निवडणुका होत नाहीत तोपर्यत एकही निवडणूक लढवणार नाही, असे घोषित केले. मी ही निवडणूक प्रस्थापितविरुद्ध जनतेला एक कामाचा नवा चेहरा मिळावा यासाठी लढली होती. दक्षिण सोलापूरच्या जनतेने मला कमी वेळात स्वीकारून मतदानही केले. परंतु ते ईव्हीएम मशीनवर का दिसलें नाही हा संशोधनचा विषय आहे. शेअर मार्केटमध्ये हरलेले पैसे आणि इव्हीएम मध्ये मतदार यांनी मतदान करूनही न दिसलेले मतदान याविरुद्ध कुठेही कायदेशीर पुराव्यासह दाद मागता येणार नाही. याचे मूळ कारण म्हणजे मतदान करताना कोणताही मतदान एका ठराविक व्यक्तीला केलेला पुरावा नसतो. दक्षिणच्या सर्वसामान्य मतदार यांनी मला मतदान केले. परंतु मला झालेले साधारण १० ते १५ हजार मतदान थेट विजयी उमेदवाराला ट्रान्सफर करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी वाटते, असा गंभीर आरोप ॲड. वैद्य यांनी केला आहे.

मी ही निवडणूक जनतेला एक कामाचा नवा चेहरा मिळावा यासाठी लढली होती. ६ महिन्याच्या काळात जवळपास थेट ५ ते १० हजार लोक जोडली. परंतु कालचा निकाल हा माझ्यासाठी अत्यंत धक्कादायक होता. काहीतरी मोठी गडबड यामध्ये दिसून येते. काल दिवसभरात मला मतदारसंघातील अनेक गावातील कार्यकर्ते फोन आले आणि आम्ही तुम्हाला मतदान करूनही ते त्या संबंधित बूथवर दिसून येत नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. यापुढे उच्च न्यायालयात गरजू जनतेसाठी विधी सल्लागार म्हणून काम करणार आहे. आ. सुभाष देशमुख हे आपणास आदरणीय व्यक्तीमत्व आहे. त्यांना प्रचारात नाकारणाऱ्यांनी मते टाकून स्वीकारले याचे आश्चर्य वाटते, असेही त्यांनी म्हटले आहे.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९५४

**ज्ञानामृत आनंदलहरी भाग-९५४**
**तो हा निवृत्तीनाथ निर्धारी । स्मरता तरती नरनारी ।।**
**सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ती दातार ।।**

संत श्री निवृत्तीनाथ हे श्री ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताईंचे थोरले बंधू होत. श्री निवृत्तीनाथ हे आत्मज्ञान प्राप्त असणारे होते. त्र्यंबकेश्वर येथील ब्रम्हगिरी पर्वताच्या अंजनी गुहेत श्री गहिनीनाथांचा कृपाप्रसाद श्री निवृत्तीनाथांना प्राप्त झाला होता. सदगुरुंच्या या कृपाप्रसादाचा सदुपयोग जनसामान्यांसाठी व्हावा ही श्री निवृत्तीनाथांची मनोमन इच्छा होती. त्यांनी आपली ही इच्छा ज्ञानदेवांमार्फत पूर्णत्वास नेण्याचे ठरवले होते. श्री ज्ञानदेव आपल्या थोरल्या बंधूची ही इच्छा पूर्णत्वास नेण्यास पात्र होते. नाथसंप्रदायात एकाने एकाला सांगण्याची किंवा देण्याची प्रथा होती. निवृत्तीनाथांपर्यंत हे आत्मज्ञान एक गुरू एक शिष्य या परंपरेने चालत आले होते. त्यामुळे आत्मज्ञानाचा फायदा जनसामान्यांना होत नव्हता. म्हणून श्री निवृत्तीनाथांनी या परंपरेला फाटा दिला. परंपरेचा किंवा सांप्रदायाच्या बंधनाचा विचार न करता जनहित विचारात घेऊन त्यांनी हे आत्मज्ञान, तत्वज्ञान आंपले बंधू श्री ज्ञानदेव यांच्यामार्फत श्री ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जनसामान्यांसाठी खुले केले. संसारात अडकलेल्या जीवाला मानवतेचा मार्ग दाखविण्यासाठी श्री निवृत्तीनाथांनी उचललेले हे



**सेना महाराज**

पाऊल एक आध्यात्मिक क्रांती करणारे पाऊल होय. त्या काळात असे पाऊल उचलणे ही साधी बाब नव्हती. समजावर सत्ता गाजवणाऱ्या लोकांच्या विरोधातला हा निर्णय होता. हे धाडस श्री निवृत्तीनाथच करु शकत होते. त्यांच्या अगोदर कोणीही असे पाऊल उचलले नाही. अशा या क्रांतीकारी निवृत्तीनाथांची आठवण करणारा व्यक्ति संसाराची मायानदी सहज तरून जाऊ शकतो. तो हा निवृत्तीनाथ निर्धारी । स्मरता तरती नरनारी ।।, असे सेनाजींना वाटते.

श्री निवृत्तीनाथ हे, महादेवाचा अवतार आहेत, असे सांगतांना संत जनाबाई, सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ती दातार ।।, असे म्हणतात. तीन अक्षरें निवृत्ति । जो जप करी अहोरात्रीं । तया सायुज्यता मुक्ती । ब्रहमस्थिति सर्वकाळ ।।, असे शांतीब्रहम एकनाथ महाराज म्हणतात. निवृत्तीनाथांनी जर श्री ज्ञानदेवांना समाजहिताचे बंदिस्त ज्ञान खुले करण्याची परवानगी दिली नसती तर आपण अध्यात्मिक ज्ञानापासून बरेच दूर राहीलो असतो. निवृत्तीनाथांचा कृपा प्रसाद म्हणजे श्री ज्ञानेश्वरी होय. ज्ञानेश्वरी आपणास मिळाली म्हणून आपण गीता समजून घेऊ शकतो. गीता समजली नसती तर आपण ख-या शाश्वत ज्ञानापासून दूर राहीलो असतो. खरोखरच श्री ज्ञानेश्वरी हा अनुभवण्याचा ग्रंथ आहे. अनेक संतांनी श्री ज्ञानेश्वरी वाचावीच म्हटले आहे, त्याचबरोबर ती अनुभवावीही म्हटले आहे. आपणही ती अनुभवण्याचा प्रयत्न करायला हवा. कारण माऊलींची श्री ज्ञानेश्वरी कळली व वळली तर जीवनात आनंद वेगळयाने शोधावा लागत नाही, असे आम्ही स्पष्टपणे म्हणू शकतो. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : सोमवार** | **दिनविशेष -** |
| **दि. २५ नोव्हेंबर २०२४** | **महावीर दीक्षोत्सव (जैन)** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **कान, नाक टोचणेस शुभ.** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - कार्तिक** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. नवमी (२२.१८)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - उ. फाल्गुनी(२५.२२)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - वैष्कंभ (१३.१०)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - वणिज(११.३८)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल.

# शहरात स्क्रॅप रिक्षांचा सुळसुळाट

## हवेत पसरतायत धुराचे लोळ; नागरिकांमध्ये वाढताहेत श्वसनाचे आजार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

स्मार्ट सोलापूर सिटी स्क्रॅप झालेल्या धुराड्या रिक्षांचा सुळसुळाट कायम आहे. शहरात स्क्रॅप रिक्षा हवेत धूर सोडत असल्याने हवा प्रदूषण होऊन श्वसनाचे विकार आणि आजार वाढत चालले आहेत. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

स्मार्ट सोलापूर सिटीत स्मार्ट रिक्षांसह स्क्रॅप झालेले रिक्षा देखील धावत आहेत. या दुय्यम दर्जाच्या रिक्षांमुळे शहरात हवा प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. रिक्षा सर्व बाजूंनी सुरक्षित आणि व्यवस्थित ठेवणे आवश्यक असताना रिक्षाचालक रिक्षा व्यवस्थित ठेवत नाहीत, यामुळे अनेक समस्या उद्भवत आहेत. स्क्रॅप झालेल्या रिक्षा अद्यापही रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धावू लागले आहेत. यारिक्षांमधून धुराचा लोटच्या लोट बाहेर पडत असल्याने वाहनधारकांना श्वसन प्रक्रियेस अनेक त्रास आणि आजारांचा सामना करावा लागत आहे.

स्मार्ट शहरातील स्मार्ट रस्त्यांवर नवनवीन पद्धतीचे रिक्षा धावत आहेत. त्यामध्ये ई रिक्षा आणि बी.एस.६ नव्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या रिक्षा यांचा समावेश आहे. तसेच जुनाट झालेल्या स्क्रॅप धूर सोडणाऱ्या डबघाईला आलेला रिक्षांचा देखील मोठ्या प्रमाणात समावेश आहे. यामुळे हवेत धूर पसरून प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. शहराच्या हद्दवाढ भागात मोठ्या प्रमाणात या रिक्षा पहावयास मिळतात. दुय्यम आणि मिश्रित दर्जाचे इंधन वापरल्यामुळे देखील धुराचे प्रमाण वाढत आहे.

वाढत्या प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार उद्भवत आहेत तर स्क्रॅप रिक्षांमुळे अपघात होण्याचा धोका देखील बळावत आहे. यावर प्रशासनाने तात्काळ कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**धुरामुळे गंभीर आजार उद्भवण्याची शक्यता**

वाढत्या धुरामुळे रस्त्यावरून येणे जाणे कठीण बनले आहे. रिक्षाच्या मागे धुराचे लोटच्या लोट असतात. वाढत्या धुरामुळे नाकामध्ये धूर जाऊन श्वसन प्रक्रिया बिघडत आहे. विविध विकार आणि दमासारखा रोग उद्भवत आहे. विषारी वायू नाकाद्वारे शरीरात जात असल्याने शरीरात विविध गंभीर स्वरूपाचे आजार उद्भवण्याचा मोठा धोका निर्माण होत आहे याकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. असा सूर आता वाहनधारक आणि शहरवासीयांमधून उमटत आहे.

**- अशोक पत्की, नागरिक**



**सोलापूर : शहरातील व्हीआयपी रोड, सातरस्ता रोड, आसरा रोडवर धावताहेत धूर सोडणाऱ्या स्क्रॅप रिक्षा.**


# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जयम थोरे प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

सोलापूर मराठी विज्ञान परिषद व दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ, शिवदारे कॉलेज सोलापूर व युनिक इंग्लिश मीडियम यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात आलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात कै. विलासचंद्र मोतीचंद मेहता प्रशालेच्या इ ८वी तील जयम थोरे याने बनविलेल्या obstacle Detector machine for blind person या उपकरणाने प्रथम क्रमांक पटकाविला. या प्रदर्शनात ८५ उपकरणाचे सादरीकरण झाले. जयम याचा डॉ. अभय देशपांडे (आंतरराष्ट्रीय खगोल शास्त्रज्ञ. मुंबई) यांच्या हस्ते ट्राफी, सर्टिफिकेट व एक हजारा रूपये देवून सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मराठी विज्ञान परिषदचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश गंभीर, प्रा.धायगुडे मॅडम, प्रा. शेटे, दामले आदी शिक्षक, शिक्षकेतकर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पारधी समाजातर्फे आ. कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत भाजपच्या सचिन कल्याणशेट्टी यांनी माजी गृहराज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे यांचा सलग दुसऱ्यांदा पराभव करत विजय संपादन केला. त्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल तालुक्यात आणि जिल्ह्यात कौतुकांचा वर्षाव होत आहे. त्याच अनुषंगाने पारधी समाजाच्या वतीने नवनिर्वाचित आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना औक्षण करत त्यांचा सत्कार समारंभ करण्यात आला.

दरम्यान अक्कलकोट विधानसभा अधिकृत उमेदवार सचिन कल्याणशेट्टी यांना अक्कलकोट तालुक्यातील आदिवासी पारधी समाजा वतीने जाहीर पाठिंबा दिला होता. सुमारे दहा हजार मताधिक्य मिळवून देण्यासाठी पारधी समाजाने अथक प्रयत्न केले.

समाजातील ज्येष्ठांनी अक्कलकोट तालुक्यातील प्रत्येक गावागावात,वाड्या, वस्तीवर जाऊन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना मतदान करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत जनतेने कल्याणशेट्टी यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणले. त्याच अनुषंगाने त्यांचा सत्कार सन्मान करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते दाखल झाले होते. विजय झाल्याबद्दल पारधी समाजाच्या वतीने आणि भाजपा अनुसूचित जाती जमाती आघाडीच्या वतीने सन्मान केला असल्याचे भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरसेविका राजश्री चव्हाण यांनी सांगितले.

यावेळी भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरसेविका राजश्री चव्हाण, नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले लिंगराज चव्हाण, रेखा काळे, प्रल्हाद चव्हाण, संतोष चव्हाण, भाजपचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण आदींसह जेष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.

# नुकसान भरपाई मिळण्यासाठी द्यावी लागली जि.प.विरुद्ध २७ वर्षे न्यायालयीन लढत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर -**

माळशिरस तालुक्यात तांबवे येथे १९९७ मध्ये जिल्हा परिषद जीपने दिलेल्या धडकेत मृत पावलेल्या यासिन अब्दुल खान (रा. तांबवे, ता. माळशिरस) यांच्या वारसांना नुकसान भरपाईची संपूर्ण रक्कम मिळण्यासाठी २७ वर्षे न्यायालयीन लढा द्यावा लागला.

अनावश्यक अपील केल्यामुळे व हलगर्जीपणामुळे जिल्हा परिषद ला दुप्पट रक्कम भरावी लागली. सोलापूर न्यायालयाने मृताच्या वारसांना तीन लाख चाळीस हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी असा जिल्हा परिषदेला आदेश दिलेला होता. त्या आदेशाचे पालन न करता जिल्हा परिषदेने मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले. अपिलाच्या सुनावणी दरम्यान जिल्हा परिषदेचे वकील व प्रतिनिधी न्यायालयात हजर राहिले नाहीत त्यामुळे उच्च न्यायालयाने जिल्हा परिषदेचे फेटाळून लावले. त्यामुळे २०१९ मध्ये मृताच्या वारसांनी नुकसान भरपाई ची रक्कम वसुलीसाठी अर्ज दिल्यानंतर जिल्हा परिषदे ला त्यांनी केलेले अपील फेटाळल्याचे लक्षात आले. जि. प. ने पुन्हा अपील रेकॉर्डवर घेण्यात यावे असा अर्ज दिला.

अखेर २०२४ मध्ये उच्च न्यायालयात अपीलाची सुनावणी झाली आणि उच्च न्यायालयाने जिल्हा परिषदेचे अपील फेटाळून लावले. मूळ रक्कम तीन लाख चाळीस हजार व व्याज अधिक दंड मिळून चार लाख एकक्यांनव हजार असे एकंदरीत आठ लाख एकतीस हजार रुपये जिल्हा परिषदेला न्यायालयात भरावे लागले.

१९९७ मध्ये झालेल्या अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीच्या वारसांना सर्व रक्कम मिळण्यास २७ वर्षे लागली. या प्रकरणात मृताच्या वारसा तर्फे ॲड. धनंजय माने, ॲड. जयदीप माने, ॲड. एम. एस. मिसाळ, ॲड. सिद्धेश्वर खंडागळे, ॲड सुहास कदम, ॲड. वैभव सुतार यांनी काम पाहिले.

सरकार पक्ष उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात अनावश्यक अपील दाखल करत असल्यामुळे न्यायालयाचा अमूल्य वेळ वाया जातो व केसेसची संख्या वाढते याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा सरकार विरुद्ध ताशेरे ओढलेले आहेत. प्रस्तुतच्या प्रकरणात अपील दाखल करण्याची गरज नसताना अपील दाखल केले व सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्यामुळेअपीलातविलंबझालावव्याजाची रक्कम दंड रक्कम अशी दुप्पट रक्कम जिल्हा परिषद ला भरावी लागली.



# मनपा शिक्षण मंडळात माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये महाराष्ट्राचे पहिले माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लिपिक महेश वालावलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भालचंद्र साखरे, डॉ. हिराकांत जाधव, श्रावण भंडारे, अतिश कुलकर्णी समर्थ वालावलकर आदी मनपा प्राथमिक मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील मतदारांचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेचा मोठा सहभाग

### जिल्हाधिकाऱ्यांनी केले होते निवडणुकीचे मायक्रोप्लॅनिंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

२० तारखेला विधानसभा निवडणुकांचे मतदान झाले आणि २३ नोव्हेंबरला निकालही लागला. या निवडणुकीत मताचा टक्का वाढला असून, युवा मतदार आणि यादीतून नाव राहिलेल्या नागरिकांसाठी वारंवार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आवाहन करून मतदार नोंदणी वाढविली. यामुळेच विधानसभा निवडणुकीत लाखोंनी मतदान वाढले आहे. तर या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशीर्वाद यांनी मायक्रोप्लॅनिंग केल्यानेच कोणताही अनुचित प्रकार न घडता ही निवडणूक शांततेत पार पडली.

या विधानसभा निवडणुकीत मतदान केंद्र संख्या वाढविल्याने यंदा मतदान केंद्रांची संख्या ३ हजार ७३८ इतकी होती. जिल्ह्यातील ११ मतदारसंघात पुरूष मतदार १९ लाख ७१ हजार ८३१, महिला- १८ लाख ७६ हजार ७२८, तृतीयपंथीय -३१०, असे एकुण ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदार होते. यापैकी जवळपास ६८ टक्के नागरिकांनी बुधवारी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येवून लोकशाहीच्या उत्सवात आपला सहभाग नोंदविला. जिल्ह्यातील ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदारांपैकी १३ लाख ६६ हजार ५८८ पुरूषांनी तर १२ लाख ३९ हजार ८६८ महिलांनी व इतर ११५ जण अशा २६ लाख ०६ हजार ५७१ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. याच वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत जिल्हाधिकारी आणि इतर शासकीय अधिकाऱ्यांना यादीतून नावच गहाळ झाल्याचे शेकडो फोन आले होते. यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मनावर घेवून वारंवार अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बैठका घेवून यादीतून नाव गहाळ झालेल्या लोकांचे म्हणणे ऐकून नावे नोंद केली. प्रत्येक कॉलेजवर जावून मतदान जनजागृती केली. विविध खाश्रगी संस्थांनीही मतदान जनजागृती केली. तर जिल्हाभरात मतदान करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांच्या मार्फत गावोगाव जनजागृती केली होती. यामुळे यावर्षी मतदार यादीत नाव नसल्याच्या तक्रारी आल्या नसल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

**लोकसभेनंतर २ लाखांपर्यंत वाढले नवीन मतदान**

जिल्ह्यात डिसेंबर २०२३ मध्ये मतदारांसाठी विशेष मोहीम राबवून १ लाख ५६ हजार मयत, स्थलांतरीत वगळले. या सर्व मतदारांची विधानसभा निवडणुकीपूर्वी १०० टक्के पडताळणी केली. यातही चुकून वगळले गेलेले २३७२ जणांनी पुन्हा नोंद घेतली. तर लोकसभेनंतर १ लाख ९२ हजार ०३६ नवीन मतदारांची नोंदणी केली आहे. यामुळे या मतदार यादीत नाव नाही अशी तक्रारच आली नाही. या निवडणुकीसाठी महिलांसाठीही विशेष मोहीम राबविल्याने १ लाख १८ हजार ०४४ एकढ्या महिला मतदारांची नव्याने नोंदणी केली.

**- कुमार आशीर्वाद**
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### राणादादांचा विजय; अणदूरमध्ये जल्लोष

**अणदूर, दि. २४ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे विधानसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी मिळवलेल्या विजयानिमित्त आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी गावातून गुलालाची मुक्त उधळण करीत फटाक्यांची आतषबाजी करीत मिरवणूक काढण्यात आली. ग्रामदैवत श्री खंडोबाचे दर्शन घेऊन विजय साजरा करण्यात आला. राणादादा तुम आगे बढो, हम तुम्हारे साथच्या घोषणा देण्यात आल्या. एकच वादा, राणादादा, आदी घोषणाने परिसर दणाणून गेला. यावेळी भाजपा नेते सुनिल चव्हाण, माजी सभापती ॲड. दीपक आलुरे, माजी सरपंच धनराज मुळे, माजी पं. स. साहेबराव घुगे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, दीपक घोडके, सिध्दाराम धमुरे, दयानंद मुडके, बाबुराव मुळे, मनोज मुळे, प्रविण घोडके, शिवकुमार स्वामी, अक्षय कर्पे आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.



### आ. राणा पाटील यांनी घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट

**अणदूर, दि. २४ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्याचे नवनिर्वाचित आ. राणा जगजितसिंह पाटील यांनी मुंबई येथे सागर बंगल्यावर जाऊन महायुतीच्या विजयाचे शिल्पकार, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी तुळजाभवानी साखर कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन काळे, मल्हार पाटील व इतर भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी नूतन आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.



### आ. पाटील विजयी; कुर्डूवाडीत काँग्रेस कार्यकर्त्यांकडून जल्लोष

**कुर्डूवाडी, दि. २४ नोव्हेंबर-**

करमाळा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार नारायण गोविंदराव पाटील यांनी दणदणीत विजय संपादन केल्याबद्दल कुर्डूवाडी येथे शहर काँग्रेसचे अध्यक्ष फिरोज खान यांच्या नेतृत्वाखाली शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन ढोल, ताशांच्या गजरात गुलालाची उधळण करीत फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला. करमाळा मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार नारायण पाटील, अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे व शिंदेसेनेचे दिग्विजय बागल यांच्यात चुरशीने झालेल्या लढतीत नारायण पाटील यांनी तब्बल १६ हजार १९ मताधिक्य घेऊन विजय संपादन केला. नारायण पाटील यांचा विजयी घोषित होताच कुर्डूवाडीसह आसपासच्या परिसरातील कार्यकर्त्यांनी चौकाचौकात गुलाल उधळून, फटाके फोडत गावातून विजयी फेरी काढून आनंदोत्सव साजरा केला यावेळी राजा सुसलादे, दत्ताजी गवळी, सोमनाथ देवकते, संतोष शिंदे, हमीद शिकलकर, शंकर बागल, शाहनवाज शेख, कुमार गव्हाणे, रवी आठवले, इसाक अत्तार, अशोक खाडे, धनु कोकरे, राजा शेंबडे, निलेश गवळी, रवी सुसलादे, जाकीर शेख, अमित त्रिंबके, जय काळे, सतीश गायकवाड, सोहेल तांबोळी, पापामिया शेख, गणेश सुरवसे, बालाजी साबळे, अमर जगताप, आकाश खिलारे, विजय सोनवर, सुनिल मुसळे, विनोद भाळवणकर, ईश्वर बंडगे, नाथा क्षीरसागर, हरी हनवते यांच्यासह उपस्थित होते.



### अभिजित पाटीलांची विजयी मिरवणूक

**माढा, दि. २४ नोव्हेंबर-**

माढा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित पाटील निवडून येताच मोडनिंब शहरात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. दत्त चौक येथे कार्यकर्त्यांनी फटाके फोडून घोषणा दिल्या. सायंकाळी अभिजीत पाटील यांची शहरातून वेताळ साहेब मंदिर, ग्रामपंचायत परिसर,दत्त चौक, स्टेशन रोड परिसरातून विजयी मिरवणूक काढण्यात आली. गुलालाची उधळण करण्यात आली. जेसीबीतून गुलाल उधळत घोषणा दिल्या. रामकृष्ण हरी, वाजली बघ तुतारी अशा प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या.छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपूल येथे दुपारी दोन वाजल्यापासून मोडनिंब, बावी, अरण परिसरतील कार्यकर्ते गुलालाची उधळण करत होते. अभिजित पाटील यांचा ताफा मोडनिंब येथे दाखल होताच कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला. शहरातून विजयी मिरवणूक काढण्यात आली. मोडनिंब येथे ग्रामदैवत श्री वेताळ साहेबांना पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली. यावेळी समर्थक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंसामुक्तीसाठी हॅलोकडून युवा जागर अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २४ नोव्हेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील हॅलो मेडिकल फाउंडेशन संस्था ही धाराशिव व सोलापूर जिल्ह्यामध्ये विविध उपक्रम राबवत आहे.त्याच अनुषंगाने हिंसामुक्तीसाठी युवा जागर अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

आरोग्य, स्त्री पुरुष समानता, स्त्रीयांवरील हिंसाचार, उपजीविका, शेती, विज्ञान अशा विविध विषयांवर संस्था शंभर गावांमध्ये कार्यरत आहे. तुळजापूर आणि लोहारा तालुक्यातील एकूण तीस गावांमध्ये निर्धार समानतेचा हा प्रकल्प राबवत आहे. स्विसएड आणि युरोपियन युनियनच्या सहाय्याने राबवण्यात येणाऱ्या या प्रकल्पाअंतर्गत गाव पातळीवर जाणीवजागृती, प्रशिक्षण, सामूहीक कृती आणि अभियानांच्या माध्यमातून बालविवाह आणि स्त्रियांवरील हिंसेला प्रतिबंध करण्याचं काम संस्था करत आहे. याच कामाचा भाग म्हणून २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२४ या काळात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एक अभिनव अभियान राबवण्याचे नियोजन संस्थेनी केलेलं आहे

हे अभियान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात किशोरवयीन




मुलं-मुली आणि तरुणाईसोबत तरुण मुला मुलींमधील छेडछाड, ताणतणाव, व्यसनाधीनता, करिअर या विषयाला अनुसरून संवाद साधेल. युवा पिढीतील ताण-तणाव ओळखून त्यातून सकारात्मक दिशा शोधण्यासाठी खेळ, पोस्टर प्रदर्शन, चित्रफित प्रदर्शन, स्व संरक्षणाचे प्रात्यक्षिके, विद्यार्थ्यांचे वक्तृत्व/ मनोगते, प्रश्नमंजुषा, गप्पा, गाणी, गोष्टी, तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे हे अभियान तुळजापूर तालुक्यातील चव्हाणवाडी, दिंडेगाव, मानेवाडी हगलूर, मानमोडी, अलियाबाद, तीर्थ खुर्द, बसवंतवाडी, बोरनदीवाडी, चिकुंद्रा, वडगाव लाख, वडगाव देव, होनाळा, मे. जवळगा, वाणेगाव तर लोहारा तालुक्यातील उंडरगाव, मोघा खुर्द, वि. पांढरी, फनेपूर, माळेगाव, उदतपूर, मुर्शद्पूर, सालेगाव, काटे चिंचोली, रेबे चिंचोली, करजगाव, राजेगाव, तोरंबा, तावशी गड, कोंडजीगड आदी गावांमधून संपन्न होत आहे. यासाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ शुभांगी अहंकारी, संचालक डॉ.क्रांती रायमाने, सामाजिक कार्यकर्त्या मेधा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान समन्वयक बसवराज नरे, तालुका समन्वयक सतीश कदम, नागिणी सुरवसे, समुपदेशिका वासंती मुळे यांच्यासह श्रीराम जाधव, इंदुबाई कबाडे, प्रणिता भोसले, सोपान सुरवसे, स्वाती पाटील, ज्ञानेश्वर जाधव, नूतन गायकवाड, दिनकर गाढवे यांच्यासह महिला प्रेरिका अभियान यशस्वितेसाठी प्रयत्न करीत आहेत.

> **आज होणार शुभारंभ**
>
> या अभियानाची सुरुवात २५ नोव्हेंबर रोजी तावशीगड येथून डॉ. सविता शेटे यांच्या हस्ते होणार आहे. तर ५ डिसेंबर रोजी आलीयाबाद येथे जेष्ठ पत्रकार चिंचोळकर यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे.

# उद्योजक, नवउद्योजकांसाठी सुवर्णसंधी

### खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा पुढाकार; गुजरातचा घडवणार दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २४ नोव्हेंबर-**

माढा मतदारसंघाचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा लोकसभा मतदारसंघ व सोलापूर जिल्ह्यातील उद्योजक आणि नवोदित उद्योजकांसाठी गुजरात गांधीनगर येथे शिवरत्न शिक्षण संस्था आणि शिवामृत दूध संघ यांच्या सहकार्याने एक विशेष अभ्यास दौरा आयोजित केला आहे. अभ्यास दौऱ्याचा सर्व खर्च आयोजकांकडून केला जाणार आहे.



या अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक उद्योजकांना ८ डिसेंबर रोजी शिवरत्न नॉलेज सिटी अकलूज येथे सकाळी १० वाजता परीक्षेसाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. लेखी आणि तोंडी मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उद्योजकांना विविध उद्योगांची पाहणी करण्याची आणि तज्ञांकडून मार्गदर्शन घेण्याची संधी मिळेल. या उपक्रमाचा उद्देश नवीन उद्योजक निर्माण करणे आणि सध्याचे उद्योजक अधिक सक्षम करणे हा आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांबाबत माहिती देणे, बँकांकडून कर्ज मिळवून देण्यात मदत करणे आणि विविध उद्योग संस्थांशी करार करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश आहे.

> माझ्या माढा लोकसभा व माढा लोकसभा मतदारसंघातील तरुणांना उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रवीण बनवण्यासाठी, त्यांच्यातल्या उदयोजकतेला संधीं देण्यासाठी गांधीनगर, गुजरात येथे अभ्यास दौरा आयोजित केला आहे. हा दौरा त्यांच्या व्यवसायातील यशाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल. आम्ही त्यांना योग्य मार्गदर्शन, अनुभव आणि प्रेरणा देण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. या दौऱ्याच्या माध्यमातून उद्योजकांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करणार आहे.
>
> **- धैर्यशील मोहिते-पाटील,**
> खासदार

### ईव्हीएम घोटाळ्याबाबत उच्च न्यायालयात दाद मागणार : दिलीप धोत्रे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ नोव्हेंबर -**



भाजपाने ईव्हीएम घोटाळा करून छोट्या पक्षांना संपवण्याचा घाट घातला असल्याचा आरोप मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात दिलीप धोत्रे हे मनसेचे उमेदवार होते. दोन महिन्यांपूर्वी राज्यातील पहिली मनसेची उमेदवारी त्यांना जाहीर झाली होती. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर तीन महिने त्यांनी मतदार संघात जोरदार प्रचार केला होता. निवडणुकी दरम्यान दिलीप धोत्रे यांना अनेक समाज घटकांनी पाठिंबा दिला होता. मात्र दिलीप धोत्रे यांना अपेक्षेपेक्षा खूपच कमी मते मिळाल्याने यामध्ये काहीतरी घोळ असल्याचा संशय दिलीप धोत्रे यांनी व्यक्त केला आहे. मतमोजणीच्या दिवशी त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे ईव्हीएम मशीन मधील स्लीपची मोजणी करण्यात यावी असा तक्रारी अर्ज केला होता. मात्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवघ्या काही मिनिटातच त्यांचा अर्ज फेटाळला. राज्यभरातही असे अनेक प्रकार दिसून आल्याने ईव्हीएम विरोधात सर्वोच्च न्यायालयात धोत्रे याचिका दाखल करणार असून ईव्हीएम मध्ये घोटाळा असल्याच्या मतावर ते ठाम आहेत.

## माळशिरसमध्ये भाजपाचे राम सातपुते यांचा निसटता पराभव

### दोन्ही गट एकत्र असूनही जोरदार टक्कर

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२५ नोव्हेंबर-**

माळशिरस विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार रामभाऊ सातपुते व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उत्तम राव जानकर यांच्यात अतिशय अटीतटीची लढत झाली यामध्ये उत्तम जानकर हे १३ हजार १४८ मताने शेवटच्या काही फेरीत आघाडी घेतल्यामुळे विजयी झाले. या निवडणुकीत मोहीते पाटील व जानकर गट एकत्र आल्यामुळे लाखाच्या मताधिक्याने निवडुन येणार अशी वल्गना करणयात आली पण जसजशी विधानसभा निवडणूकीचा अंतीम टप्पा आला त्यावेळेस तालुक्यातील वातावरण पुर्णपणे बदलले. जेव्हा माळशिरस तालुक्यातील पश्चिम भागातुन मतमोजणीला सुरुवात झाली तेव्हापासून अगदी १७ व्या फेरीपर्यत भाजपचे राम सातपुते यांनी आघाडी घेतली होती.



पण सतरावी फेरी संपल्यावर मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे उत्तम जानकर यांनी आघाडी घेण्यास सुरुवात केली ती आघाडी २५ व्या फेरीपर्यंत टिकवून ठेवत उत्तम जानकर यांना १ लाख २० हजार ३२२ मते मिळविली तर राम सातपुतेंना १ लाख ८ हजार ५७ एवढी मते मिळविली यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उत्तम जानकर हे १३ हजार १४८ मतांनी विजयी झाले.

खरेतरे तालुक्यातील दोन्ही मुख्य गट एकत्र असल्याने उत्तम जानकर हे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील अशी वल्गना होती पण राम सातपुते यांना पडलेल्या मतांनी अक्षरशः घाम काढला. गेल्या अनेक वर्षापासून आमदारकीचे स्वप्न पाहणाऱ्या उत्तम जानकर यांचे आमदारकीचे स्वप्न अखेर मोहीते-पाटील यांच्या सहकार्यानेच साकार झाले. यामुळे सध्या माळशिरस तालुक्यात शरदचंद्र पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहीते पाटील व याच गटाचे उत्तमराव जानकर हे आमदार झाले आहेत. माळशिरस तालुक्यातील या अनोख्या युतीने राजकारणात कोण कोणाचा कायमचा दुश्मन नसतो हे सिद्ध झाले आहे. राज्यात व देशात सध्या भाजपप्रणित सरकार सत्तेत असल्याने विकासकामांना निधी उपलब्ध करणे हे विरोधात असल्याने तारेवरची कसरत होणार आहे. माळशिरस तालुक्यात उत्तम जानकर यांच्या विजयाबद्दल कार्यकर्ते यांनी जल्लोष साजरा केला.




## प्रचाराच्या झंजावातीचे अक्कलकोटमध्ये फलित

### दुधनी बाजार समितीच्या उपसभापतींचे भाजपाच्या विजयात मोठे योगदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ नोव्हेंबर-**

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार आ. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या प्रचारासाठी अनेकांनी उडी घेतली. त्यात दुधनी बाजार समितीचे उपसभापती सिद्धाराम बाके आघाडीवर होते. निवडणूक जाहीर झाल्यापासून अक्कलकोट तालुक्यासह दक्षिण सोलापूर तालुक्यातील मतदारसंघात समावेश असलेल्या गावांना भेटी देऊन मतदारांकडे भाजपा आणि आ. कल्याणशेट्टी यांच्यासाठी कौल मागितला. मतदारांनी तो दिलाही. याचे मोठ्या मताधिक्याच्या रुपात फलित मिळाले आहे.

विकासाभिमुख नेतृत्व आणि दूरदृष्टी असलेले नेते म्हणून आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे जिल्हा पाहत आहे. अक्कलकोटच नव्हे तर जिल्ह्यामध्ये रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याबरोबरच विविध धार्मिक स्थळांच्या जीर्णोद्धारासाठी त्यांनी मोठे योगदान देत मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला आहे. शिवाय मतदारसंघातील तब्बल ९४ हजार महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून दिला. याशिवाय मुख्यमंत्री सहाय्यता निधी, गरजवंत रुग्णांवर उपचारासाठी मदत, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविणे, विद्यार्थ्यांना मदत यासह विविध कामे मोठ्या प्रमाणात केल्याचे मुद्दे दुधनी बाजार समितीचे उपसभापती सिद्धाराम बाके यांनी मतदारांच्या गावी आणि दारात जाऊन पटवून सांगितले. अक्षरशः मतदारसंघ त्यांनी पिंजून काढला. यात सलगर जिल्हा परिषद गट, वागदरी जिल्हा परिषद गट, दुधनी परिसर, तडवळ भाग, जेऊर, किणी, चुंगी, नागणसूर, चप्पळगाव, वळसंग, धोत्री, मुस्ती, दर्गनहळ्ळी, कासेगाव, तोगराळी, कुंभारी यासह दक्षिण सोलापूर तालुक्यात समावेश असलेल्या गावांना भेटी दिल्या. मतदारांना भेटून विकासाचे मुद्दे पटवून दिले. दिवस-रात्र आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्याबरोबर राहून प्रचारात सिद्धाराम बाके यांनी आघाडी घेतली. आपल्या स्टाईलने विरोधकांना आ. कल्याणशेट्टी यांना मतदान करण्यासाठी मत परिवर्तनही केले. अनेकांच्या आमदारांबरोबर गाठीभेटी घडवून आणल्या. दुखावलेल्या कार्यकर्त्यांची मने पुन्हा एकसंघ करण्यातही बाके यांचा मोठा वाटा आहे.

> आ. सचिनदादा कल्याणशेट्टींच्या रुपाने तालुक्याला विकासाची दृष्टी असलेले नेतृत्व लाभले आहे. मतदारांनी आ. कल्याणशेट्टी यांच्यातील विकास, दूरदृष्टी, त्याग, समर्पणभाव, दातृत्व, माणुसकीला मोठा कौल दिला आहे. ते दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने निवडून आले आहेत. आता पक्ष नेतृत्वांनी त्यांना कॅबिनेट मंत्रिपद देऊन जिल्ह्याचे पालकमंत्रीपदाची जबाबदारी दिल्यास अक्कलकोटच्या जनतेचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होणार आहे.
>
> **-सिद्धाराम बाके,**
> उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, दुधनी

# माजी आ. पाटील यांचे आवाहन मतदारांनी धुडकावले

## विकासकामांना दिली पसंती; झप्पर फाडके केले मतदान

**तभा वृतसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ नोव्हेंबर-**

२५० अक्कलकोट विधानसभा मतदार संघात सोलापुर जिल्हा भाजपाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी याना मतदारांनी प्रचंड मतानी एकतर्फी विजयी करून मतदारानी अखेर विकास कामाना मोठी पसंती दिली आहे. भाजपाचे माजी आमदार सिद्राम प्पा पाटील रमेश पाटील माजी जिप उपाध्यक्ष शिवानंद पाटील यांचे म्हेत्रे यानां विजयी करण्याचे आवाहन धुडाकवले आहे.

अक्कलकोटमध्ये गेल्या आडीच वर्षात सुमारे आडीच हजार कोटी रुपयाची विकास कामे प्रगती पथावर आहेत. काही कामे झाली आहेत . ७० वर्षात जी विकास कामे मार्गी लागली नाहीत अशी अनेक कामे मार्गी लागली आहेत . अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकास मंजुरी ग्रामीण रुग्णालय श्रेणी वर्धन एकरूख उपसा सिंचन योजना नविन बसस्थानक निर्मिती मल्लीकार्जुन मंदिर जीर्णोध्दार न्यायालय रजिऑफीस नविन पोलीस चौकी तीनही नपासाठी पाणीपुरवठा योजना या प्रमुख विकास कामाच्या मंजुरी सह अनेक रस्ते पुल बांधणी उड्डान पुल आदि कामे प्रगती पथावर आहेत काही कामे पुर्णत्वास आली आहेत . येत्या काही वर्षात अक्कलकोट तीर्थक्षेत्र विकसित मतदार संघाची मॉडेल मतदार संघ म्हणून वाटचाल चालू



आहे . या सर्व बाबीना पुर्णत्वास नेण्यासाठी जाणकार सुज्ञ जनतेनी मतपेटी द्वारे एक तर्फी निर्वीवाद मोठा पाठिंबा व्यक्त केला आहे याउलट माजी आमदार सिद्रामप्पा पाटील रमेश पाटील जिप माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील यांनी माजी मंत्री म्हेत्रे या ना विजयी करण्याचे आवाहन धुडकावले आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी याच्या झोळीत मतदारांनी झप्पर फाडके मते टाकली. उपमुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांनी विविध विकास कामे भुमिपुजन निमित्याने मोठा दावा केला होता . जनतेला संबोधताना ते म्हणाले होते की कल्याणशेट्टी रुपानी तुम्ही आम्हाला हिरा दिलाय . सचिनची तुम्ही जेवढी कामे सांगितली तेवढी सर्व कामे मार्गी लागली आहेत सर्वच कामे पाच वर्षात कराल तर पुढील पाच वर्षासाठी काही तरी कामे करण्यास ठेवा असे गौरवोदगार काढून कल्याशेट्टीच्या विजयाचे सुतोवाच केले होते. गोव्याचे मुख्यमंत्री प्रदिप सावंत उमेदवारी दाखल करण्या प्रसंगी कल्याणणशेट्टी मागील विधान सभा पेक्षा डबल मताधिक्याने विजयी होण्याचा दावा केला होता. आ. पंकजा मुंडे यांनी आ. कल्याणशेट्टी हे ५० हजार मताधिक्यांनी विजयी होणार असा दावा मैंदर्गी सभेत केला होता.

> **मान्यवरांचा अंदाज मतदारांनी खरा ठरवला**
>
> दुधनी प्रचार सभेत केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की बोरामणी ते दुधनी प्रचार निमित्याने मतदारसंघात फिरलो. यावेळी मतदाराचा मिळणारा प्रतिसाद पाहता आ. कल्याणशेट्टींचा विजय होणार हे कुठल्या ज्योतिषाला सांगायची गरज नाही असे म्हणाले. मान्यवरांचे हे बोल मतदारांनी खरे करून दाखविले. अक्कलकोटला विकासाच्या मार्गावर नेण्याचा आ. कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नाला पाठिंबा द्यायचे असे ठरविले आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आ. देवेंद्र कोठे यांनी घेतले स्वामी समर्थांचे दर्शन

**अक्कलकोट, दि. २४ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार आ. देवेंद्र कोठे यांनी प्रचंड बहुमताने निवडून आल्यानंतर श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामी समर्थांचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा सत्कार केला. आ. देवेंद्र कोठे यांनी स्वामी समर्थांच्या



कृपेने व मतदारसंघातील जनतेचे आपल्यावरील निष्ठेमुळे मतदार संघातील नागरिकांनी आपल्याला लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेत पाठविले आहे. याबद्दल मी मतदार संघातील नागरिकांचा व स्वामी समर्थांचा अत्यंत ऋणी आहे. या भावनेतून मतदारसंघातील नागरिकांना भेट देत ऋण व्यक्त करण्यासाठी आज स्वामी समर्थ चरणी नतमस्तक होण्यासाठी येथे येऊन स्वामी चरणी नतमस्तक झालो असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी मंदिर समितीचे प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे आदींसह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### अन्नछत्र मंडळाचे सामाजिक कार्य उल्लेखनीय : न्या. कुलकर्णी

**अक्कलकोट, दि. २४ नोव्हेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सुरू असलेल्या धार्मिक सेवाबरोबरच सामाजिक कार्यदेखिल उल्लेखनीय असल्याचे मनोगत गडचिरोलीचे प्रधान जिल्हा न्यायाधीश विकास कुलकर्णी यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता, न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, मनोज निकम, पुरोहित संजय कुलकर्णी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, निखिल पाटील, गोटू माने, प्रवीण घाडगे, बाळासाहेब घाटगे, एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, दत्ता माने, तानाजी पाटील, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

### बोळकोटे नगर येथून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर-**

शहरातील बोळकोटे नगर येथून चोरट्याने २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत राहुल श्रीनिवास म्याकम (वय २४, रा. दत्त नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल म्याकम यांनी त्यांची एमएच १३ ईएच ३३४५ क्रमांकाची दुचाकी ही २२ नोव्हेंबर रोजी रात्री बोळकोटे नगर येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार राकेश पाटील पुढील तपास करीत आहेत.

### जामगावमध्ये चोरट्यांचा धुडगूस; संशयितास गावकऱ्यांनी पकडले

**बार्शी, दि. २४ नोव्हेंबर-**

बार्शी शहराजवळील लातूर रोडवरील जामगाव येथे दि. २३ नोव्हेंबर रोजी रात्री दीड ते दोनच्या दरम्यान विष्णू जळकुटे यांच्या घराचे लोखंडी गेटचे कुलूप तोडून तीन चोरांनी किचनचा दरवाजा उचकटून आतमध्ये घुसून स्वयंपाक घरातील डबे उचकटून, डब्यात ठेवलेल्या डोरले व नथीची चोरी करत असताना आवाज आल्याने विष्णू जळकुटे यांच्या पत्नीस जाग आली व त्यांनी कोण आहे रे तिकडे असा आरडाओरडा केला असता चोर डोरले व नथीची चोरी करून पळून गेले. चोरट्यांच्या पाऊल खुणावरुन अंदाजे तिघेजण असतील असे विष्णू जळकुटे यांनी सांगितले. रात्री दोन वाजून ५० मिनिटांनी ग्राम सुरक्षा दलाला फोन करुन अलर्ट केले. दरम्यान गावातली घरासारखी दिसणारी जिमचे कुलूप तोडून जिममध्ये ही चोरी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. परंतु त्यांना तिथे काही हाती लागले नाही. हॉटेल गावकरी जवळ भाऊसाहेब आवटे यांच्या आईला चार-पाचजण त्यांच्या घराकडे येताना दिसले, त्यांना पाहून चोर बायपासच्या दिशेने पळून गेले. सकाळी साडेपाचच्या दरम्यान गावातील ऋषिकेश आवटे यांच्या घरामध्ये घुसण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या एका संशयीताला सर्वोदय आवटे यांनी धरचन ठेवले. त्याच्याकडे गावकऱ्यांनी विचारना केली असता तो काहीही सांगत नाही, या घटनेची माहिती पोलीस पाटलांना कळवून बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्यास कळविले आहे.

# खासदार प्रणिती शिंदे यांच्या लोकसभा मतदारसंघात काँग्रेस भूईसपाट

## खासदार शिंदेंचा पुढील राजकीय प्रवास खडतर?

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ नोव्हेंबर -**

विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात भाजपाने पाच जागा राखण्यात यश मिळविले. तर सहापैकी चार जागा पटकावण्यात शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसला यश आलं आहे. मात्र, काँग्रेसची मात्र अवस्था अत्यंत दयनीय झाली. प्रणिती शिंदे यांनी यांनी नेमकं मिळवलं तरी काय? असा प्रश्न उपस्थित झाला. खासदार प्रणिती शिंदे यांच्या लोकसभा मतदारसंघात काँग्रेस भूईसपाट झाली आहे. त्यामुळे खासदार शिंदे यांना आगामी काळात मतदारसंघात काम करताना मोठी कसरत करावी लागणार असून शिंदेचा पुढील प्रवास हा खडतर असणार हे आता स्पष्ट झाले आहे.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीची धुळदाण झाली. मात्र, सोलापूर जिल्ह्याने मत्र राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना साथ दिली आहे. जिल्ह्यात लढवलेल्या सहापैकी चार जागा पटकावण्यात राष्ट्रवादी काँग्रेसला यश आलं. मात्र, काँग्रेसची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पाच महिन्यांपूर्वी खासदार झालेल्या प्रणिती शिंदे यांनी नेमकं मिळवलं तरी काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. काँग्रेसने तीन जागा लढवल्या, मात्र त्यांना पराभव स्वीकारावा लागला. शिंदे कुटुंबाचा सोलापूर मध्य मतदारसंघ बालेकिल्ला समजला जातो. त्याच सोलापूर मध्य मतदारसंघामध्ये उमेदवाराचे डिपॉझिट जप्त झाली आहे. सोलापूर दक्षिणमध्ये सुद्धा ज्या अपक्षाला पाठिंबा दिला त्याचं सुद्धा डिपॉझिट जप्त झालं. पंढरपूरमधून सुद्धा भगीरथ बालके पराभूत झाले आहेत. शरद पवार गटाच्या अनिल सावंत यांच्या बंडखोरीचा मोठा फटका भालकेंना बसला. जितक्या मतांनी भगीरथ भालके पराभूत झाले तेवढीचे मते अनिल सावंत यांनी मिळवली आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीच्या कुरघोडींमध्ये या जागा पडल्या आहेत.

सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. २००९ सालीपासून या मतदारसंघात प्रणिती शिंदे या सलग तीनवेळा आमदार म्हणून निवडून आल्या. माकपचे दिग्गज नेते नरसय्या आडम यांचा प्रणिती शिंदे यांनी सलग पराभव केला होता. यंदाच्या लोकसभा निवडणुकीमध्ये प्रणिती शिंदे यांचा विजय झाल्याने सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र, मागील दोन निवडणुकीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर



राहिलेल्या एमआयएम हा देखील मोठा पक्ष या मतदारसंघांमध्ये होता. शिवसेनेची पारंपारिक जागा असलेल्या सोलापूर मध्य जागा भाजपने लढवण्याचा निर्णय घेतला नव्हता. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकत्व स्विकारलेल्या माजी नगरसेवक देवेंद्र कोठे या तरुण उमेदवाराला भाजपने या मतदारसंघातून संधी दिली होती.

लोकसभा निवडणुकीमध्ये सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात झालेल्या धार्मिक धुव्रीवकरणावरून निवडणूक भाजप आणि एमआयएममध्येच होणार हे स्पष्ट झाले होते. अपेक्षेप्रमाणे भाजप आणि एमआयएममध्ये ही निवडणूक झाली. मात्र, काँग्रेसचा या मतदारसंघात दारुण पराभव झाला. प्रणिती शिंदे यांनी मतदारसंघांमध्ये मोठी ताकद लावलेली असताना देखील काँग्रेस उमेदवार चेतन नरोटे हे आपले डिपॉझिट देखील वाचू शकले नाही.

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघ जिथून सुशीलकुमार शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून राज्याचे नेतृत्व केले होते. त्या मतदारसंघात देखील काँग्रेसने ऐनवेळी पाठिंबा दिलेले अपक्ष उमेदवार म्हणजे धर्मराज काडादी देखील आपले डिपॉझिट वाचवू शकले नाहीत. सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीत अनेक नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या होत्या. ठाकरे गटाकडून या मतदारसंघात अमर पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. काँग्रेसकडून दिलीप माने यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. मात्र ऐनवेळेस काँग्रेसने दिलीप माने यांना एबी फॉर्म दिला नाही. एबी फॉर्म मिळाला नसला तरी दिलीप माने आणि काँग्रेसचे नेते धर्मराज काडादी यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. मात्र उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी प्रणिती स्वतः उपस्थित असताना दिलीप माने यांनी अर्ज माघारी घेतला होता. धर्मराज काडादी यांनी मात्र अपक्ष अर्ज कायम ठेवला. ऐन मतदानाच्या दिवशी सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराऐवजी अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा जाहीर केला. यामुळे महाविकास आघाडीमध्ये मोठा वाद निर्माण झाला. निकालानंतर सुशील कुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांनी पाठिंबा जाहीर केलेल्या धर्मराज काडादी यांचं डिपॉजिट देखील जप्त झालं. तर पंढरपूर विधानसभा मतदारसंघात देखील महाविकास आघाडीमधील मैत्रीपूर्ण लढतीमुळे भाजपचा विजय सुकर झाल्याचा दिसत आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटात झालेल्या मत विभाजनामुळे भाजपचे समाधान आवताडे यांचा पंढरपूरमध्ये विजय झाला.

# राज्यात लाडक्या बहिणींची लाट! महायुतीने केला विजयोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर -**

संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीत महायुतीला भरघोस मतांनी विजयी करत पुन्हा एकदा सत्तेवर आरूढ केले आहे. यंदाच्या निवडणुकीत मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना प्रभावी ठरली आणि राज्यातील महायुती उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे लाडक्या बहिणी उभे राहत विरोधकांचा सुपडा साफ केला. याच पार्श्वभूमीवर महायुतीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

सोलापूर शहरात भाजप आणि महायुती मधील घटक पक्ष राष्ट्रवादी, शिवसेना यांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करत एकच जल्लोष साजरा केला. यावेळी गुलालाची मुक्त उधळण करत, हलग्यांचा कडकडाटात आणि फटाक्यांची आतिषबाजी




करून विजयी मिरवणूक काढली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय जय भवानी जय शिवाजी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो, महायुती सरकारचा विजय असो अश्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. महायुतीतील प्रमुख पदाधिकारी यांनी एकमेकांना मिठाई भरवून विजयाचा आनंद साजरा केला. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, यांच्यासह जेष्ठ नेते, प्रांतिक सेलचे सर्वच प्रमुख पदाधिकारी नेते, फ्रंटल सेलचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, पदाधिकारी महिला आघाडी यांची पस्थिती होती. यावेळी माहितीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, महायुती सरकारने केलेल्या राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या जोरावर मतदारांनी विरोधकांच्या भुलथापांना बळी न पडता मत पेटीतून चोख प्रत्युत्तर देत महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचंड मताधिक्याने विजय केला. या विजयात लाडक्या बहिणींचा सिंहाचा वाटा आहे.हा विजय केवळ महायुतीचा नसून तो मतदारांचा आहे. यापुढे देखील महायुतीचे हे आपल्या हक्काचे सरकार विविध योजनांच्या माध्यमातून राज्याचा सर्वांगीण विकास करण्यावर यापेक्षाही अधिक भर देईल, असे सांगताना विजय उमेदवारांना शुभेच्छा दिल्या. तदनंतर चार हुतात्मा चौक , पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर,विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## गुळपोळीमध्ये कालभैरव जयंती भक्तीभावाने साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ नोव्हेंबर -**

तालुक्यातील गुळपोळी येथील श्री कालभैरव मंदिरामध्ये श्री कालभैरव जयंती मोठ्या भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह झाला. शनिवारी पहाटेपासून अभिषेक, धार्मिक कार्यक्रम सुरु होते. देवाची पूजा व दु १२ वा. काल्याच्या किर्तन झाले. ह.भ.प. इगळे महाराज यांचे किर्तन झाल्यानंतर भक्तांना वंदना उबाळे, देणगीदार व गावकऱ्यांतर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्री कालभैरव जयंतीनिमित्त स्वरुप दर्शन मुर्तीचे उद्घाटन पुजारी बबुदादा गुरव व रामचंद्र उबाळे यांचे हस्ते करण्यात आले. गुळपोळीसह बार्शी तालुक्यातील पंचक्रोशीतील सर्व समाजबांधव आणी भक्तांनी जयंती उत्सवासह देवदर्शन व प्रसादाचा लाभ घेतला. श्री कालभैरव अन्नदान व नवरात्र उत्सव मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत चिकणे यांनी जयंती उत्सवाच्या आयोजनाबद्दल प्रसिद्धी माध्यमांना माहिती दिली. श्री कालभैरवनाथ जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे आयोजन श्री कालभैरव अन्नदान व नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने आयोजिन करण्यात आले होते. मंडळाचे



अध्यक्ष सूर्यकांत चिकणे, उपाध्यक्ष राजेंद्र चिकणे, कार्यअध्यक्ष, लक्ष्मण मचाले, उपकार्याध्यक्ष राहूल मचाले, सेक्रेटरी राजेंद्र मचाले, शहाजी चिकणे, खजिनदार हनुमंत पाटील, उपखजिनदार परमेश्वर मचाले, अतुल चिकणे, शिवाजी चिकणे, प्रेम मचाले, यश पवार, घनश्याम चिकणे, परमेश्वर चिकणे, राया सावंत, औदुंबर सावंत, महेश मचाले, काका पाटील, महेश चिकणे, रवि सावंत, अमोल सावंत यांनी परिश्रम घेतले. संध्याकाळी दीपोत्सव झाला. दुपारी १२ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत अन्नदान करण्यात आले.



## मोडनिंब येथे महायुतीच्या विजयाचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २४ नोव्हेंबर-**

महाराष्ट्रात महायुतीला एकहाती सत्ता देत स्पष्ट बहुमत मिळताच मोडनिंब (ता. माढा) येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने फटाके फोडून घोषणाबाजी देत जल्लोष साजरा करण्यात आला. भारतीय जनता पार्टी, महायुतीला जनतेने विकासकामांच्या मुद्द्यावर जोरदार मतदान केले आहे. याबद्दल जनतेने आभार मानले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष योगेश पाटील, योगेश बोबडे,प्रो. सुहास पाटील, नंदकुमार मोरे, विशाल पाटील यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# इच्छा भगवंताची परिवारानं किंगमेकरची भूमिका बजावली : आ. कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ नोव्हेंबर-**

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित दमदार आमदार देवेंद्र कोठे यांच्या ऐतिहासिक विजयाबद्दल इच्छा भगवंताची परिवाराच्यावतीनं फटाके फोडत गुलालाची मुक्त उधळण करत मिठाई वाटून मोठा जल्लोष साजरा करण्यात आला.

नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव नगरसेवक नागेश गायकवाड यांनी फेटा बांधून मिठाई भरवत पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. दरम्यान रेल्वे लाईन्स येथील किसन जाधव यांच्या संपर्क कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी देवेंद्र कोठे यांच्या ऐतिहासिक विजयाबद्दल हातामध्ये राष्ट्रवादीचे झेंडे घेऊन देवेंद्र कोठे यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी देत गुलालाची उधळण आणि फटाक्याची आतिषबाजी करून महिला कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.





याप्रसंगी महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकमेकांना मिठाई भरवत विजयाचा जल्लोष साजरा केला तर नंतर मोरारजी पेठ येथील राधाश्री निवासस्थानी देवेंद्र कोठे यांच्या पत्नी मोनिका कोठे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, आमदार देवेंद्र कोठे यांच्या भगिनी डॉ. राधिका चिलका, धनश्री विनायक कोंड्याल तसेच कोठे परिवारातील सदस्यांना गुलाल लावत मिठाई भरून किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी राधाश्री बंगल्यासमोर सोलापूर शहर मध्यचे नवनिर्वाचित आमदार देवेंद्र कोठे आगमन होताच त्यांचे जंगी स्वागत करत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नवनिर्वाचित दमदार आमदार देवेंद्र कोठे म्हणाले की माझ्या ऐतिहासिक विजयामध्ये इच्छा भगवंताची परिवार हा किंगमेकरची भूमिका बजावला असून इच्छा भगवंताची परिवाराचे सर्वेसर्वा आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांचे आशीर्वाद मला लाभले त्यांच्यामुळेच आपल्याला ऐतिहासिक विजय मिळाला असल्याचेही ते म्हणाले. गेल्या अनेक वर्षांच्या राजकारण आणि समाजकारणानंतर प्रथमच स्वर्गीय विष्णुपंत कोठे यांच्या आशीर्वादाने देवेंद्र कोठे यांनी ऐतिहासिक विजय मिळवला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी राष्ट्रवादी आणि इच्छा भगवंताची परिवाराने विजयासाठी रणनीती आखून विजयश्री खेचून आणण्यात प्रामाणिकपणे काम केले.

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ, सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार विजयकुमार देशमुख, आणि दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील उमेदवार आमदार सुभाष देशमुख यांच्या विजयासाठी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि इच्छा भगवंताची परिवाराने एक दिलाने मताधिक्य मिळवण्यासाठी प्रयत्न केले असल्याचेही यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य किसन जाधव म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, राष्ट्रवादी महिला पदाधिकारी रुक्मिणी जाधव, शहर सरचिटणीस संगीता गायकवाड, लक्ष्मी पवार, शोभा गायकवाड, मीना जाधव, सरोजनी जाधव, सुनीता बिराजदार, मारता आसादे, राजश्री जाधव, कल्पना गायकवाड, राष्ट्रवादी शहर सचिव अमोल जगताप, अंबादास पट्टयाप्पा जाधव, शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, शहर उपाध्यक्ष किरण शिंदे, शहर सरचिटणीस निलेश कांबळे, सरचिटणीस संतोष गायकवाड, अभिजीत कदम, तुषार शिवाजी गायकवाड, महादेव राठोड, दिगंबर कुणगिरी, इच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी उपस्थित होते.